

स्वित्झरलँडचे राजदूत, बेल्जियमच्या वाणिज्यदूतांनी घेतली राज्यपालांची सदिच्छा भेट

**व्यापार, शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राला पसंती**

वर्ष ३३ वे

जुलै
2023
₹ 75/-


MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन


मासिक


# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याचे फलीत

## गुगल, ॲमेझॉन, टेस्लाची अब्जावधीच्या गुंतवणूकीची घोषणा





केंद्रिय मंत्री नारायण राणे यांचे मत, 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळकटी

## सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग ग्रामीण भागात सुरू व्हावेत

उद्योग विभागाचा रिन्यु पावरसोबत सामंजस्य करार

## ५०० एकरवर प्रकल्प, २० हजार कोटींची गुंतवणूक, १० हजार रोजगार






९५ हजार कोटींची गुंतवणूक, ३.५ लाख रोजगार, १० लाख कोटी निर्यातीचे उद्दिष्ट

## हायटेक महाराष्ट्रासाठी नवीन आयटी धोरण



मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

## धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

MCED

उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत

## महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र

उद्योजक

## होय, मला उद्योजक व्हायचय..!

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांच्या चौकशीसाठी पुढील बारकोड स्कॅन करून प्रशिक्षणासाठी आपली नोंदणी करा.

MCED

## होय, मला उद्योजक मासिकाचे वर्गणीदार व्हायचे..!

*उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सर्व काही...*

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

मासिक

उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!

**ऑफिसर कोड 46 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.**

**उद्योजक**

*JULY-2023, VOL.XXXIII, ISSUE VII*

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719



**सल्लागार मंडळ**

**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे

**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

संपादक
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर

**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर

अध्यक्ष, मसिसा, छत्रपती संभाजीनगर

विभागप्रमुख, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

**श्री. सुरेश वाघ, नाशिक**



उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन
अंतर्गत कार्यरत संस्था

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
यांचे प्रकाशन

**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in



**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**


# विकासाला मिळणार द्रूतगती, नांदणार समृद्धी



कोणत्याही राज्याचा विकास तेथील पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. रस्ते, महामार्ग, समृद्धी मार्ग, रेल्वे मार्ग, हवाई मार्ग, उड्डाणपूले, भुयारी मार्ग यातून राज्याचा विकास अधोरेखीत होतो. चांगल्या पायाभूत सुविधांची उपलब्धतता सर्व क्षेत्रातील आर्थिक विकासास सहाय्य करते. अशा सुविधांच्या बाबतीत महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला आहे. विकासाच्या या परिभाषेला अनुसरून तयार करण्यात आलेल्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर-शिर्डी हा ५२० किलोमीटरचा या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन गेल्या वर्षी ११ डिसेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपुरात करण्यात आले. महामार्गाचा ८० किलोमीटरचा दुसरा टप्पा शिर्डी ते भरवीर (नाशिक) या मार्गाचे २६ मे २०२३ रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. आता शिर्डी ते नाशिक हे अंतर अवघ्या ४० ते ४५ मिनिटात पार होईल. तर नागपूर ते नाशिक हे अंतर ६ तासांत पूर्ण करता येईल. समृद्धीमुळे नागपूर-मुंबई हे ७०१ किलोमीटरचे अंतर अवघ्या ८ तासात कापले जाईल. राज्याची राजधानी आणि उपराजधानी जवळ आल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीही होणार आहे. दोन टप्पे खुले झाल्याने विकासाला अजूनच गती मिळणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा सर्वार्थाने ऐतिहासीक ठरला. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी स्टेट व्हिजीट साठी त्यांना निमंत्रीत केले होते. हा भारताचा सन्मान आहे. भेटीत मोदी यांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवलेल्या कंपन्यांच्या प्रमुखांची बैठक घेतली. त्यांना भारतात गुंतवणूकीसाठी निमंत्रण दिले. त्यानुसार गुगल, अमेझॉन आणि टेस्लाने भारतात अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणूकीची घोषणा केली आहे. सेमिकंडक्टर उत्पादनासाठीही अमेरिकी कंपनी भारतात प्रकल्प उभारेल. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील.

महाराष्ट्राच्या ग्रोथ स्टोरी मध्ये आयटी उद्योगांचे महत्वपूर्ण योगदान आहे. या उद्योगांना चालना देण्यासाठी राज्याने नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा – २०२३ आणले आहे. सर्वंकष आणि आयटी क्षेत्रातील उद्योजकांच्या आवश्यकतेनुसार धोरण तयार करण्यासाठी गेल्या काही वर्षात ३२ बैठका, २ चर्चासत्र व ५ सादरीकरण झाले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध भागधारकांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली. यातून तयार झालेल्या धोरणामुळे ९५ हजार कोटींची नवीन गुंतवणूक, ३.५ रोजगाराची संधी आणि १० लाख कोटीच्या निर्यातीचे लक्ष्य साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रात साखरे पाठोपाठ कापड उद्योग सर्वाधिक रोजगार निर्मितीचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर केले आहे. यातून २५ हजार कोटींची गुंतवणूक, कापसाची प्रक्रिया क्षमता २० वरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविणे आणि ५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्यातील भक्कम पायाभूत सुविधा, उद्योगस्नेही धोरणे, कुशल मनुष्यबळ, जागेची उपलब्धतता आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरा उद्योगांना आकर्षित करत आहे. राज्याने पुन्हा एकदा थेट परदेशी गुंतवणूकीमध्ये देशात आघाडी घेतली आहे. भारतसोबत व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील देवाण-घेवाणीसाठी स्वित्झर्लंड आणि बेल्जियम उत्सुक आहे. दोन्ही देशांनी व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील देवाण-घेवाणीसाठी महाराष्ट्राला पसंती दिली आहे. त्यासाठी स्वित्झर्लंडचे भारतातील राजदूत डॉ. राल्फ हेकनर आणि बेल्जियमचे मुंबईतील वाणिज्यदूत फ्रँक गिरकीन्स यांनी नुकतीच राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. भारतासह जगभरात अपारंपारीक उर्जा क्षेत्रात कार्यरत मे. रिन्यू पॉवर कंपनी नागपूर येथे ५०० एकर जागेवर सुमारे २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यातून सुमारे ८,००० ते १०,००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल. तर एन्सीलरी युनिट्सच्या माध्यमातून २००० कोटींची अतिरिक्त गुंतवणूक होईल. रिन्यु पावर ही नॅसडॅक लिमिटेड कंपनी आहे.

राज्यात येत असलेला गुंतवणूकीचा ओघ, सरकारची धोरणे आणि पायाभूत सुविधा अशाच पद्धतीने राज्याचे रूप पालटवून टाकण्यास पोषक ठरणार आहे.


**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा
अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)



Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक

## जुलै 2023




- गुगल, ॲमेझॉन, टेस्लाची अब्जावधीच्या गुंतवणूकीची घोषणा / डॉ. आरतीश्यामल जोशी......०५
- सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग ग्रामीण भागात सुरू व्हावेत / प्रतिनिधी..............................०७
- देशातील सर्वाधिक पायाभूत प्रकल्प महाराष्ट्रात / प्रतिनिधी...........................................०९
- ५०० एकरवर प्रकल्प, २० हजार कोटींची गुंतवणूक, १० हजार रोजगार ..............................११
- पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कटिबद्ध - उद्योगमंत्री उदय सामंत / प्रतिनिधी...............१३
- हायटेक महाराष्ट्रासाठी नवीन आयटी धोरण / डॉ. आरतीश्यामल जोशी..............................१५






- खाजगी उद्योगांचा बँकिंग क्षेत्रात प्रवेश / हेमंत देसाई..................................................१८
- सीएमईजीपी योजना : धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे .....१९
- व्यापार, शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राला पसंती / प्रतिनिधी..................................२३
- उद्योग विभागाच्या योजना, भांडवल आणि अनुदानही : स्वयंरोजगाराच्या वाटा / प्रतिनिधी....२५
- मधुर बजाज : भारताकडे जगभरात कुशल मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता / महेश जोशी.....२७
- पदवीसोबत कौशल्य आत्मसात करा / जीवन मुळे...............................................................३१





- वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ : वस्त्रोद्योगातून विणा संपन्नतेचा धागा / प्रतिनिधी.................३४
- मंदीतही भारतीय अर्थव्यवस्थेची चांदी / डॉ. डी. एस. काटे..................................................३५
- व्यावसायिक शिक्षण : काल, आज आणि उद्या / डॉ. अभिराम दबीर ......................................३७
- कृषी कट्टा : ग्राम परिवर्तनाचे शाश्वत सेवा केंद्र / प्रसाद घारे..............................................३९
- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० : पारंपरिक ऊर्जेला भक्कम पर्याय / प्रतिनिधी.......४१
- शेतीमालाच्या विक्रीतून यशाला गवसणी / प्रतिनिधी.............................................................४३






- हर घर नर्सरी / प्रतिनिधी.....................................................................................................४६
- सरकारी योजनांची साथ, प्रगती भरमसाठ / प्रतिनिधी...........................................................४७
- समृद्धी ॲग्रो ग्रुप : भरड धान्यापासून प्रक्रिया उत्पादने / दीपक अहिरे.................................४९
- एकीचे बळ आणि प्रगती अटळ : औद्योगिक समूह विकास योजना / प्रतिनिधी......................५२
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये ....................................................................................५४

  वनौषधी प्रोसेसिंग प्लँट, सुगंधी उत्पादने निर्माण करणे व पॅकेजिंग मटेरियल उत्पादित करणे

  याशिवाय संपादकीय, शीर्षासन, सुविचार, व्यंगचित्रे, प्रश्नपेटी इत्यादी...



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याचे फलीत

# गुगल, ॲमेझॉन, टेस्लाची अब्जावधीच्या गुंतवणूकीची घोषणा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गेल्या महिन्यातील अमेरिका दौरा ऐतिहासीक ठरला आहे. मोदींनी यापूर्वी ७ वेळेस अमेरिकेला भेट दिली. मात्र, यंदा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी स्टेट व्हिजीट'साठी त्यांना निमंत्रीत केले होते. आपल्या अत्यंत जवळच्या मित्र राष्ट्रांना, खास पाहुण्यांनाच अमेरिकेत स्टेट व्हिजीट'साठी बोलावले जाते. या भेटी दरम्यान मोदी यांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवलेल्या कंपन्यांच्या प्रमुखांची बैठक घेतली. त्यांना भारतात गुंतवणूकीसाठी निमंत्रण दिले. त्याचा परिणाम दिसत असून गुगल, अमेझॉन आणि टेस्लाने भारतात अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणूकीची घोषणा केली आहे. सेमिकंडक्टर उत्पादनासाठीही अमेरिकी कंपनी भारतात प्रकल्प उभारेल. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील.**

**- डॉ.आरतीश्यामल जोशी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ ते २४ जून २०२३ दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन आणि फर्स्ट लेडी जिल बायडन यांच्या खास निमंत्रणावरून अमेरिका भेटीवर गेले होते. २२ जून रोजी अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानी, व्हाईट हाऊसमध्ये मोदींचे जंगी स्वागत करण्यात आले. येथे त्यांची बायडेन यांच्यासोबत उच्चस्तरीय बैठक आणि त्याच संध्याकाळी सरकारी स्नेहभोजन झाले. तर २३ जून रोजी त्यांनी अमेरिकेच्या संसदेत भाषण केले. अमेरिकी संसदेत भाषण करण्याची दोनवेळा संधी मिळालेले ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. यामुळे विस्टर्न चर्चिल आणि नेल्सन मंडेला या मोजक्या नेत्यांच्या यादीत मोदींचा समावेश झाला. याआधी २०१६ मध्ये मोदींनी अमेरिकी संसदेत भाषण केले होते. अमेरिका दौरा संपवूनया मोदी इजिप्तला रवाना झाले.

### आयसीईटीमध्ये सहकार्य

मोदी यांनी व्हाईट हाऊसमध्ये बायडेन यांच्याशी चर्चा केली. उभय नेत्यांनी दोन्ही देशांमधील दीर्घकालीन मैत्री आणि व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, हवामान बदल आणि लोकांचे परस्पर संबंध यासारख्या क्षेत्रांमधील वाढते सहकार्य अधोरेखित केले. त्यांनी महत्वपूर्ण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान (iCET) सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून झालेली वेगवान प्रगती आणि लवचिक पुरवठा साखळी तयार करण्यासाठी धोरणात्मक तंत्रज्ञान सहकार्य वाढवण्याच्या उत्कट इच्छेचे कौतुक केले. महत्त्वपूर्ण खनिजे आणि अंतराळ क्षेत्रातील दृढ सहकार्याचे स्वागत केले.

### एआयचा नवा अर्थ उलगडला

मोदी यांनी अमेरिकेच्या संसदेतील भाषणात दहशतवाद, रशिया युक्रेन युद्ध यासह विविध मुद्द्यांवर भाष्य केले. ते म्हणाले, अमेरिका आणि भारताची विश्वासार्ह भागिदारी पहाटेच्या सूर्याप्रमाणे आहे, जी सगळीकडे प्रकाश पसरवेल. २०१६ मध्ये मी म्हटले होते, की आमचे नाते भविष्यासाठी महत्त्वाचे आहे, ते भविष्य आज आहे. आज अमेरिका आणि भारत विविध क्षेत्रांमध्ये एकत्र काम करत आहे. समुद्रापासून अंतराळापर्यंत, सायन्स आणि सेमिकंडक्टर, स्टार्टअप आणि सस्टेनेबिलिटी, टेक आणि ट्रेड, फार्मिंग आणि फायनान्स, आर्ट आणि एआय अशा सर्व क्षेत्रांमध्ये भारत-अमेरिका सोबत आहे.

त्यांनी एआय (AI) या शब्दाचा नवा अर्थ सांगितला. ते म्हणाले, आजचा काळ हा AI म्हणजेच आर्टिफिशयल इंटेलिजन्सचा आहे. मात्र आज मी

तुम्हाला AI चा नवा अर्थ सांगतो. AI म्हणजे अमेरिका-इंडिया. मोदी यांनी हे वाक्य उच्चारताच टाळ्यांचा कडकडाट झाला. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री १.३० च्या सुमारास त्यांनी हे भाषण केले.

**गुंतवणूकीसंबंधी चर्चा**

मोदी यांनी राजकीय नेत्यांसोबतच अमेझॉन, टेस्ला, गुगल, मास्टरकार्ड, एक्सेंचर, कोका-कोला, अडोब सिस्टीम्स आणि व्हिसा यांसारख्या महत्त्वाच्या २० अमेरिकन कंपन्यांच्या सीईओंची भेटही घेतली. तर संरक्षणदृष्ट्या १८ ड्रोनच्या खरेदीबाबतचा करारही करण्यात आले. या भेटीनंतर लगेचच तीन महत्त्वाच्या कंपन्यांनी भारतात गुंतवणूकीची अधिकृत घोषणा केली.

**ॲमेझॉनची २६,०० कोटीची गुंतवणूक करणार**

आघाडीची ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉन भारतात २६ बिलियन डॉलर म्हणजे सुमारे २६०० कोटींची गुंतवणूक करणार आहे. अमेरिका दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांच्या भेटीनंतर ॲमेझॉन कंपनीचे सीईओ अँडी जॅसी यांनी भारतातील गुंतवणुकीबाबत ही मोठी घोषणा केली. याआधी ॲमेझॉन कंपनीने भारतात ११ बिलियन डॉलर म्हणजे ११०० कोटींची गुंतवणूक केली आहे. आता कंपनी आणखी १५ बिलियन डॉलरची अर्थात भारतीय रुपयांमध्ये १५०० कोटींची गुंतवणूक करणार आहे. यानंतर ॲमेझॉन कंपनीची भारतातील गुंतवणूक २६.०० कोटीपर्यंत पोहोचेल.



**गुगलची १००० कोटींची गुंतवणूक**

दिग्गज टेक कंपनी गुगल भारतात १० बिलियन डॉलर म्हणजे सुमारे १००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. या गुंतवणुकीसह, कंपनी गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक म्हणजेच गुजरातमधील गिफ्ट सिटी येथे गुगलचं जागतिक फिनटेक ऑपरेशन सेंटर उभारण्यात येईल. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी मोदी यांची भेट घेतल्यानंतर ही माहिती दिली. पिचाई यांनी सांगितले की, गुगल कंपनी १० अब्ज डॉलर्स इंडिया डिजिटायझेशन फंडाच्या माध्यमातून भारतात गुंतवणूक करत राहील.

**एलॉन मस्क यांचेही गुंतवणुकीचे संकेत**

टेस्ला आणि ट्विटरचे सीईओ आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलॉन मस्क यांनी २१ जून रोजी मोदींची न्यूयॉर्क पॅलेस हॉटेलमध्ये पंतप्रधान मोदींची भेट घेतली. मस्क यांनी त्यांची इलेक्ट्रिक कार कंपनी टेस्ला लवकरच भारतात प्रवेश करेल आणि त्यासाठी गुंतवणूक करेल असे संकेत दिले. यासोबतच त्यांची सॅटेलाइट इंटरनेट कंपनी स्टारलिंक लवकरच भारतीय बाजारपेठेत प्रवेश करेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.



**मी मोदींचा फॅन-एलॉन मस्क**

मोदी यांच्या भेटीनंतर एलॉन मस्क यांनी भारत भेटीची इच्छा व्यक्त केली. पुढच्या वर्षी भारत दौऱ्यावर येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मी पंतप्रधानांचा फॅन असल्याचे सांगत एलॉन मस्क म्हणाले, मी भारताच्या भविष्याबाबत खूप उत्सुक आहे. जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा भारताकडे अधिक शक्यता आहेत. पंतप्रधान मोदींना भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी अनेक गोष्टी करायच्या आहेत. मोदी हीरो आहेत, नवीन कंपन्यांबाबत त्यांचा दृष्टिकोन, धोरण उदारमतवादी आहे. ते भारतात नवीन कंपन्यांचे स्वागत खुल्या हातांनी करतात. त्यामुळे मी त्यांचा फॅन आहे. यावेळी दोघांमध्ये भारतात गुंतवणूक करण्याविषयी चर्चा झाली. टेस्लाचा भारतातील कारखाना कुठे उभारणार, यावर वर्षाअखेरीस अंतिम निर्णय होईल, असे मस्क म्हणाले.

**सेमीकंडक्टरमध्ये मोठी गुंतवणूक**

मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यातील आणखी एक यश म्हणजे अमेरिकन सेमीकंडक्टर कंपनी मायक्रॉनही भारतात गुंतवणूक करणार आहे. मोदी यांच्या दौऱ्यावेळी मायक्रॉन कंपनीने गुंतवणूक आणि प्लांट उभारण्याची मोठी घोषणा केली होती. मायक्रॉन गुजरातमध्ये २.५ अब्ज डॉलर्स गुंतवणूक करणार आहे. यात सेमीकंडक्टर प्लांट उभारला जाईल. या प्लांटमध्ये सेमीकंडक्टर बनवले जाणार नाहीत, तर चिप टेस्टिंग आणि पॅकिंग केली जाईल.

**संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात योग दिवस**

या दौऱ्याचे आणखी एक विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशीच मोदी हे अमेरिकेत होते. त्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेला विनंती केल्यानंतर २०१५ पासून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा होतोय. यंदा त्याच संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात मोदींच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसार माध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)*




### केंद्रिय मंत्री नारायण राणे यांचे मत, 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळकटी

# सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग ग्रामीण भागात सुरू व्हावेत

**सरकारने सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) विभागासाठी सुमारे २३ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून अधिकाधिक उद्योगांच्या स्थापनेसाठी विविध योजना तयार केल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी एमएसएमई विभाग कार्यरत असून या योजना ग्रामीण भागात पोहोचल्या पाहिजेत, तेथे उद्योग सुरू झाले पाहिजेत,असे मत केंद्रिय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी व्यक्त केले. तर एमएसएमईला चालना देण्यासाठी सिंधुदुर्ग येथे तंत्रज्ञान केंद्र आणि विस्तारित केंद्रांसाठी राज्यात १५ विविध ठिकाणी जागा निश्चित केल्याचीमाहती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.**

**प्रतिनिधी.**

महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी ५ जून २०२३ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, केंद्रीय अतिरिक्त सचिव तथा विकास आयुक्त डॉ. रजनीश, सहसचिव अतिश सिंह, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

### महाराष्ट्रात एमएसएमई उद्योगांना सर्वतोपरी सहकार्य
### - केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे

केंद्रिय मंत्री राणे म्हणाले, उद्योगांना आकर्षित करण्यासाठी सवलती दिल्यास उद्योग महाराष्ट्रात येतील. त्यातून राज्याचा विकास दर, दरडोई उत्पन्न आणि सकल उत्पन्नात वाढ होईल. त्यादृष्टीने महाराष्ट्रात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. एमएसएमई उद्योग विभागासाठी शासनाने सुमारे २३ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. विभागाने उद्योगांच्या स्थापनेसाठी विविध योजना तयार केल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी विभाग कार्यरत असून या योजना ग्रामीण भागात पोहोचल्या पाहिजेत. तेथे उद्योग सुरू झाले पाहिजेत. मूल्यवर्धित उत्पादनांची माहिती उद्योग विभागाने तरुणांना देऊन प्रगत तंत्रज्ञानावर आधारित उद्योग महाराष्ट्रात येतील यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन राणे यांनी केले. खासगी जमिनीवर उद्योगाची परवानगी देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे असे सांगून बंद पडलेल्या उद्योगांचे सर्वेक्षण करा आणि ते सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या



सूचनाही त्यांनी उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. याप्रसंगी उद्योग विभागाच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या उपक्रमांचे आणि केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रम विभागाच्या योजनांची माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले.

### खादी ग्रामोद्योगच्या वस्तू विक्रीसाठी पालिका जागा देणार - मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, एमएसएमई उद्योगांची क्षमता मोठी असून ते प्रत्येक क्षेत्रासाठी फायदेशीर ठरत आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासातही एमएसएमई उद्योगांचे महत्त्वाचे योगदान आहे. एमएसएमई क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी सिंधुदुर्ग येथे तंत्रज्ञान केंद्राला जागा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तर विस्तारित केंद्रांसाठी १५ विविध ठिकाणी जागा निश्चित केल्या आहेत. काथ्या (कॉयर) उद्योग केंद्रासाठी कुडाळ येथे इमारत आणि खादी ग्रामोद्योगच्या वस्तू विक्रीसाठी मोठ्या शहरांमध्ये पालिकेच्या जागा दिल्या जातील. उद्यम नोंदणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून २९ लाखांहून अधिक उद्योगांनी एमएसएमई पोर्टलवर नोंदणी केल्याची माहिती शिंदे यांनी दिली.








### समृद्धी ठरणार विकासाचा महामार्ग

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, महाराष्ट्र हे पायाभूत सुविधांमध्ये देशात प्रथम क्रमांकाचे राज्य असून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूला १८ नोड उभारण्यात येत आहेत. यात एमएसएमई उद्योग सुरू करुन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. एमटीएचएल, मुंबई-पुणे महामार्ग विकासाचे राजमार्ग ठरणार आहेत. यामुळे उद्योग त्यातून उत्पादने आणि त्यांची निर्यात वाढण्यास मदत होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टपूर्तीमध्ये महाराष्ट्र राज्याने एक ट्रिलियनचा सहभाग देण्याचा निश्चय केला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.




### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'लोकशाही संवाद २०२३' मध्ये माहिती

# देशातील सर्वाधिक पायाभूत प्रकल्प महाराष्ट्रात

**दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत यंदा विक्रमी १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले आहेत. या करारांपैकी २५ टक्के उद्योगांना जमिनी देण्याची प्रक्रिया सुरु आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सुमारे ५० कोटी रुपयांचा निधी वाटप करण्यात आला असून गरजू लोकांना वेळेत मदत पोहचवण्याच काम राज्य सरकारने केले आहे. मुंबईसह राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यात येत असून देशातील सर्वाधिक पायाभूत प्रकल्प महाराष्ट्रात सुरु असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली.**

**- प्रतिनिधी.**

लोकशाही मराठी या वृत्तवाहिनीद्वारे आयोजित 'लोकशाही संवाद २०२३' या विशेष कार्यक्रमात २० एप्रिल रोजी मुख्यमंत्री बोलत होते. लोकशाही मराठी वृतवाहिनीचे संपादक कमलेश सुतार यांनी या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांशी राज्यातील विविध विषयांवर संवाद साधला. यावेळी शिंदे यांनी राज्याच्या विकासाचा रोडमॅपच सादर केला. तर या मुलाखतीतून राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी सरकारची कटिबद्धता दिसून आली.

### मेट्रोमुळे वेळेची बचत

मुख्यमंत्री म्हणाले, आमचे सरकार आल्यापासून प्रलंबित कामे मार्गी लावले आहेत. पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती दिली. समृद्धी महामार्ग, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, मेट्रो प्रकल्पांना चालना दिली. मेट्रो कारशेडच्या प्रकल्पावर मार्गी लावले. मेट्रोचे जाळे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावरील लाखो खासगी वाहने कमी होतील. परिणामी लोकांचा वेळ, खर्च वाचेल आणि प्रदूषण कमी होईल. राज्यातील विकास प्रकल्प पूर्ण करीत आहोत.

### पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना फायदा

पायाभूत सुविधा प्रकल्प मुंबई आणि आजूबाजूलाच का आणि त्याचा शेतकरी आणि सर्वसामान्यांना फायदा काय असा प्रश्न उपस्थित केला असता त्यावर उत्तर देतांना मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील चार नोड्सला जोडणारा हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग सुरु केला आहे. या महामार्गामुळे नागपूरचा संत्रा उत्पादक शेतकरी कमी वेळेत थेट मुंबईच्या बाजारपेठेत आपला माल आणू शकणार आहे. समृद्धी महामार्ग हा गेमचेंजर प्रकल्प आहे. या भागातील कृषी उत्पादनावर प्रक्रियेसाठी उद्योग, कृषी प्रक्रिया प्रकल्प, लॉजिस्टीक पार्क अशा विविध सुविधा उभारल्या जात असून त्यातून मोठी साखळी तयार होत आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल,




रोजगार वाढेल.

### एमटीएचएल प्रकल्प वरळी, कोस्टल रोडला जोडणार

राज्यात ५ हजार किलोमीटरचे रस्ते तयार केले जात असून त्याचा विकास आराखडा तयार करीत आहोत. रस्त्यांचे जाळे निर्माण केले जात आहे. मुंबईपुरताच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्राचा सर्वसमावेशक विकास करण्याचे काम हाती घेतले आहे. त्याचा शेतकरी, सर्वसामान्यांना फायदा होणार आहे. सर्वाधिक पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरु करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. एमटीएचएल प्रकल्प वरळी आणि कोस्टल रोडला जोडणार आहोत, त्यामुळे नरिमन पॉईंट येथून चिर्ले, रायगडजवळ दोन तास नव्हेतर फक्त १५ मिनिटात पोहोचता येणार आहे.

### दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २१ हजार रुपये मिळणार

मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, बळीराजाला केंद्रबिंदू माणून राज्य शासन काम करत आहे. नैसर्गिक आपत्ती काळातील नुकसानग्रस्तांना एनडीआरएफचे २ हेक्टरचे निकष बदलून ३ हेक्टर केले आणि शेतकरी आपत्तीग्रस्तांना मदत दिली. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले. शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये देण्याच्या केंद्र सरकारच्या योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने नमो सन्मान योजना सुरु केली. त्यातून शेतकऱ्यांना राज्याकडून ६ हजार रुपये समाविष्ट केले. यासह १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील प्रती व्यक्ती १८०० रुपये दिले जाणार असून एका कुटुंबात पाच व्यक्ती असल्यास त्यांना केंद्र व राज्य शासनाचे मिळून एकूण २१ हजार रुपये शेतकऱ्याला मिळणार आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### ६ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये एका क्लिकवर पैसे

शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याबाबत उपस्थित प्रश्नाला उत्तर देतांना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील ६ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये एकाच क्लिकवर एकाच दिवशी पैसे पाठविण्यात आले. आनंदाचा शिधा' ने गोरगरिबांची दिवाळी, पाडवा गोड केला. हा शिधा वाटप कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपर्यंत राबविला. राज्यात ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया सुरु आहे. लोकहिताचा निर्णय घेतले जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारचा पाठिंबा

राज्यातील महिला व ज्येष्ठ नागरिकांना सोयीसुविधा दिल्या जात आहेत. केंद्राकडून राज्यातील प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांची मदत मिळत आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारचा पाठिंबा मिळत आहे. राज्याचा सर्वांगीण विकास हाच राज्य शासनाचा अजेंडा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### गुंतवणूकदारांना जमिन वाटप सुरू

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, यंदा दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले आहेत. या करारांपैकी २५ टक्के उद्योगांना जमिनी देण्याची प्रक्रिया सुरु आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सुमारे ५० कोटी रुपयांचा निधी वाटप करण्यात आला असून गरजू लोकांना वेळेत मदत पोहचवण्याच काम राज्य सरकारने केले आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

■■

**अनुभवी बोल!**

थोरा-मोठ्यांचे अनुभवी बोल हे औषधी वनस्पतीसारखे असतात. विकृत कल्पनांच्या व्याधी ते मुळासकट निपटून टाकतात. द्वेष ही अशीच व्याधी आहे. व्याधींच्या मृगजळामागे धावताना देवादिकांची वैभवी राज्यसुद्धा धुळीस मिळाली असे पुराणात उल्लेख आढळतात. प्रेम आणि संयम हा खरा धर्म आहे. हा धर्म आपण डोळसपणे पाळला पाहिजे.






## उद्योग विभागाचा रिन्यु पावरसोबत सामंजस्य करार

# ५०० एकरवर प्रकल्प, २० हजार कोटीची गुंतवणूक, १० हजार रोजगार

राज्यातील उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा, कुशल मणुष्यबळ, उत्तम कनेक्टिव्हीटी आणि शासनाचे उद्योगास अनुकूल धोरणांमुळे महाराष्ट्रात गुंतवणूकीचा ओघ वाढतच आहे. गेल्या काही दिवसात उर्जा क्षेत्रातील गुंतवणूकदार राज्याला पसंती देत असून शुक्रवार, २४ जून रोजी भारतासह जगभरात अपारंपारीक उर्जा क्षेत्रात कार्यरत मे. रिन्यू पॉवर लि. आणि शासनाच्या उद्योग विभागात सामंजस्य करार करण्यात आला. कंपनी नागपूर येथे ५०० एकर जागेवर सुमारे २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार अरहे. प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे ८,००० ते १०,००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. प्रकल्प उभारल्यानंतर प्रकल्पाशी संबंधित असलेल्या उद्योग म्हणजेच एन्सीलरी युनिट्सच्या माध्यमातून रु. २००० कोटींची अतिरिक्त गुंतवणूक होणार आहे. विशेष म्हणजे रिन्यु पावर ही नॅसडॅक लिमीटेड कंपनी आहे.

-प्रतिनिधी.

जिवाश्मांवर आधारीत इंधनांचे साठे मर्यादीत असल्याने तसेच ते पर्यावरणाचा ऱ्हास करत असल्याने अपारंपारीक (नवीनीकरण) उर्जा स्त्रोतांना महत्त्व दिले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत ५०० गॅगावॅट उर्जा निर्मिती अपारंपारीक उर्जा स्त्रोतातून करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ते पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाही प्रयत्नांनाही वेग आला आहे. २३ जून रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे मे. रिन्यू पॉवर लि. आणि उद्योग विभाग यांच्यात करण्यात आलेला सामंजस्य करार या प्रयत्नांचेच द्योतक आहे. याप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आणि रिन्यू पॉवर प्रा. लि. यांच्या वतीने डॉ.अमित पैठणकर उपस्थित होते.

### २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

मे. रिन्यू पॉवर लि., दिल्लीमार्फत १० गिगावॅट मेटालर्जिकल ग्रेड सिलिका, १० गिगावॅट पॉलिसिलीकॉन, ६ गिगावॅट इनगॉट/वेफर निर्मिती सुविधा आणि १ गिगावॅट मॉड्युल निर्मितीची सुविधा नविकरणीय ऊर्जा ब्लॉकसह एकात्मिक प्रकल्प स्थापित करणार आहे. हा प्रकल्प नागपूर येथे सुमारे ५०० एकर जागेवर स्थापित होणार आहे. प्रस्तावित प्रकल्पात २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे ८,००० ते १०,००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. प्रकल्प उभारल्यानंतर प्रकल्पाशी संबंधित असलेल्या उद्योगांच्या माध्यमातून रु. २००० कोटींची अतिरिक्त गुंतवणूक होणार आहे. रिन्यु पावर ही नॅसडॅक लिमीटेड कंपनी आहे, हे विशेष.

### उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण

याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याची

आर्थिक परिस्थिती सक्षम आहे, उद्योग वाढीसाठी पूरक वातावरण आहे. राज्यात अनेक मोठे प्रकल्प येत आहेत. त्याचप्रमाणे इथे आलेले अनेक प्रकल्प अल्पावधीतच मोठे झाले आहेत. कारण उद्योग वाढीसाठी लागणारे पूरक वातावरण राज्यात उपलब्ध आहे. आर्थिक परिस्थिती कोविड काळातही स्थिर होती. रिन्यु पॉवर या कंपनीचा प्रस्तावित प्रकल्प हा नागपुरात येत असल्याने विशेष सहकार्य करण्यात येईल. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उद्योग विभागाच्या प्रयत्नाने होत असलेल्या या सामंजस्य कराराचे विशेष स्वागत केले. नविनीकरण (रिन्यूएबल) ऊर्जा क्षेत्रात उद्योग वाढीसाठी लागणारे सर्व सहकार्य करण्यात येईल, असे फडणवीस म्हणाले.

### नव्या पर्वाला सुरूवात

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी या सामंजस्य कराराच्या माध्यमातून नविनीकरणीय ऊर्जा क्षेत्रात एका नव्या पर्वाला सुरुवात होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. कराराच्या माध्यमातून राज्यात होत असलेली गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यासंदर्भात प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी माहिती दिली. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मलिकनेर, मे. रिन्यू पॉवर प्रा. लि.चे प्रमुख तांत्रिक अधिकारी सर्वनंट सेण्ट, मुख्य कार्यकारी अधिकारी मार्कम सिकमोक उपस्थित होते. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि सामंत यांच्या उपस्थितीत स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest- EoI) करण्यात आला. मे. रिन्यू पॉवर प्रा. लि. यांच्या वतीने समूह अध्यक्ष डॉ. अमित पैठणकर व राज्य शासनाच्या वतीने प्रधान सचिव उद्योग डॉ. हर्षदीप कांबळे यांनी स्वारस्य अभिव्यक्तीवर स्वाक्षरी केली.

### रिन्यु पावर विषयी

२०११ मध्ये स्थापन झालेली रिन्यु पावर ही भारतातील अग्रगण्य अक्षय ऊर्जा कंपन्यांपैकी एक आहे. जसदन, गुजरातमध्ये २५.२ मेगावॅटच्या पवन प्रकल्पासह काम सुरू केल्यापासून, कंपनीने अल्पावधित विस्तार केला. प्रस्तावित आणि काम सुरू असलेल्या प्रकल्पांसह कंपनीची १३ गेगावॅट पेक्षा जास्त नूतनीकरणयोग्य मालमत्ता बेस आहे. ऑक्टोबर २०१९ मध्ये, रिन्यु ही ५ गॅगावॅट स्थापित क्षमता ओलांडणारी भारतातील पहिली आणि जागतिक स्तरावरील १० अक्षय उर्जा कंपनी बनली. कंपनीच्या ऑपरेशनच्या १० वर्षांमध्ये, रिन्यू प्रोजेक्ट्सने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे अनेक रोजगार निर्माण केले आहेत. २०१९-२० मध्येकंपनीने भारतात निर्माण झालेल्या एकूण विजेच्या सुमारे 1% योगदान दिले आणि एका वर्षात कार्बन उत्सर्जन ०.५ % कमी करण्यात मदत केली. कंपनीचे पवन आणि सौर ऊर्जा प्रकल्प भारतातील नऊ राज्यांमध्ये आहेत. तर देशातील १८ राज्यांमधील ८० शहरांमध्ये शेकडो बिझनेस सेटअप साइट्स कार्यरत आहेत. ■■



*मा.ना.श्री.उदयजी सामंत, उद्योगमंत्री यांना उद्योग संचालनालयाच्या अधिकारी यांच्या बैठकीमध्ये उद्योजक मासिकाबद्दल माहिती देतांना मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से. विकास आयुक्त (उद्योग) व सोबत मा.श्री.राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से. व्यवस्थापकीय संचालक, एम.एस.एस.आय.डी.सी.दिसत आहेत.*



## औद्योगिक संघटनांच्या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन

# पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कटिबद्ध

**राज्याच्या विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या वतीने अनेक योजना राबविण्यात येत आहेत. यात प्रामुख्याने स्वयंरोजगाराच्या निर्मितीसह युवकांना नोकरीची व्यापक संधी निर्माण व्हावी यावर भर आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेच्या माध्यमातून राज्यात जास्तीत जास्त नवउद्योजक निर्माण करण्यावर सरकारचा प्रयत्न आहे. पायाभूत सुविधा कोणत्याही क्षेत्राच्या उद्योगवाढीसाठी आवश्यक असून यादृष्टीनेही टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जात आहे. या सुविधांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. नांदेड विमानतळ उद्योग विभाग तीन महिन्यांत सुरू करण्याची घोषणाही त्यांनी केली.**

**- प्रतिनिधी**

नांदेड येथील उद्योग भवन येथे ८ जून २०२३ रोजी जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत आयोजित बैठकीत उदय सामंत बोलत होते. सामंत म्हणाले, रोजगारनिर्मिती व उद्योग-व्यवसाय यासाठी आर्थिक बाजूही असावी लागते. युवकांच्या प्रकल्पाप्रमाणे त्यांना वित्त व कर्जपुरवठा व्हावा यादृष्टीने काही अडचणी असतील तर त्याही प्राधान्याने विचारात घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. बँकेचे अधिकारी व नवउद्योजक यांचा समन्वय साधून जागेवरच अडचणी दूर करण्यासाठी मेळावा आयोजित करावा असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

उपस्थित उद्योजकांच्या शिष्टमंडळाने ग्रामपंचायत व एमआयडीसीलाही वेगवेगळ्या पद्धतीने कर द्यावा लागतो याकडे उद्योगमंत्री उदय सामंत यांचे लक्ष वेधले. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांचा सहभाग असलेली समिती नेमण्यात येईल. या समितीच्या निर्णयानुसार उद्योजकांना भराव्या लागणाऱ्या कराच्या रकमेवर निर्णय घेण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले. यावेळी औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांनी त्यांच्या अडचणी मांडल्या. त्यांचे निराकरण करण्यासाठी सामंत यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. याप्रसंगी खासदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, एमआयडीसीच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली मुळे, प्रादेशिक अधिकारी धनजंय इंगळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे व उद्योजक शैलेश कऱ्हाळे, आनंद बिडवई, बंगाली, महेश देशपांडे व विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी व इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थिती होती.

### नांदेड विमानतळ ३ महिन्यांत सुरू करू

नांदेड येथील विमानतळाच्या सेवा-सुविधांबाबत सर्व स्तरांतून तक्रारी येत आहेत. लातूर, हिंगोली, परभणी, बिदर या अशा पाच जिल्ह्यांतील प्रवाशांसाठी येथील विमानतळाची सुविधा गरजेची आहे. याचबरोबर नांदेड येथील शिख भाविकांची जगभरातून वर्दळ सुरू असते. एका बाजूला मोठ्या संख्येने विमान प्रवासी असूनही येथील विमानतळाच्या कुशल व्यवस्थापनाअभावी येथील प्रवासी विमान सुविधा बंद पडली. सदर विमानतळ चालविणाऱ्या एजन्सीने यात तात्काळ सुधारणा केल्या नाहीत तर राज्याच्या उद्योग विभागामार्फत इतर विमानतळांच्या धर्तीवर नांदेड विमानतळ उद्योग विभाग येत्या तीन महिन्यांत सुरू करू, अशी घोषणा सामंत यांनी केली. एमआयडीसीमार्फत राज्यातील अनेक ठिकाणी सक्षमपणे विमानतळाचे व्यवस्थापन केले आहे. नांदेड विमानतळाबाबत अनेकांच्या तक्रारी लक्षात घेता यात तात्काळ सुधारणा करणे गरजेचे आहे. येथील कामे तात्काळ सुरू न झाल्यास या विमानतळाचे व्यवस्थापन आमच्याकडे घेऊन आम्ही अधिक सक्षमतेने चालवून प्रवाशांना सुविधा देऊ असे त्यांनी स्पष्ट केले. नांदेड विमानतळाच्या सुविधांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.




### सिंधिया यांच्याशी चर्चा

नांदेडसह मराठवाडा विकासाच्या दृष्टीने हे विमानतळ खूप महत्त्वाचे आहे. येथील निर्यातीला मोठ्या प्रमाणात यातून चालना मिळू शकते. विमानसेवा पूर्ववत सुरू झाल्यास सुमारे पाच जिल्ह्यांतील प्रवाशांना याचा लाभ होणार आहे. केवळ येथील व्यवस्थापनाच्या चुकीमुळे जर जनतेच्या सुविधेला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होणार असेल, तर यात बदल करणे आवश्यक असल्याचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले. याबाबत नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्यासमवेत मी चर्चा केली आहे. त्यांनी याबाबत नागरी विमान वाहतूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने लक्ष घालण्याच्या सूचना केल्या आहेत, असे खासदार चिखलीकर यांनी सांगितले.

### सूचनांकडे दुर्लक्ष

विमानतळाच्या सेवा-सुविधांबाबत संबंधित व्यवस्थापनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बट्ट यांना वारंवार सूचना करूनही याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. विमानतळाच्या सुविधा सक्षम नसल्याने इतर विमान वाहतूक कंपन्या पुढे यायला तयार नाहीत. येथील व्यवस्थापनाच्या



### सुवर्णसंधीचा लाभ घ्या - छत्रपती उदयनराजे भोसले

खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले की, उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम केल्यास यश नक्की मिळते. संधी एकदाच मिळते त्याचा फायदा घेता आला पाहिजे. आज तरुणांना सुवर्णसंधी आहे. युवकांच्या विकासासाठी व चांगले रोजगार मिळावेत यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन व सहकार्य करू. युवकांनीही याचा फायदा घ्यावा. कष्ट करण्यात कमी पडू नये, वेळ वाया घालवू नये, पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही, याची काळजी घ्यावी. आमची मान अभिमानाने ताठ होईल इतकी उंची गाठा आणि साताराच्या वैभवात भर घाला.

दुर्लक्षामुळे अडचणी वाढल्या आहेत. ज्या चांगल्या स्थितीत हे विमानतळ संबंधित एजन्सीकडे सुपूर्द करण्यात आले होते ती स्थिती आज राहिली नसून व्यवस्थापनाच्या गलथान कारभाराबद्दल खासदार हेमंत पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. आमदार बालाजी कल्याणकर, आमदार डॉ. तुषार राठोड यांनी यात लक्ष देण्याचा आग्रह केला.

### युवकांनी रोजगार देणारे बनावे

युवकांनी रोजगार शोधण्यापेक्षा रोजगार देणारे बनावे. यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन सामंत यांनी केले. सातारा येथे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले मित्र परिवारामार्फत यशोदा टेक्निकल कॅम्पस, वाढे येथे २१ मे रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात सामंत बोलत होते.

सामंत म्हणाले, सामान्य कुटुंबातील युवकांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. तरुणाईच्या हाताला रोजगार देणे ही सर्वांची जबाबदारी आहे. जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम गावांगावांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. गेल्या १० महिन्यांत उद्योग विभागाने या योजनेच्या माध्यमातून १३ हजार उद्योजक उभे केले आहेत. तसेच उद्योगांसाठी या काळात ५५० कोटींचे अनुदान दिले आहे. यावर्षी किमान २५ हजार उद्योजक उभे करण्याचे उद्दिष्ट आहे.



### सातारा जिल्ह्यात आयटी पार्क उभारणार

सातारा जिल्ह्यातील उद्योगांच्या वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून सामंत पुढे म्हणाले की, जिल्ह्यात आयटी पार्क उभारण्यात येईल. कामगारांसाठी रुग्णालय उभारू, त्यासाठी लागणारी जागा उद्योग विभागाकडून देण्यात येईल. सातारा एमआयडीसीसाठी पंधरा दिवसांत प्रादेशिक अधिकारी देण्यात येईल, तसेच विद्यार्थ्यांना चांगले कौशल्य आत्मसात करता यावे, यासाठी स्किल सेंटरही उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी दुर्गम व डोंगरी भागातही अशा प्रकारचे मेळावे आयोजित करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

### सुवर्णसंधीचा लाभ घ्या - छत्रपती उदयराजे भोसले

खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले की, उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम केल्यास यश नक्की मिळते, संधी एकदाच मिळते, त्याचा फायदा घेता आला पाहिजे, आज तरुणांना सुवर्णसंधी आहे. युवकांच्या विकासासाठी व चांगले रोजगार मिळावेत यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन व सहकार्य करू. युवकांनीही याचा फायदा घ्यावा. कष्ट करण्यात कमी पडू नये, वेळ वाया घालवू नये, पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही, याची काळजी घ्यावी. आमची मान अभिमानाने ताठ होईल इतकी उंची गाठा आणि साताराच्या वैभवात भर घाला.

यावेळी रोजगार मेळाव्यामध्ये नोकरीची संधी मिळालेल्या उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. तसेच जिल्हास्तरीय लघुउद्योग पुरस्कारांचे वितरण व मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातील लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात कर्जवाटपाचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. ■■



### ९५ हजार कोटींची गुंतवणूक, ३.५ लाख रोजगार, १० लाख कोटी निर्यातीचे उद्‌दिष्ट

# हायटेक महाराष्ट्रासाठी नवीन आयटी धोरण

**महाराष्ट्र राज्य हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक राज्यात येते, निर्यातीतही राज्य अग्रेसर आहे. उद्योगासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ यांची उपलब्धता यामुळे जागतिक गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे नेहमीच पसंतीचे ठिकाण राहिले आहे. स्टार्टअप व इनोव्हेशन या क्षेत्रांतही राज्याने आघाडी घेतली आहे. सर्वांत जास्त स्टार्टअप व इनोव्हेशन प्रकल्प राज्यात आहेत. या नव्या संकल्पना आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नावीन्यतेला चालना देऊन महाराष्ट्र राज्याला 'ज्ञान नेतृत्व अर्थव्यवस्था' म्हणून स्थापित करण्यासाठी आता राज्याने नवे माहिती आणि तंत्रज्ञान धोरण जाहीर केले आहे.**

**डॉ. आरतीश्यामल जोशी**

नव्या माहिती तंत्रज्ञान धोरणामुळे ९५ हजार कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्‌दिष्ट असून याद्वारे साडेतीन लाख एवढ्या रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. तसेच १० लाख कोटी एवढ्या निर्यातीचे लक्ष्य साध्य करण्याचे लक्षांक ठेवण्यात आले आहे. सर्वंकष धोरण तयार व्हावे आणि आयटी क्षेत्रातील उद्योजकांच्या आवश्यकतेनुसार नवे आयटी धोरण तयार व्हावे म्हणून मागील काही वर्षांत ३२ बैठका, २ चर्चासत्रे व ५ सादरीकरण झाले. त्याचप्रमाणे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध भागधारकांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली.

झालेली चर्चा तसेच यापूर्वीची माहिती तंत्रज्ञान धोरणे राबविताना विभागाला आलेल्या अनुभवाच्या आधारे, महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा - २०२३ चे प्रारूप तयार करण्यात आले. दोन वर्षे रखडलेल्या धोरणाला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अंतिम स्वरूप दिले.

### इज ऑफ डुईंग बिझिनेसला मिळेल प्रोत्साहन

**सिंगल टेक्नॉलॉजी इंटरफेस :** राज्यात व्यवसाय करताना व्यवसायिकांना कोणतीही अडचण येऊ नये आणि व्यवसायवाढीत सुलभता असावी यासाठी माहिती तंत्रज्ञानामध्ये इज ऑफ डुईंग बिझिनेसला प्रोत्साहन देण्यात येत आहे. राज्य शासन माहिती तंत्रज्ञान इंटरफेस (MAHITI) सुरू करणार आहे. त्याद्वारे कालबद्ध मंजुरी, घटक नोंदणी, प्रोत्साहन आणि इतर विस्तार सेवा आणि मैत्रीद्वारे सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**स्टार्टअप व इनोव्हेशन :** उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नावीन्येतला चालना देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला 'ज्ञान नेतृत्व अर्थव्यवस्था' म्हणून स्थापित करण्याकरिता महाराष्ट्र हब (M-Hub) उपक्रम आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, नवउद्यमशील घटक, उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील उबवण केंद्र (incubation center) यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता ५०० कोटी एवढा निधी उभारण्यात येणार आहे.

**वॉक टू वर्क :** राज्यातील माहिती तंत्रज्ञान उद्याने व माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण विकसित करण्याकरिता पात्रता निकष आणि क्षेत्र वापरविषयक निकष शिथिल करण्यात येणार आहेत. भविष्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. म्हणजेच अगदी (वॉक टू वर्क) चालत जाऊन कार्यालयात पोहोचता येणार आहे, प्रवासाची दगदग वाचेल, वेळ वाया जाणार नाही. त्यामुळे कुटुंबाला अधिक वेळ देता येणार आहे.

**भविष्यातील कौशल्ये :** भविष्यातील रोजगारक्षमता आणि कौशल्यांना प्रोत्साहन देण्यावर या धोरणात भर देण्यात आला आहे. भविष्यात आयटी क्षेत्रात काम करण्यासाठी वेगळ्या प्रकारची कौशल्ये लागणार आहेत. (एआय जॉब) कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संशोधन वैज्ञानिक, सोल्यूशन आर्किटेक्ट, डेटा वैज्ञानिक, ऑप्टिकल वैज्ञानिक, एम्बेडेड सोल्यूशन्स अभियंता यासारखे सुपर स्पेशलाइज्ड नोकरीच्या भूमिकेत मान्यताप्राप्त कर्मचारी असलेल्या कंपन्यांना यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

**टॅलेंट लॉंच पॅड :** राज्यभरातील माहिती तंत्रज्ञान व माहिती क्षेत्रासाठी 'टॅलेंट लॉंचपॅड' विकसित करण्यासाठी उद्योग विभाग, कौशल्य विकास विभाग आणि उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग एकत्रितरीत्या काम करतील. सध्याची महाविद्यालये, कौशल्य संस्था व कौशल्य अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारी प्रशिक्षण केंद्रे यांच्यासाठी स्पर्धा आयोजित केल्या जातील आणि हेकेथॉनद्वारे मदत केली जाईल.

**प्रादेशिक विकास :** झोन-१ वगळता इतर प्रादेशिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी या क्षेत्राच्या शाश्वत व संतुलित प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच मोठ्या माहिती तंत्रज्ञान घटकांसह सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या वाढीस सहाय्य करण्यासाठी हस्तक्षेप करण्यात येईल.

**उद्योगाधारित कार्यप्रणाली / संरचना :** महाराष्ट्र हब (M-Hub) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Operating Officer) यांची महाराष्ट्राचे तंत्रज्ञान राजदूत (Technology Ambassador) म्हणून नियुक्ती करण्यात येईल. त्यांच्याद्वारे खाजगी क्षेत्राच्या दृष्टिकोनातून धोरण आणि कार्यप्रदर्शन आदेशाचे (Performance Mandate) प्रतिनिधित्व आणि व्यवस्थापन करणे व राज्याच्या माहिती तंत्रज्ञान उद्योगामध्ये जागतिक सर्वोत्तम पद्धती राबविण्यात येतील.

**कामगिरीचे सनियंत्रण :** जागतिक बाजारपेठेच्या गतिशीलतेशी जुळवून घेण्यासाठी या धोरणाच्या कामगिरीचा शक्तीप्रदान समितीमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. समितीमार्फत जागतिक मागणी तसेच महाराष्ट्राची भविष्यातील गरज ओळखून धोरणामध्ये आवश्यक त्या सुधारणा वेळोवेळी करण्यात येतील.

**एव्हीजीसी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रास सहाय्य :** राज्याच्या एव्हीजीसी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रास (AL-ML, Big Data, Robotics etc.) विशिष्टपणे सहाय्य करण्यासाठी धोरणामध्ये आर्थिक व बिगर आर्थिक प्रोत्साहनांचा अंतर्भाव करून गुणवत्ता, जागा, निधी व भरती प्रक्रिया इत्यादी करिता सहाय्य करण्यात येईल.

**हायब्रिड वर्किंग :** राज्य शासनाद्वारे कामगारांच्या सहकार्याने कामकाज पार पाडण्यासाठी सक्रियपणे प्रोत्साहन दिले जाईल. शहरी केंद्रांमधील गर्दी कमी करणे, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रासाठी २४ x ७ काम करण्याची परवानगी देणे आणि कार्यालयातील नॉन-क्रिटिकल कर्मचाऱ्यांसाठी घरबसल्या कामांना मदत करणे हा यामागील उद्देश आहे.

**माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना प्रोत्साहने :**

राज्यभरात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांच्या विकासाला चालना देण्यासाठी या धोरणाद्वारे मुद्रांक शुल्क सवलत, भाडेखर्च, विद्युत खर्च, मालमत्ता कर व वीज दर इत्यादीमध्ये सवलती दिल्या जातील. रोजगारनिर्मिती होण्यासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञान घटकांना विशिष्ट प्रोत्साहने दिली जाणार आहेत.

डेटा सेंटरचे विकसन करण्यासाठी या क्षेत्राला मानक वाहनतळ निकषांपासून (standard parking norms) सूट, उद्योग आणि पायाभूत सुविधाविषयक दर्जा तसेच पात्र घटकांना खुल्या प्रवेशासाठी (Open Access) अपारंपरिक ऊर्जा मिळवण्याची आणि डेटा सेंटर पार्कसाठी कॅप्टिव्ह पॉवर प्लॉट विकसित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच वित्तीय व बिगर वित्तीय प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

उदयोन्मुख तंत्रज्ञान यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ३डी प्रिंटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि रोबोटिक्स, नॅनो-टेक्नोलॉजी इत्यादींचा समावेश असलेल्या उद्योग - ४.० यांच्या वाढीसाठी या धोरणांतर्गत थेट सहकार्य करणे, राज्यात माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांमध्ये उच्च रोजगारक्षम आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची निर्मिती सुनिश्चित करण्याकरिता या धोरणांतर्गत कौशल्य विकासाच्या अभ्यासक्रमावर (Super Specialized Job Roll) लक्ष केंद्रित करण्यात आले असून त्याकरिता कौशल्य विकास विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेशी समन्वय ठेवून कार्य करण्यात

येणार आहे.

**डिजिटल अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन :** भारताकडे अध्यक्षपद असलेल्या जी-२० राष्ट्रगटाच्या बैठका देशाच्या विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत. यात 'डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट' हा स्वतंत्र गट असून या बैठकांत डिजिटल सुरक्षितता आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासंबंधी धोरणांवर चर्चा व त्यासंबंधी धोरणे तयार करण्यासबंधी चर्चा करण्यात आली. हा गट पूर्वी डिजिटल अर्थव्यवस्था कृती गट म्हणून ओळखला जात होता. सुरक्षित, परस्परांशी जोडलेली आणि सर्वसमावेशक अशा डिजिटल अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या गटाची स्थापना २०१७ मध्ये जर्मनीच्या जी-२० अध्यक्षपदाचा एक भाग म्हणून करण्यात आली. जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेचे मूल्य ११ ट्रिलियन डॉलर्स असेल असा अंदाज आहे. २०२५ पर्यंत ते २३ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

डिजिटल क्षेत्रात जागतिक धोरणाला आकार देण्यात डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. भारताच्या जी-२० अध्यक्षतेचा एक भाग म्हणून, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे उत्तर प्रदेशातील लखनौ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान या कार्यगटाची पहिली आणि तेलंगणातील हैदराबाद येथे १७ ते १८ एप्रिल २०२३ या कालावधीत दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. तिसरी बैठक पुणे येथे १२ ते १४ जून २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

पुणे येथे झालेल्या बैठकीस जी-२० सदस्य देशांव्यतिरिक्त, भारताने बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड्स, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि संयुक्त अरब अमिराती या अतिथी देशांना आणि आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना, ओईसीडी, जागतिक बँक, युनेस्को आणि यूएनडीपी या संघटनांना डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीमध्ये अनेक कार्यशाळा, चर्चा आणि अनुभवांचे आदानप्रदान होते. लखनौमधील पहिल्या डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीच्या निमित्ताने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने अनेक द्विपक्षीय बैठका घेतल्या आणि अनेक उपक्रम सुरू केले. यामध्ये 'स्टे सेफ ऑनलाइन' मोहीम, जी-२० डिजिटल इनोव्हेशन अलायन्स, 'डिजिटल पेमेंट' मोहीम, इमर्सिव्ह डिजिटल मोबाइल व्हॅन या उपक्रमांचा समावेश होता. एकूणच डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट अजेंड्याला पूरक संकल्पनेवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल इंडियाने भारतातील अब्जावधी लोकसंख्येचे जीवन कसे बदलले आहे, हे दाखवण्यासाठी व्हर्च्युअल रिॲलिटी अनुभव केंद्रासह एक प्रदर्शनही लखनौ येथील बैठकीच्या वेळी उभारण्यात आले होते.

भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकांमधे डिजिटल परिवर्तन आणि जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नवोन्मेषला चालना देण्यासाठी आणि डिजिटल कुशल मनुष्यबळाद्वारे सुरक्षित सायबर वातावरणात सार्वजनिक सेवा प्रदान करण्यासाठी काम करण्यावर भर देण्यात येणार आहे.

पुणे येथे १२ ते १४ जून दरम्यान आयोजित 'डिजिटल इकॉनॉमी वर्किंग ग्रुप' बैठकीत डिजिटल इकॉनॉमी संदर्भातील पायाभूत सुविधांचा दैनंदिन व्यवहार, प्रशासन आणि उद्योग व व्यापार क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांबाबत चर्चा झाली. विविध देशांमधील चांगल्या संकल्पनादेखील बैठकीत मांडण्यात आल्या.

**जी-२० राष्ट्रगटाचे महत्त्व :** जी-२० हा जगातल्या प्रमुख विकसित आणि विकसनशील देशांचा राष्ट्रगट आहे. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियात १९९७ साली आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर जी-२० गट उदयास आला. जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि विकसनशील देशांना एकत्र आणण्याच्या हेतूने जी-२० संघटनेची स्थापना करण्यात आली. यात भारताशिवाय अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका अशा १९ देशांचा समावेश आहे.

जगातली ६० टक्के लोकसंख्या जी-२० सदस्य राष्ट्रांमध्ये राहते. जागतिक जीडीपीच्या ८५ टक्के जीडीपी या देशांतून येतो. जागतिक व्यापारातील ७५ टक्क्यांहून अधिक व्यापार जी-२० सदस्य देशांत एकवटला आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या दोन-तृतीयांश लोकसंख्या या देशांत आढळते. या पार्श्वभूमीवर साहजिकच या राष्ट्रगटाचे काम अतिशय महत्त्वाचे आणि प्रभावी आहे. विकसनशील आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना सामावून घेऊन जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता देणे, हा या गटाचा उद्देश आहे.

### रिझर्व्ह बँकेचे धोरण, आता येणार बिगर चलित वित्तीय कंपन्या

# खाजगी उद्योगांचा बँकिंग क्षेत्रात प्रवेश




**खाजगी क्षेत्रातील उद्योगांना आता बँक सुरू करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. चार महिन्यांपूर्वीच या उद्योगांना बँका सुरू करण्यासाठी आरबीआयने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. या बँका बिगर चलित वित्तीय कंपन्या म्हणून ओळखल्या जातील. शासनाच्या धोरणाचा फायदा घेत लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो, अनिल अंबानी समूहातील रिलायन्स, टाटा, इंडियाबुल्स, रेलीगेअर यासारख्या कंपन्या या क्षेत्रात येण्यास उत्सुक आहेत. मागच्या दोन दशकांमध्ये रिझर्व्ह बँकेने १२ ते १५ कंपन्यांना बँक परवाने दिले होते. त्याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. - हेमंत देसाई**

खासगी उद्योगांना बँक क्षेत्रात नव्याने प्रवेश सुकर करण्याचा रस्ता पुन्हा एकदा खुला झाला आहे. खासगी उद्योगांना नवे बँक परवाने देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे चार महिन्यांपूर्वी रिझर्व्ह बँकेने जारी केली. त्यानुसार खासगी क्षेत्रासह सार्वजनिक तसेच बिगर बँकिंग वित्तीय संस्थांमधील भागीदार समूह किंवा कंपन्याही यासाठी पात्र असतील. नव्या बँकांना बिगर बँक क्षेत्रात (म्हणजे जेथे बँकाच नाहीत तेथे) त्यांच्या एकूण शाखांपैकी २५% शाखा सुरू करणे बंधनकारक ठरेल. नव्या बँकांमध्ये विदेशी भागीदारी राखण्याचे प्रमाण ४९% ठेवण्यात आले आहे.

या नवीन खासगी बँकांचे किमान वसूल भागभांडवल (पेडअप कॅपिटल) हे ५०० कोटी रुपयांचे असावे लागेल. नवीन बँक उभारण्यासाठी परवाना प्राप्तीकरिता संबंधित खासगी उद्योग क्षेत्राकडे किंवा कंपनीकडे किमान दहा वर्षांचा व्यवसाय अनुभव गाठीशी असायला हवा, अशी अट घालण्यात आली आहे. देशातील ग्राहकांची त्याचप्रमाणे व्यापारी व उद्योजकांची भांडवली गरज वाढत असून, त्यांना विविध सेवा द्याव्या लागतात. त्यामुळे त्यांना उत्तेजन देतानाच, नियमांच्या सूत्रात आणण्याची आवश्यकता आहेच. बिगर बँकिंग वित्त संस्थांप्रमाणे, नव्या परवानासाठी पात्र ठरणाऱ्या खासगी बँकांना 'बिगर चलित वित्तीय कंपनी' म्हणून संबोधण्यात येते. खासगी बँक क्षेत्रात नव्याने शिरकाव करण्यासाठी लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो, अनिल अंबानी समूहातील रिलायन्स, टाटा, इंडियाबुल्स, रेलीगेअर इत्यादी कंपन्या उत्सुक आहेत. बहुतेक कंपन्या वित्तीय सल्लागार, म्युच्युअल फंड, ब्रोकरेज आदी क्षेत्रांत कार्यरत आहेत. मागच्या दोन दशकांमध्ये रिझर्व्ह बँकेने १२ ते १५ कंपन्यांना बँक परवाने दिले आहेत. कोटक महिंद्रा, फेडरल बँक वगैरेंचा त्यात समावेश आहे. एचडीएफसी, आयसीआयसीआय बँक या खासगी क्षेत्रातील प्रसिद्ध बँका आहेत. रिझर्व्ह बँकेने रेपो दर वाढवल्यानंतर बँकेच्या मुदत ठेवीवरच्या व्याजदरात वाढ होऊ लागली आहे. देशातील दुसरी सर्वात मोठी खासगी बँक असलेल्या आयसीआयसीआय बँकेने बल्क एफवरील व्याजदर पाव टक्क्याने वाढवला आहे. ही बँक आता १५ महिन्यांच्या एफडीवर सव्वासात टक्के व्याज ग्राहकांना देते. सध्या राष्ट्रीयीकृत बँकांची परिस्थिती खूपच चांगली आहे. सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना मिळून दोन लक्ष ४० हजार कोटी रुपयांचा एकत्रित सकल नफा झालेला आहे. त्यांचा निव्वळ नफा तर एक लाख कोटी रुपयांवर गेला आहे. निव्वळ नफ्यातील ही वाढ घसघशीत अशी ५७% ची आहे. सकल थकित कर्ज एकूण वितरित रकमेच्या पाच टक्क्यांपेक्षाही कमी आहे, तर निव्वळ थकित कर्जाचे प्रमाण सव्वा टक्के आहे. २०१७-१८ पासून सलग चार वर्षे राष्ट्रीयीकृत बँका तोट्यात होत्या. त्यांच्या कर्जाची थकबाकी दहा लाख कोटी रुपयांवर गेली होती; पण त्यामुळे लगेच हुरळून जाण्याचे कारण नाही. रिझर्व्ह बँकेने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या संचालकांच्या बैठकीत आत्मसंतुष्टता व शैथिल्य यापासून दूर राहा आणि आपली थकित कर्जे न दडवता, पारदर्शक कारभार करा, असा सल्ला रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी नुकताच दिला आहे. त्यांनी कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा सवाल उपस्थित केला आहे; परंतु राष्ट्रीयीकृत बँकांच्या संचालक मंडळात रिझर्व्ह बँक व सरकारचे प्रतिनिधी असतात. ते नेमके काय करतात, असा सवाल करावा लागेल! ज्या कंपन्यांना मोठी कर्जे वाटली जातात, त्यांचे बारकाईने लेखापरीक्षण केले जाते. शिवाय रिझर्व्ह बँक, नियामक या नात्याने दरवर्षी वार्षिक आर्थिक तपासणी करते. हे सर्व असून देखील पंजाब नॅशनल बँकेत नीरव मोदी घोटाळा झालाच. त्यामुळे नफा वाढला हे चांगले असले, तरी थकित कर्जे दडवून, खोटे वा अवास्तव चित्र सादर केले जात नाही ना, याची काळजी घेतली पाहिजे.

हे असे म्हणण्याचे कारण म्हणजे, २०२२-२३ या आर्थिक वर्षात भारतातील बँकिंग क्षेत्रातील गैरव्यवहारांत वाढ झाली आहे. एकूण १३,५३० घोटाळे प्रकाशात आले असून, त्यातील सर्वाधिक वाटा हा खासगी बँकांचा आहे. म्हणजे गडबड, गोंधळ फक्त सरकारी क्षेत्रातील बँकांमध्ये चालतो, असे नव्हे. तुलनेने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून कमी गैरव्यवहार झाले असले, तरी एकूण ३०,२५२ कोटी रुपयांच्या फसवणुकीत सर्वाधिक रक्कम ही सरकारी बँकांचीच गेली आहे, असे रिझर्व्ह बँकेच्या अहवालात म्हटलेले आहे. २०२१-२२ मध्ये ९०९७ गैरव्यवहार झाले होते आणि त्यातून जवळपास ६०,००० कोटी रुपयांची फसवणूक झाली होती. यावेळी मार्च २०२३ असे समाप्त झालेल्या वर्षात घोटाळे वाढले असले, तरी फसवणुकीची रक्कम ५० टक्क्यांनी कमी झाली आहे. डेबिट आणि क्रेडिट कार्ड व इंटरनेटच्या माध्यमातून सर्वाधिक गैरव्यवहार झाले असून, ही चिंतेची बाब आहे असे मानले पाहिजे. अर्थव्यवस्थेचे डिजिटलीकरण होत असून हे स्वागतार्ह आहे. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग फसवणुकीसाठी देखील होऊ शकतो हे लक्षात घेऊन, योग्य ती सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**"नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा", असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा.**

**- संतोष बोर्डे**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक वर्तीची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP) Chief Minister Employment Generation Programme (CMEGP)

**स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!**

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :**

- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :**

- उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :**

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादींमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :**

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजूर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :**

योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजूर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा
- शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे
- आधार कार्ड
- नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल.
- जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी)
- विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक)
- वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना.
- स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजूर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

## सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तीक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/ माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षाची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योग क्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय :**

**हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ -** www.maha-cmegp.gov.in
www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, औरंगाबाद येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*



*उद्योजक मासिकाच्या जून २०२३ विशेषांकाचे प्रकाशन मा. श्रीमती रिता सेनगुप्ता व मा. श्रीमती रेखा भारद्वाज, सिद्धी प्रेरणा प्रशिक्षक, नवी दिल्ली यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी एमसीईडी संस्थेचे कार्यकारी संचालक मा. श्री. बी. टी. यशवंते व एमसीईडीचे अधिकारी दिसत आहेत.*





## स्वित्झरलँडचे राजदूत, बेल्जियमच्या वाणिज्यदूतांनी घेतली राज्यपालांची सदिच्छा भेट

# व्यापार, शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राला पसंती

**भारतसोबत व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील देवाण-घेवाणीसाठी स्वित्झरलँड आणि बेल्जियम उत्सुक आहे. स्वित्झरलँड भारतासोबत मुक्त व्यापारासोबत विद्यापीठे व उद्योगांसाठी 'इनोव्हेशन प्लॅटफॉर्म' तयार करणार आहे, तर बेल्जियममधील फ्लेमिश, ब्रसेल्स व वलून हे तीन स्वायत्त प्रांत भारतात गुंतवणुकीसाठी प्रयत्न करत आहेत. दोन्ही देशांनी व्यापार, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील देवाण-घेवाणीसाठी महाराष्ट्राला पसंती दिली आहे. स्वित्झरलँडचे भारतातील राजदूत डॉ. राल्फ हेकनर आणि बेल्जियमचे मुंबईतील वाणिज्यदूत फ्रँक गिरकीन्स यांनी नुकतीच राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.**

**- प्रतिनिधी**

भारतात किमान ३३० स्विस कंपन्या कार्यरत आहेत. त्यापैकी १५० एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे महाराष्ट्र हे स्वित्झरलँडसाठी सर्वात महत्वाचे राज्य असून भारताशी मुक्त व्यापार करार करून हे व्यापारी संबंध अधिक दृढ करण्यासाठी स्वित्झरलँड प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन स्वित्झरलँडचे भारतातील राजदूत डॉ. राल्फ हेकनर यांनी केले. हेकनर यांनी ३१ मे रोजी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. हेकनर यांनी विविध विषयांवर मत व्यक्त केले.

### नावीन्यता व्यासपीठ सुरू करणार

डॉ. राल्फ हेकनर म्हणाले, पुणे येथे नुकतीच आपण सार्वजनिक व खासगी विद्यापीठांच्या प्रमुखांशी भेट घेतली. विद्यापीठांमध्ये होत असलेल्या संशोधनाचा व्यापाराला लाभ व्हावा, याकरिता स्वित्झरलँडच्या पुढाकाराने उद्योग व विद्यापीठांसाठी एक सामायिक 'नावीन्यता व्यासपीठ' ('इनोव्हेशन प्लॅटफॉर्म') सुरू करण्याबाबत विचार सुरू आहे. या व्यासपीठावर आयआयटीसारख्या संस्थांनादेखील घेतले जाणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर तो २२ देशांमध्ये राबविला जाईल.

### भारत-स्वित्झरलँड मुक्त व्यापार करार आवश्यक

'स्वित्झरलँडमधील जिनेव्हा येथे संयुक्त राष्ट्र संघाची व्यापार, आरोग्यविषयक कार्यालये आहेत. तसेच दावोस येथे दरवर्षी जागतिक आर्थिक परिषद होते. या दोन्ही ठिकाणी भारताचा सहभाग लक्षणीय आहे. त्यामुळे भारताच्या मताची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील, तोवर भारताला विकसित राष्ट्र करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. या उद्दिष्ट प्राप्तीसाठी भारत-स्वित्झरलँड मुक्त व्यापार करार होणे आवश्यक आहे. हा करार झाल्यास कोणकोणत्या क्षेत्रात संधी उपलब्ध होतील, याची माहिती धोरणकर्त्यांना तसेच उद्योगजगताला देण्यासाठीच आपण मुंबई भेटीवर आलो असल्याचे डॉ. हेकनर यांनी सांगितले.

### भारताकडून गुंतवणुकीची अपेक्षा

राज्यपाल बैस म्हणाले, स्वित्झरलँड भारताचा ११ वा मोठा गुंतवणूकदार देश असून मुंबईतील वाणिज्य दूतावास १०८

वर्षापासून कार्यरत आहे. स्वित्झरलँड सूक्ष्म तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान व औषधीनिर्माण या क्षेत्रातील कौशल्यप्रधान देश असून उभय देशांत कौशल्य आदान-प्रदान करार झाल्यास भारतातील युवकांच्या कौशल्याचा अनेक देशांना फायदा होईल. स्वित्झरलँडला भारताकडून अधिक गुंतवणूक तसेच नावीन्यता व संशोधन सहकार्याची अपेक्षा आहे. यश चोप्रा यांनी स्वित्झरलँड येथे आपल्या चित्रपटांचे चित्रीकरण केल्यामुळे दरवर्षी अडीच ते तीन लाख भारतीय पर्यटक स्वित्झरलँडला भेट देत आहेत. विद्यापीठांचा कुलपती म्हणून उभय देशांमधील विद्यापीठांमध्ये विद्यार्थी-अध्यापक आदानप्रदान वाढावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. बैठकीला स्वित्झरलँडचे मुंबईतील वाणिज्यदूत मार्टिन माईर हे देखील उपस्थित होते.

### महाराष्ट्र, बेल्जियममध्ये गुंतवणुकीची संधी

मुंबई आणि बेल्जियममधील अँटवर्प दोन्ही हिऱ्यांच्या व्यापाराची शहरे आहेत आणि दोन्ही ठिकाणी व्यापारी बंदरे आहेत. बेल्जियममध्ये फ्लेमिश प्रांत, ब्रसेल्स व वलून हे तीन स्वायत्त प्रांत असून तेथे सशक्त प्रादेशिक सरकारे आहेत. भारतातील दूतावासात या तिन्ही प्रांतांचे व्यापार प्रतिनिधी बसतात व आपापल्या प्रांतात गुंतवणुकीसाठी प्रयत्न करतात अशी माहिती बेल्जियमचे मुंबईतील वाणिज्यदूत फ्रँक गिरकीन्स यांनी दिली. राज्यपाल रमेश बैस यांची सदिच्छा भेट घेतल्यानंतर ते बोलत होते.

### चित्रपट उद्योगाला चालना

फ्रँक गिरकीन्स म्हणाले, भारत आणि बेल्जियमच्या लोकांना एकमेकांविषयी अधिक माहिती होण्यासाठी प्रयत्न केले जातील. लवकरच बेल्जियमकडे युरोपीय संघाचे अध्यक्षपद येत असून या काळात आपण भारताशी मैत्रीपूर्ण संबंध अधिक वृद्धिंगत करण्याबाबत प्रयत्न करणार आहोत. 'पिकू' चित्रपटाचे सुरुवातीचे बरेचशे चित्रीकरण बेल्जियममध्ये झाले. आपण भारतीय चित्रपट उद्योगाला आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर चालना देणार आहोत.

### विद्यापीठासोबत सामंजस्य करार

राज्यपाल म्हणाले, बेल्जियमच्या गेंट, लूवन व ब्रसल्स मुक्त विद्यापीठांचे भारतातील काही विद्यापीठांशी शैक्षणिक सहकार्य करार झाले आहेत. बेल्जियमने महाराष्ट्रातील विद्यापीठांसोबत देखील सहकार्य प्रस्थापित करावे. बेल्जियमच्या १६० कंपन्या भारतात काम करीत आहेत ही समाधानाची बाब असून उभयपक्षी प्रयत्न केल्यास दोन्ही देशांचा व्यापार सध्याच्या १५.१ बिलियन युरोवरून मोठ्या प्रमाणात वाढू शकतो.

## शी र्षा स न



- अति अन्यायाची प्रचीती क्रांतीच्या जन्मात होते तर अति आनंदाची परिणती क्रौर्यात होते.
- बालपण, तरुणपण, वृद्धत्व हे जीवनाचे तीन अंक; पण प्रत्येक अंकात बालकाची भूमिका थोडी फार तरी असतेच.
- स्तुतिप्रिय व्यक्तीला त्याचे दोष दाखविण्याच्या फंदात पडू नका.
- नटून-थटून आलेल्या सहकारी स्त्री कर्मचाऱ्यांना त्यांच्या आजच्या वेगळेपणाबद्दल कॉम्प्लिमेंटस द्या. अन्यथा रोषाचे तुम्ही धनी व्हाल.
- तुमच्या कामात जास्त चुका दिसू लागल्या तर साहेब तुमच्यावर नाराज आहे असा त्याचा अर्थ होतो.
- तह करताना यशासाठीचा मंत्र - विषय सोडून अवांतर विषयांवर चर्चा करा.
- संतापलेल्या अथवा तापलेल्या माणसाला थंड करण्याचे अमोघ अस्त्र - मौन.
- पॉकेटमनीचा प्रश्न आणि पत्नीची उलटतपासणी टाळण्यासाठी पगाराची स्लीप, बँकेचे पासबुक आणि चेकबुक कार्यालयातील आपल्या गुप्त खणामध्ये ठेवा.
- घरात शांतता हवी असेल तर शेजारच्या घरातील गृहिणीच्या कोणत्याच बाबीची दखल घेऊ नका तसेच त्यांची स्तुती करण्याच्या फंदात पडू नका.
- शत्रू आक्रमक असल्यास प्रतिकार करू नका, त्याच्यातील चांगल्या गुणांची तारीफ करा.
- पत्नीला घरी परतण्याचा वेळ सांगताना नेहमी कमीत कमी १ तासाचा ग्रेस पीरियड धरा.
- हातचे सोडून पळणाऱ्याच्या पाठीमागे धावणे म्हणजे पत्नी सोडून प्रेयसीमागे धावणे.
- काम करून समोर हजर राहील तो गुन्हेगार, काम टाळण्यासाठी गैरहजर राहणारा फरार, कामचुकारपणा करणारा माफीचा साक्षीदार असतो, तर साहेबांचे कान भरणारा ठरतो विश्वासू सल्लागार.
- अतिशहाण्याला कितीही समजावले, शिकविले तरी ऐनवेळी त्याचा शहाणपणा उफाळून वर येतोच.
- बॉसविषयी बॉसच्या बॉसकडे तक्रारी करण्याचा सुवर्णकाळ म्हणजे बॉसच्या रजेच्या अथवा दौऱ्यांचा काळ.
- हितचिंतक कसा ओळखावा हे सोपं आहे. आपल्या सर्व निर्णयाला होकार देणारा नेतो कडेलोटाकडे, टीका करणारा वाईट चिंतितो, तर परखड विश्लेषण करून बोलतो तो हितचिंतक.



## उद्योग विभागाच्या योजना, भांडवल आणि अनुदानही

# स्वयंरोजगाराच्या वाटा!

**नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा असे नेहमीच सांगितले जाते. अनेकांच्या मनातही उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्याची सुप्त इच्छा असते. मात्र, यासाठीचे मार्गदर्शन आणि भांडवलाअभावी ही इच्छा प्रत्यक्षात साकारत नाही. उद्योजक होण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी राज्याच्या उद्योग विभागाने अनेक योजना आखल्या आहेत. यातून उद्योगांसाठी भांडवल तर मिळतेच शिवाय तज्ज्ञांच्या मार्गदशनाचाही फायदा घेता येतो. सोबतीला शासनातर्फे दिलेल्या कर्जावर अनुदानाचीही सोय आहे. नेमक्या कोणत्या आहेत स्वंयरोजगाराच्या वाटा, जाणून घेऊया...**

**- प्रतिनिधी**

राज्याच्या, जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये उद्योग व्यवसायांचा मोठा वाटा असतो. या पार्श्वभूमिवर ग्रामीण भागात लघु उद्योग व कुटीरोद्योगाचा विकास व्हावा, शहरातून ग्रामीण भागात उद्योगाचे जाळे तयार व्हावे व जिल्ह्यातून त्याचे सनियंत्रण होणे या मुख्य उद्देशाने उद्योगविषयक अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहेत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा विकास करणे आणि त्याद्वारे रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी या योजना फायदेशीर ठरतात. या लेखात काही महत्त्वाच्या योजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

**१) मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (CMEGP) :** राज्यातील सुशिक्षित बेरोजगार होतकरु युवक/युवतींसाठी स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या मार्गदर्शनाने व विकास आयुक्त (उद्योग) यांच्या संनियंत्रणाखाली जिल्हा उद्योग केंद्र (DIC) व जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय (KVIB) यांच्यामार्फत करण्यात येते. सदर योजना पूर्णपणे ऑनलाइन असून या योजनेकरिता maha-cmegp.gov.in हे ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात आलेले असून सदर पोर्टल सुलभतेने कार्यान्वित झालेले आहे.

**योजनेतर्गत पात्रतेचे निकष :** उत्पादन उद्योग, कृषिपूरक उद्योग व सेवा उद्योग प्रकल्प योजनेअंतर्गत लाभासाठी पात्र. नुकतीच उत्पादन क्षेत्रांतील प्रकल्पासाठी प्रकल्प मर्यादा रु. ५० लाख रुपयांवरून १ कोटी रुपये व सेवा क्षेत्रातील आणि कृषी आधारित/प्राथमिक कृषी पक्रिया उद्योग प्रकल्पांसाठी प्रकल्प मर्यादा रु. २० लाखांवरून ५० लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे.

**शैक्षणिक पात्रता :** रु. १० लाखांच्या पुढील प्रकल्पांसाठी किमान सातवी पास व रु. २५ लाखाच्या पुढील प्रकल्पांसाठी किमान दहावी पास आहे. राज्य शासनाकडून प्रकल्प मंजूरीच्या १५ ते ३५ टक्के इतके आर्थिक सहाय्य अनुदान स्वरूपात. लाभार्थ्याची स्वगुंतवणूक ५ ते १० टक्के, बँक कर्ज ६० ते ८० टक्के व राज्य शासनाचे अनुदान १५ ते ३५ टक्के.

**२) पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रम (PMEGP) :**

स्वयंरोजगार उभारणीस प्रोत्साहन देण्यासाठी सुलभ तत्वावर भांडवल उभारणी करून देण्याच्या हेतूने ही योजना राबविली जाते. राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. खादी ग्रामोद्योग आयोग, खादी ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्र या तीन यंत्रणांमार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. राज्य खादी

ग्रामोद्योग आयोग, मुंबई सदर योजनेसाठी नोडल एजन्सी म्हणून काम करते.

या योजनेअंतर्गत उत्पादित उद्योग घटकांना कमाल रु. ५० लाखापर्यंत तसेच व्यवसाय-सेवा उद्योग घटकांना कमाल रु. २० लाखापर्यंतचे अर्थसहाय्य बँकामार्फत केले जाते. उद्योग घटकास ५ ते १० टक्के रक्कमेची स्वगुंतवणूक करावी लागते. या योजनेमध्ये बँकेचा कर्ज समभाग ९० ते ९५ % पर्यंत असतो. यामध्ये सर्वसाधारण गटासाठी लाभार्थीचे भागभांडवल १० टक्के असून, शहरी भागासाठी १५ टक्के तर ग्रामीण भागासाठी २५ टक्के अनुदान (मार्जिन मनी) दिले जाते. अनुसूचित जाती / जमाती / इतर मागासवर्गीय जाती / अल्पसंख्याक / माजी सैनिक / महिला/ दिव्यांग प्रवर्गासाठी लाभार्थीचे भागभांडवल ५ टक्के असून शहरी भागासाठी २५ टक्के तर ग्रामीण भागासाठी ३५ टक्के अनुदान (मार्जिन मनी) दिले जाते.

**३) सुधारित बीज भांडवल योजना (एसएमएस) :** बेरोजगार व्यक्तींना उद्योग, सेवा उद्योग, व्यवसाय याद्वारे स्वयंरोजगार उभारण्यासाठी आवश्यक असलेले वित्तीय संस्थेकडील अर्थसहाय्य मिळविण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून देणे हा या योजनेचा हेतू आहे. धोरणात्मक बदलानुसार सुधारित नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रकल्प मर्यादा रु. २५ लाखांपर्यंत आहे. बीज भांडवल कर्जाची कमाल मर्यादा रु. ३.७५ लाख आहे. या योजनेमध्ये बँक कर्ज ७५ टक्के मिळते. ही योजना वाहन व्यवसाय, व्यापार व उद्योगांसाठी लागू आहे. रुपये दहा लाखांपेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पांमध्ये बीज भांडवल कर्जाचे प्रमाण सर्वसाधारण प्रवर्गातील लाभ धारकांसाठी १५ टक्के तर अनु. जाती / जमाती, दिव्यांग, विमुक्त व भटक्या जाती / जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांना २० टक्के राहील.

बीज भांडवलाची रक्कम मृदु कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून द.सा.द.शे सहा टक्के व्याजाने देण्यात यावे. कर्जाच्या रक्कमेची विहित कालावधीत परतफेड करणाऱ्या लाभार्थींना ३ टक्के रिबेट देण्यात येईल. मात्र कर्जाच्या रकमेची विहित कालावधीत परतफेड करण्यात आली नाही तर थकित रकमेवर द.सा.द.शे. १ टक्के दंडनीय व्याज आकारण्यात येईल. कर्जाची परतफेड ७ वर्षांच्या आत करावयाची असून सुरुवातीची ३ वर्ष विलंबावधी (वाहनांसाठी ६ महिने) निश्चित करण्यात येईल.

**४) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (जिल्हास्तरीय योजना अंतर्गत) :** निमशहरी व ग्रामीण भागात अतिलहान उद्योगांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून त्यांचा विकास साधणे व याद्वारे अधिक रोजगारसंधी व स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना सुरू करण्यात आली. ही योजना जिल्हास्तरीय योजना असून जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत राबविली जाते.

या योजनेतून ६५ ते ७५ टक्के बँक कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गासाठी २० टक्के मार्जिन मनी जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. ४०,००० तर अनु.जाती/जमातीच्या लाभार्थीस ३० टक्के मार्जिन मनी कमाल रु. ६०,००० पर्यंत दिले जाते. व्याजाचा दर ४ टक्के राहील. लाभार्थीस स्वतःचे ५ टक्के भांडवल बँकेकडे भरणा करणे आवश्यक आहे. बीज भांडवल कर्जाची परतफेड ८ वर्षांच्या आत करावयाची असून मार्जिन मनी कर्जाची परतफेड विहित केलेल्या कालावधीत केली नाही, तर थकित रक्कमेवर द.सा.द.शे. १ टक्का दंडव्याज आकारण्यात येईल.

**५) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (जिल्हा स्तरीय योजना अंतर्गत) :** सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शक शिबिरे व प्रशिक्षण शिबिरे घेतली जातात. त्यामध्ये उद्योग / सेवा याकरिता मार्गदर्शन देणे, जागेसंबंधी आवश्यक तरतूदी, प्रकल्प अहवाल तयार करणे, निरनिराळे परवाने मिळविण्याच्या पद्धती विक्रीकरिता आवश्यक बाबी इत्यादीबाबत उपयुक्त माहिती दिली जाते. या योजनेमध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन व उद्योग संचालनालयाने मान्यता दिलेल्या अशासकीय कुशल प्रशिक्षण संस्थांमार्फत खालीलप्रमाणे प्रशक्षिण कार्यक्रम घेण्यांत येतात.

**उद्योजकता परिचय कार्यक्रम (एकदिवसीय, अनिवासी) :** एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमात व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसहाय्य देणाऱ्या संस्था व यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली जाते. प्रति प्रशिक्षण कार्यक्रम रु. ६००/- खर्च राहील.

**उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (१२ दिवसीय, निवासी) :** सदर प्रशिक्षण कार्यक्रम १२ दिवसांचे, निवासी व भोजन व्यवस्थेसह आहे. उद्योजकता परिचय कार्यक्रमात निवडलेल्या प्रशिक्षणार्थींना उद्योगाशी संबंधित कलागुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश आहे.

**तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (१५ दिवस ते २ महिने अनिवासी) :** या प्रशिक्षण कार्यक्रमात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडीत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण अनिवासी असून प्रशिक्षणार्थीस १५ दिवसांकरिता रु. ५०० आणि दरमहा रु. १००० तसेच २ महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी रु. २००० विद्यावेतन देण्यात येते तसेच प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिमाह रु. ३००० संस्थेस देण्यात येतात.

**६) जिल्हा पुरस्कार योजना :** लघुउद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व त्यांनी संपादन केलेल्या प्रथित यशाची साभार पोच द्यावी, या हेतूने राज्य सरकारतर्फे जिल्हा पातळीवर जिल्हा पुरस्कार योजना राबविण्यात येते. कमीत कमी ३ वर्ष नोंदणी झालेला आणि सलग दोन वर्ष उत्पादन करीत असलेल्या घटकाचा मालक/ भागीदार/संचालक जिल्हा पुरस्कारासाठी पात्र ठरू शकतो. पुरस्कारासाठी उद्योजकाची निवड जिल्हा स्तरावर जिल्हा सल्लागार समिती करते. पुरस्कारासाठी उद्योजकांची निवड, विकासाचा वेग, तंत्रज्ञानाचा वापर, स्वावलंबन घटकाचे स्थान, उत्पादन विकास व गुणवत्ता नियंत्रण आयात, निर्यात उत्पादनातील बदल, व्यवस्थापन इ. निकषांवर केली जाते. मागासवर्ग/अनुसूचित जाती जमातीच्या उद्योजकांना निवडीसाठी अतिरीक्त गुण दिले जातात. प्रथम पुरस्कार रोख रु. १५,००० गौरव चिन्ह व द्वितीय पुरस्कार रु. १०,००० गौरव चिन्ह देऊन पुरस्कारित करण्यात येते.



## बजाज ऑटोचे उपाध्यक्ष मधुर बजाज यांची विशेष मुलाखत

# भारताकडे जगभरात कुशल मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता

**वर्ष २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सचा पल्ला गाठेल. भारताचे सरासरी अप्रत्यक्ष करसंकलन १.५० लाख कोटीच्या पुढे गेले आहे. भारताने लोकसंख्येच्या बाबतीत जगात पहिला क्रमांक मिळवला असून जगातील सर्वाधिक तरुण देश झाला आहे. दुसरीकडे अनेक देशांत जन्मदर खूप कमी आहे. तेथे लोकं मोठ्या प्रमाणात वृद्धत्वाकडे झुकल्याने मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. भारत अशा देशांना कुशल मनुष्यबळ पुरवू शकतो, असे मत बजाज ऑटोचे उपाध्यक्ष मधुर बजाज यांनी व्यक्त केले. यासाठी भारताला तरुणांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. तरुणांनाही नवीन तंत्रज्ञान अवलंबावे लागेल, असे त्यांनी सांगितले. दैनिक 'दिव्य मराठी'च्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्त मधुर बजाज यांची विशेष मुलाखत प्रसिद्ध उद्योजक एआयटीजीचे चेअरमन राम भोगले यांनी घेतली. या मुलाखतीचा संपादित अंश खास उद्योजकच्या वाचकांसाठी... - महेश जोशी, विशेष प्रतिनिधी, दै. दिव्य मराठी, छ. संभाजीनगर**

मराठवाड्यालाच नव्हे तर उभा महाराष्ट्र आणि देशाला हेवा वाटावा अशा बजाज ऑटो लिमिटेडने १९८४ मध्ये छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसीमध्ये तब्बल १ हजार एकरावर प्रकल्पाची उभारणी सुरू केली. या प्रकल्पाने छत्रपती संभाजीनगरच्या उद्योगजगताचे चित्रच बदलून गेले. १९८५ मध्ये कंपनीत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. येथे बजाजचे स्कूटर, मोटारसायकल आणि रिक्शाचे उत्पादन केले जाऊ लागले. बजाजमुळे हे शहर उद्योगजगतासाठी 'मोस्ट हॅपनिंग प्लेस' झाले होते. त्याचे कारण म्हणजे बजाजला सुटे भाग पुरवण्यासाठी स्थानिक आणि बाहेरून हजारो एन्सीलरी युनिट दाखल झाले. उद्योगजगतासाठी आवश्यक असलेले कल्चर, इको सिस्टीम बजाजने रुजवली. त्यानंतर उद्योगजगताचा संभाजीनगरकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. याचे सर्व श्रेय बजाज ऑटोचे उपाध्यक्ष मधुर बजाज यांना जाते. तब्बल १० वर्षे त्यांचे छत्रपती संभाजीनगरमध्ये वास्तव्य होते. पुढेही ५-७ वर्षे ते शहरात येत राहिले. एका निद्रिस्त शहरापासून गतिमान शहराच्या प्रवासाचे ते जनक आहेत. दै. दिव्य मराठीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी या प्रवासासह उद्योगजगतातील घडामोडींवर प्रकाश टाकला.

**राम भोगले :** तुम्ही आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा, तब्बल १० वर्षांचा काळ छत्रपती संभाजीनगर येथे व्यतीत केला. त्यानंतरही पुढील ५ ते ७ वर्षे तुम्ही सातत्याने शहरात येत राहिलात. येथे येण्यापूर्वी आणि येथून गेल्यानंतर शहराविषयी तुमचे नेमके काय मत होते?

**मधुर बजाज :** तो बराच जुना काळ झाला असला तरी छत्रपती संभाजीनगराशी संबंधित माझ्याकडे खूप चांगल्या आठवणी आहेत. खरं तर तो माझ्या आयुष्यातला सर्वात चांगला काळ होता; कारण आम्ही त्या काळात खूप काही गोष्टी करून दाखवण्यात यशस्वी ठरलो. १९८३ च्या आसपास मी जेव्हा पहिल्यांदा छत्रपती संभाजीनगरमध्ये आलो त्यावेळी ते एक छोटेसे निद्रिस्त, निवांत असे 'स्लिपी टाऊन' होते. आम्ही आल्यानंतर ते गतिमान, वेगवान, धडधडणाऱ्या अशा 'थ्रोबिंग टाऊन' मध्ये परिवर्तित झाले. नंतर त्याला मोठ्या शहराचा दर्जा मिळाला. 'स्लिपी टाऊन' ते 'थ्रोबिंग टाऊन'चा प्रवास विलक्षण होता. आम्ही शहर जिवंत केले.

**राम भोगले :** छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाल्यानंतर या शहराबाबतचे काय इम्प्रेशन होते?

**मधुर बजाज :** या शहरात बजाज ऑटोसाठी मोठ्या पदांवरील उच्चशिक्षित, कुशल मनुष्यबळ उपलब्ध नव्हते. मोठ्या शहरातून लोकं येण्यास तयार

नव्हते. शहरात चांगल्या सोयी-सुविधा, शैक्षणिक संस्था, चांगली रुग्णालये आणि चांगल्या सांस्कृतिक चळवळीचा (सोशल इन्फ्रास्ट्रक्चर) अभाव होता. त्या उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले. योगायोगाने राम भोगले यांच्यासारखे चांगले मित्र मिळाले. त्यांच्यामुळे शांत, निद्रिस्त शहर वेगाने धावणारे शहर बनू शकले

**राम भोगले :** १९८३-८४ मध्ये येथील औद्योगिक इन्फ्रास्ट्रक्चर कसे होते?

**मधुर बजाज :** शहरात चिकलठाणा ही एकमेव औद्योगिक वसाहत होती. शहराची औद्योगिक प्रगती चिकलठाण्यातच सुरू झाली. याचे सर्व श्रेय रफिक झकेरिया यांना जाते. चिकलठाण्यात जागा अपुरी पडू लागल्याने वाळूज एमआयडीसीची सुरुवात झाली आणि ती शहराच्या औद्योगिक विकासाचे हब म्हणून नावारूपाला आली. आम्ही छत्रपती संभाजीनगरात येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा मागास भाग असल्याने उद्योग सुरू करण्यासाठी शासनाचे खास इन्सेंटिव्हज होते. शासनाच्या इन्सेंटिव्ह योजनेमध्ये ए, बी, सी आणि डी असे वर्ग केले होते. त्यात सर्वात मागास भाग म्हणून वाळूजचा 'डी' श्रेणीमध्ये समावेश होता. आम्हाला एक स्थिर शहर हवे होते. त्यामुळे वाळूजची निवड केली. त्यापूर्वी शहराचा जो काही विकास झाला होता तो केवळ पर्यटनामुळे. येथे १-२ चांगले हॉटेल्स होते. बजाज आल्यानंतर शहराचे चित्रच पालटले.

**राम भोगले :** कुशल मनुष्यबळाची समस्या कशी सोडविली?

**मधुर बजाज :** बजाजच्या पुण्यातील प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना छत्रपती संभाजीनगरात जाण्यासाठी आम्ही विचारणा करायचो. ते वेगवेगळी कारणे सांगत नकार द्यायचे. आम्ही कधी फोर्स नाही केला. त्यांना चांगल्या शाळा, रुग्णालये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची कमतरता जाणवायची. आम्ही उत्तरे शोधली.

**नाथ व्हॅली शाळा :** चांगली शाळा नेमकी कशी असावी, शाळेची इमारत कशी असावी, ती कशी चालवावी हे शहरात कोणालाच माहीत नव्हते. आम्ही डून स्कूलच्या धर्तीवर शाळा तयार करण्याचे ठरविले. त्यासाठी मी शिक्षण घेतलेल्या डून स्कूलचे प्राचार्य श्री. रामचंदानी यांना कन्सल्टंट म्हणून नेमले. वयामुळे त्यांना प्रवास शक्य नव्हता. त्यांचा मुलगा शाळेची पाहणी करण्यासाठी शहरात यायचा. अशाप्रकारे नाथ व्हॅली शाळेची इमारत उभी राहिली.

**कमलनयन बजाज रुग्णालय :** माझे सासरे प्रसिद्ध उद्योजक श्री. बागला छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांचा सप्लायचा उद्योग घेऊन शिफ्ट झाले होते. शहरात एक डायग्नोस्टिक सेंटर सुरू करण्यासाठी ते ८-१० निष्णात डॉक्टरांना माझ्याकडे घेऊन आले. आमचे परदेशातील मित्र यंत्रसामग्री पाठवणार होते. सेंटरचे बजेट सुमारे ५० लाख रुपये होते. अजून काही लोकं प्रत्येकी ५ लाख  देऊन सेंटर उभे करणार होते. मात्र, मी फक्त डायग्नोस्टिक सेंटरऐवजी रुग्णालय उभे करण्याचा सल्ला दिला. आणि यातून कमलनयन बजाज हॉस्पिटल उभे राहिले. कोणत्याही उद्योगाप्रमाणे हॉस्पिटल सुरुवातीला तोट्यातच होते. मात्र, केवळ राम भोगले यांनी ते नफ्यात आणले. त्यांनी काय जादू केली माहिती नाही; पण हॉस्पिटलचे गणितच बदलले. याचे १००% श्रेय भोगले यांनाच जाते.

**महाएक्स्पो :** शहराची पर्यटन नगरी म्हणून ओळख होती. यास कोणी औद्योगिक शहर म्हणून ओळखत नव्हते. ती ओळख निर्माण करण्यासाठी पहिले औद्योगिक प्रदर्शन महा-एक्स्पोचे आयोजन केले. महा म्हणजे महा राष्ट्र, ग्रेट राष्ट्र तर एक्स्पो म्हणजे एक्स्पोझिशन, एक्झिबिशन आणि एक्सपोर्ट. यासाठी सर्वांचाच मोठा पाठिंबा मिळाला. शक्यतो अन्य शहरांत पाय ओढण्याची पद्धत असते. छत्रपती संभाजीनगरात प्रत्येक जण पाठिंबा देण्यासाठी पुढे आला. त्यातून हा भव्य सोहळा साकारता आला आणि उभ्या देशाने प्रदर्शन बघितले.

**कलासागर :** शहरासाठी केलेली चौथी गोष्ट म्हणजे कलासागरची स्थापना. या सांस्कृतिक मंचाद्वारे आम्ही जागतिक पातळीवर गाजलेल्या कलाकारांना शहरात आणले. प्रत्येक शो हाउसफुल असायचा. एकदा कलासागरच्या सदस्यांनी यात आपले कलागुण सादर केले. राम भोगले त्याचे संयोजक होते. माझ्या घरातही अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. एकदा पुरुषांनी त्यांच्या आवडीच्या डिशेस तयार केल्या. ट्रेजर हंट सारखे खेळही खेळलो. नंतर शहरात असे अनेक उपक्रम सुरू झाले, शहर गतिमान, 'व्हायब्रंट सिटी' होत गेले. या शहराशी संबंधित खूप चांगल्या आठवणी आहेत. या आठवणींचा गुणाकार होत चालला आहे. त्या दिवसेंदिवस वाढतच आहेत.

**राम भोगले :** उद्योजकांची संघटना सीएमआयएमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता?

**मधुर बजाज :** मी नेहमीच विविध उद्योजकांच्या संघटनांच्याशी संलग्नित राहिलो आहे. उद्योजकांची शीर्ष संघटना सीआयआयच्या वेस्ट झोनचे अध्यक्षपद, पुण्यात मराठा चेंबरचे अध्यक्षपद आणि वाहन उत्पादकांची सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चरर्स 'सियाम'चेही अनेक वर्ष अध्यक्ष पद भूषविले. आम्ही बाजारात स्पर्धक असलो तरी संघटनांमध्ये एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून प्रगतीसाठी काम करतो, धोरणे तयार करण्यासाठी सरकारला मदत करतो. संघटना खूप मोठे काम करू शकतात. सीएमआयए सोबतही खूप चांगला अनुभव राहिला.

**राम भोगले :** बजाज ऑटोचा वाळूज प्रकल्प हा मोठ्या प्रमाणात निर्यात करतोय. देशांतर्गत उत्पादक ते निर्यात करणारा उद्योग या प्रवासाबाबत थोडक्यात सांगा.

**मधुर बजाज :** एखाद्या देशात वाहने निर्यात करण्यासाठी त्या देशाने घातलेल्या अटी व निकषांना 'होमोलोगेशन' असे म्हणतात. वाहनांचे इमिशन, सेफ्टी यासारखे फिचर्स, स्टँडर्ड पूर्ण केल्याशिवाय तुम्ही 'होमोलोगेट' होत नाहीत. त्या देशामध्ये वाहने निर्यात करण्यासाठी एनओसी मिळत नाही. काही देशांमध्ये हे निकष अत्यंत कडक आहेत, काहींमध्ये सामान्य तर काही देशांमध्ये हे निकषच नाहीत. आम्हाला सुरुवातीपासूनच वाहने निर्यात करायची होती. मात्र, त्या काळात आमच्या वाहनांची गुणवत्ता आणि स्टँडर्ड अप टू द मार्क नसल्याने आम्ही निर्यातीच्या स्थितीमध्ये नव्हतो. विशेषतः आमची वाहने विकसित देशांच्या निकषात बसणारे नव्हते. मग आम्ही तंत्रज्ञानामध्ये मोठे बदल केले. आता आम्ही अभिमानाने सांगू शकतो की, होय आम्ही जागतिक दर्जाचे उत्पादक आहोत, आमची गुणवत्ता जागतिक दर्जाची आहे आणि या गुणवत्तेच्या जोरावरच आम्ही जगजेते आहोत. बजाजची सर्वाधिक वाहने आफ्रिकेत निर्यात होतात. आम्ही ठामपणे सांगू शकतो की वी आर 'द वर्ल्ड्स फेवरेट इंडियन्स' आहोत. हेच आमचे घोषवाक्य आहे.

**राम भोगले :** छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक या टीयर टू सिटीचे भविष्य कसे असेल?

**मधुर बजाज :** ही शहरे नुकतीच 'टीयर-टू' श्रेणीमध्ये आली आहेत. ती लवकरच 'टीयर-वन' मध्ये येतील याचा विश्वास वाटतो. सरकार या

शहरांच्या विकासासाठी खूप गंभीर आहे. त्याचे कारण म्हणजे आता मुंबई, पुण्याचा विस्तार शक्य नाही. मुंबई महागडे शहर आहे. १ चौरस फुटासाठी १ लाखापेक्षा जास्त किंमत मोजावी लागतेय. मध्यमवर्गीय मुंबईत राहण्याचाही विचारही करू शकत नाही. या दोन्ही शहरांसाठी सरकारकडून इन्सेंटिव्हजही नाहीत. राज्याच्या समतोल विकासासाठी वेगवेगळ्या भागांमध्ये तेथील स्थानिक उत्पादनांचा विचार करून हब तयार करणे आवश्यक आहे. उदा. नागपूरमध्ये संत्र्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा हब करता येईल. हब झाल्यास त्यांचे व्हेंडर तेथे येतील. यातून एक इको सिस्टीम तयार होऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील. असा विकास सरकारच्या पाठिंब्याशिवाय शक्य नाही. सरकार धोरणे तयार करते, इन्सेंटिव्ह देते, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देते.

**राम भोगले :** सगळे जग इलेक्ट्रिक व्हेइकलकडे अपेक्षेने पाहत आहे. याबाबत तुमचे मत?

**मधुर बजाज :** इलेक्ट्रिक वाहनांच्या बाबतीत माझे थोडे वेगळे मत आहे. प्रदूषण ही जागतिक समस्या असून पर्यावरणाच्या असमतोलाचे दुष्परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागतील. त्याकडे आताच लक्ष देणे गरजेचे आहे. पेट्रोल-डिझेलमुळे प्रदूषण होते. त्यामुळे हायड्रोकार्बनवर आधारित वाहनांना पर्याय देणाऱ्या तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. ईव्हीमुळे प्रदूषण होत नाही हे खरे असले तरी वीजनिर्मितीची प्रक्रिया सर्वाधिक प्रदूषण करणारी आहे. त्यामुळे मी केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना स्पष्ट सांगितले आहे की तुम्ही फक्त ईव्हीवर अवलंबून राहू नका. आम्ही चेतक ईव्हीचे उत्पादन करत असतानाही मी हा सल्ला दिला. प्रदूषण कमी करण्यासाठी ईव्हीशिवाय हायड्रोजन, सीएनजीचा पर्याय आहेच. सरकारने प्रदूषण न करणाऱ्या वाहनांवर लक्ष केंद्रित करावे. त्यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरायचे हे आम्हाला ठरवू द्या. गडकरींना आता आमचे म्हणणे मान्य होत आहे. ईव्ही एक पर्याय आहे. तो परिपूर्ण मार्ग नाही. आमच्याकडेही इतर तंत्रज्ञान आहेच. योग्यवेळी त्याचा वापर करू.

**राम भोगले :** गेल्या २५-४० वर्षांत तुम्ही अनेक चढ-उतार बघितले. १९९४-९५ वाहन उद्योगासाठी आव्हानात्मक होते. २००७-०८ मध्ये जागतिक मंदी होती. २०20 मध्ये कोरोनाचे संकट उद्भवले. अशा संकटांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र तसेच देशाची अर्थव्यवस्था किती सक्षम किंवा लवचिक (रेझीलेंट) आहे, असे तुम्हाला वाटते?

**मधुर बजाज :** तसं बघितलं तर रेझीलेंन्सच्या वेगवेगळ्या पातळ्या आहेत. बजाज समूहाकडे अशा संकटांचा सामना करण्यासाठी एक मोठा निधी आहे. कोरोनाच्या काळात लोकांचे खाण्या-पिण्याचे हाल झाले, अनेक कंपन्या बंद पडल्या, काहींनी कर्मचाऱ्यांना लेऑफ दिला, काहींनी पगार कपात केली. आम्ही यापैकी काहीच नाही केले. आम्ही ठामपणे म्हणालो की, हे संकट निघून जाईल. आम्हाला विश्वास होता की अर्थमंत्री निर्मला सीतारामन ही परिस्थिती खूप वेळ राहू देणार नाहीत. त्यांनी सर्वात आधी उद्योग सुरू करण्याची परवानगी दिली. अगदी रेड झोन असणाऱ्या भागातूनही मालवाहतुकीला परवानगी दिली. यामुळे अर्थव्यवस्था गतिमान झाली.

**राम भोगले :** छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र आणि देशातील उद्योगांचे भविष्य कसे असेल?

**मधुर बजाज :** मला विश्वास आहे की छत्रपती संभाजीनगर खूप चांगले काम करणार आहे, खूप प्रगती करणार आहे. त्याचे कारण म्हणजे इथले लोकं आहेत. इथले लोकं खूप चांगले आहेत. अशा चांगल्या लोकांमुळेच मी या शहरांमध्ये वेगवेगळे प्रकल्प राबवू आणि यशस्वी करू शकलो. त्यांच्या पाठिंब्याशिवाय हे शक्य नव्हते. हेच या शहराचे वैशिष्ट्य आहे. हाच इथल्या लोकांचा मोठेपणा आहे. सहकार्य करणे हा त्यांच्या बुद्धीचा, सवयीचा आणि तत्त्वांचा भाग आहे. हेच लोक शहराच्या भरभराटीसाठी काम करणार आहेत. हे लोकच हे शहर पुढे नेण्यासाठी हातभार लावतील, त्यांना सरकारचाही पाठिंबा मिळेल.

**महत्त्वाचे मुद्दे :**

मुख्यमंत्र्यांनी रिक्षाला वलय दिले-मुलाखतीच्या सुरुवातीलाच मधुर बजाज म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चहाला वलय दिले. प्रत्येक चहावाला स्वतःला असामान्य समजू लागला आहे. त्याप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमच्या तीनचाकी रिक्शाला वलय दिले. त्यांनी सुरुवातीच्या काळात रिक्षा चालवली आहे. एक रिक्शावाला महाराष्ट्रसारख्या मोठ्या राज्याचा मुख्यमंत्री होऊ शकतो, हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी आमची बजाजची रिक्शा चालवली होती याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**मुंबईचे न्यूयॉर्क होऊ नये :** महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. चांगले हवामान, कनेक्टिव्हिटी, बंदरे, विमानतळे, महामार्ग, पायाभूत सुविधा ही राज्याची वैशिष्ट्ये आहेत. या सुविधा पाहून प्रत्येकजण महाराष्ट्रात येत असून त्या अपुऱ्या पडत आहेत. यामुळे या सुविधा विकसीत करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा दररोज ट्रॅफिक जॅमचा सामना करावा लागेल. आपल्या समृद्धीचा फायदा आणि नुकसानही सहन करावे लागते. न्यूयॉर्कचे बाबतीत तसेच झाले. प्रत्येकाला न्यूयॉर्कला जायचे होते आणि न्यूयॉर्कमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला. महागाईमुळे मुंबईच्या बाबतीत तशी शक्यता नसली तरी खूप गर्दी झाली आहे. त्यामुळे आमच्यासारख्या लोकांना मुंबई सोडून जाण्याचा विचार येतो.

**भारत जागतिक महासत्ता होणार :** २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सचा पल्ला गाठेल. भारताचे सरासरी अप्रत्यक्ष करसंकलन १.५० लाख कोटींच्या पुढे गेले आहे. भारताने लोकसंख्येच्या बाबतीत जगात पहिला क्रमांक मिळवला. भारत जगातील सर्वाधिक तरुण देश आहे, तर अनेक देश असे आहेत की, जिथे जन्मदर खूप कमी आहे. तिथे लोकं मोठ्या प्रमाणात वृद्धत्वाकडे झुकले असून मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. भारत अशा देशांना कुशल मनुष्यबळ पुरवू शकतो.

**अंबानींचे मोठे योगदान :** पायाभूत सुविधांचे बाबतीत देश वेगाने प्रगती करतोय. अंबानी कुटुंबाचे आभार मानेल की ते देशामध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करत आहेत. अंबानी ज्या गोष्टीला हात लावतात ती जागतिक दर्जाचीच तयार होते. काही करायचे आहे तर 'वर्ल्ड क्लास' करायचे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यामध्ये अंबानी कुटुंबाचा मोठा सहभाग असेल. त्यांनी देशाला दाखवून दिले आहे की आपण 'वर्ल्ड क्लास' होऊ शकतो.

**अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब :** भारताला तरुणांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. तरुणांनीही नवीन तंत्रज्ञान अवलंबिले पाहिजे. नवीन तंत्रज्ञान फायद्याचे आणि नुकसानाचेही आहे. एआयसारखे तंत्रज्ञान रोजगार हिसकावून घेतील, तर याच क्षेत्रात रोजगाराच्या संधीही निर्माण होतील. स्टार्टअप्समध्येही संधी आहे. त्यास सरकारही पाठिंबा देत आहे. तरुणांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. अन्यथा ते समाजातील घातक घटकांच्या आहारी जातील.

# उद्योजक

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, 'उद्योजक' मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी 'उद्योजक' मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातींविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले 'उद्योजक' कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

## महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.राजेश कांदळगांवकर, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री. प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई-उपनगर (एमएमआर) व मुख्य समन्वयक (सीएमईजीपी), कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ९४२३९३६००१, ९४०३६८३१८९. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.३०१, कोळगाव, ता.जि.पालघर. ☎८६६९०५४०७८ श्री.प्रदीप सावंत, चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ☎७९७७२४२१६७, ८८५०२९२८४८. श्री.एस.के.बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी.एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मॉडेल वुलन मिलसमोर, मुलुंड चेक नाका, ठाणे-४०० ६०२.☎ २५८२५३४८, ७७७४०५३०१४. श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), पटेल मोटर्स, नगरपालिकेजवळ, शेतकरी भवनाजवळ, अलिबाग, जि. रायगड-४०२ २०१. ☎७९७७२४२१६७. श्री.राजेश कांदळगांवकर, प्र.अ. जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, मो. ९४२३९३६००१. **पुणे विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.मिलिंद लोंढे, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा एएसएम कॉलेज, सेंटर मॉलसमोर, स्टर्लिंग होंडा शो-रूमजवळ, पुणे-मुंबई महामार्ग, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१८. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. **कोल्हापूर विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री. प्रवीण कायंदे, क.प्र.अ. सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), दत्ताजी चेंबर्स, ३१५/ई, न्यू शाहूपुरी, मेरा हॉटेलसमोर, एस.टी.स्टॅंडजवळ, कोल्हापूर-४१६ ००२. ☎(०२३१) २६६६७४८, २६६२०७१,९४०३०७८७५३, ९४०३०७८७७४, ९४२२८१०८६३. श्री.प्रवीण कायंदे, क.प्र.अ. एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ. एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०३०७८७६७. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग. ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. **नाशिक विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, श्री. एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक. ☎२३५२१५१, २३६३४१४, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ७७२००७५९०१. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.विनोद तुपे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, १०४९२२८८८८. श्री.डी.एस.लाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. **नागपूर विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६३ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टॅंडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर. ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४. ☎२५०२७४. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.डी.यु. थावरे, विभागीय अधिकारी, सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९४०३६८३१७३. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ९४०४९५०००४. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. **नांदेड विभाग :** श्री. किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३११७. प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, कारेगाव मार्ग, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ८२७५५२१२८३. श्री. दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९४०३६८३११७. श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, धन्वंतरी मेडिकलच्या पाठीमागे, हॉल नं.४, मेन रोड किनवट, जिल्हा नांदेड, मो. ९४०३६८३११७. **अमरावती विभाग :** श्री.पी.व्ही.इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री.राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही. मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८.० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जातकर भवन, टिळकवाडी, बस स्टॅंड मार्ग, बुलढाणा. ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रुपेश हिरुलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम. मो. ९४०५३१५९४६.



## जागतिक युवा कौशल्य दिनविशेष

# पदवीसोबत कौशल्य आत्मसात करा

**चांगले शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही, अशी तरुणांची तक्रार असते. मात्र नोकरीच्या बाजारात केवळ पदवीला महत्त्व नसून विशेष कौशल्य आवश्यक आहेत. कौशल्य आपणास इतरांपेक्षा वेगळे बनवतात, आपल्यातील वेगळेपण दाखवतात. ही कौशल्ये कोणतीही असू शकतात. यात स्वजागृती, संवाद कौशल्य, समानुभूती, सृजनशीलता, समस्या निवारण, निर्णय क्षमता यासारख्या कौशल्यांचा अंतर्भाव होतो. १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्ये दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने युवकांसाठी आवश्यक कौशल्यांची माहिती देणारा हा विशेष लेख.**

**- जीवन मुळे**

प्रतिवर्षी १५ जुलैला जागतिक युवा कौशल्ये दिन (World Youth Skills Day) साजरा केला जातो. एकविसाव्या शतकात व्यक्तीकडे व्यावसायिक, वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी किमान दोन तरी विशेष कौशल्ये असणे अनिवार्य आहे. या दोनपैकी एखादे कौशल्य तुमच्या इतर सहकाऱ्यांकडे, स्पर्धकाकडे नसलेले असेल तर तुमचे कार्यस्थळी प्रभुत्व, वेगळेपण ठळकपणे उठून दिसते. तुमचे महत्त्व वाढते.

सबब, युवा कौशल्ये दिनाच्या निमित्ताने जगभर या दिवशी आपल्या तरुणाईच्या कौशल्य क्षमतांचा, त्यासाठी उपलब्ध सोयी, संसाधने इत्यादींचा आढावा घेतला जातो. त्याचबरोबर कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी विविध पातळींवर विचार-विनिमय, धोरणात सुधार, प्रशिक्षण, समाजात लेख तथा वक्तृत्व माध्यमातून जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न व कृती आराखडा तयार करण्याबाबत पावले उचलली जातात. गेल्या वर्षी 'तरुणाईच्या उज्ज्वल भविष्यासाठी कौशल्यांमध्ये परिवर्तन' ही थीम जगभरात या दिनाच्या निमित्ताने वापरण्यात आली; कारण एकदा मिळवलेली कौशल्ये जन्मभर उपयुक्त ठरत नाहीत. वेळोवेळी त्यामध्ये परिवर्तन, अद्ययावतता, काळानुरूप बदल करणेही तेवढेच आवश्यक असते. रि-स्किलिंग, अप-स्किलिंग नेहमी गरजेचे असते. शिवाय ज्या युवांकडे रोजगार-स्वयंरोजगारक्षम कौशल्यांचा अभाव आहे, त्यांना कौशल्याधारित होण्याबद्दल जागृत करण्याच्या उद्देशानेही हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळेच नवी पिढी भविष्यातील आव्हानांवर यशस्वी मात करू शकते.

भारतात १५ ते २९ वयोगटातील तरुणांची संख्या फार मोठी

आहे. त्याचबरोबर, यापैकी जवळपास ३५ टक्के लोक आवश्यक कौशल्याअभावी सक्षम, सन्मानजनक रोजगार प्राप्त करू शकत नाहीत. ही चिंतेची बाब आहे. आपल्याकडे औपचारिक व्यवसाय शिक्षण, कौशल्य घेतलेल्या लोकांची टक्केवारी २० टक्क्यांच्या आसपास रेंगाळते आहे. त्यामुळे उर्वरित ८० टक्के व्यक्तींना येत्या २५ वर्षांत रोजगारक्षम, कुशल, उद्योजकतापूरक करण्याचे मोठे आव्हान आहे. वर्ष २०४७ मध्ये (स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करताना) भारत विकसित राष्ट्र म्हणून जगात नावलौकिक धारण करू इच्छितो. त्यासाठी कौशल्य विकासाशिवाय पर्याय नाही.

त्यामुळे भारतीय युवा पिढीने वेळेत जागे होऊन विविध विशेष कौशल्यांची आवश्यकता समजून घेणे आणि त्यापैकी किमान खालील दोन प्रकारची कौशल्ये आत्मसात आणि अद्ययावत करणे गरजेचे आहे. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी कौशल्य विकासाला अजिबात पर्याय नाही, हे पक्के लक्षात ठेवा. त्याशिवाय तुम्हाला वैशिष्ट्यपूर्ण काम करणे/करून घेणे अशक्य होईल.

**उपजीविका कौशल्ये** : अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी एखादा पोटापाण्याचा उद्योग-व्यवसाय, नोकरी करणे आवश्यक असते. त्यातून मिळणाऱ्या कमाईवर कुटुंबाचे पालन पोषण अवलंबून असते. यासाठी मूलभूत गरज असते, ती तुम्ही रोजगारक्षम (employable) असण्याची. एका सर्वेक्षणानुसार भारतातील ४६ टक्के पदवीधर नोकरीसाठी नियोक्त्याकडून (employer) नाकारले जातात; कारण ते नोकरीसाठी पात्र असले तरी रोजगारक्षम नसतात. (Eligible but not Employable). नेमून दिलेले काम, कौशल्य नसल्यामुळे सक्षमपणे करण्यास असमर्थ ठरतात. याचमुळे एका बाजूला नोकरीची अनेक पदे रिक्त राहतात, तर दुसऱ्या बाजूला बेरोजगारांची संख्या वाढताना दिसते.

उमेदवाराने रोजगारक्षम होण्यासाठी, प्रमोशनसाठी, नोकरी, व्यवसाय क्षेत्रात प्रगती करण्यासाठी ज्ञानाबरोबरच विशेष कौशल्यही आत्मसात केले असेल तर त्याला इतरांच्या आधी संधी मिळते. सर्वसाधारणपणे या प्रकारच्या विशिष्ट क्षेत्राशी संबंधित आवश्यक कौशल्यांना उपजीविका कौशल्ये अर्थात Domain specific skills म्हणतात.

**जीवन कौशल्ये** : सध्याचे युग स्पर्धेचे आहे. तुम्हाला जीवनात इतरांपेक्षा अधिक प्रगती करायची असेल, अग्रेसर राहायचे असेल, तर केवळ उपजीविका कौशल्ये असणे पुरेसे नसते. जीवन कौशल्ये आत्मसात करण्याची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे जीवनात तुम्ही अधिक यशस्वी, सुखी आणि आनंदी होऊ शकता. जीवन कौशल्ये व्यावसायिक विकासासह व्यक्तिमत्व (वैयक्तिक) विकास आणि सामाजिक विकासासाठीही आवश्यक व उपयुक्त सिद्ध होतात.

जागतिक स्तरावर स्वीकारण्यात आणि अंमलात आलेली मूलभूत दहा कौशल्ये पुढीलप्रमाणे आहेत - स्वजागृती, संवाद कौशल्य, समानुभूती, सर्जनशीलता, समस्या निवारण, निर्णय कौशल्य, आंतरव्यक्ती संबंध जोपासना, चिकित्सक विचार कौशल्य, ताण-तणाव समायोजन, भावनांचे समायोजन. या प्रत्येकाबद्दल महत्त्वपूर्ण मुद्दे याप्रमाणे -

**१) स्वजागृती** : स्वक्षमता, कमतरता, अभिवृत्ती, आवड याबाबतची स्वतःला यथार्थ जाणीव असेल, तर विकासाची दिशा आणि क्षेत्र ठरवणे व वाटचाल करणे सहज शक्य होते. प्रथमतः स्वतःची बलस्थाने वाढवणे आणि त्यांचा जीवनात योग्य ठिकाणी योग्य उपयोग करायला शिकले पाहिजे. त्याचबरोबर आपल्या कमतरता कमी करणे, त्यांच्यावर मात करणेही आवश्यक असते. त्यामुळे आपला आत्मविश्वास जागा होतो. आपल्यासाठी नोकरी योग्य की उद्योग-व्यवसाय, हे निश्चित करण्यास स्वजाणिवेचा मोठा उपयोग होतो. व्यवसायात मूल्यवर्धन करणे शक्य होते. स्वजागृती झाली की स्व-आदर आपोआप वाढतो. जीवनात स्वतः आनंदी राहून, इतरांनाही आनंदी करता येते. खऱ्या स्व-परिचयाचा हा सोपा मार्ग आहे.

**२) संवाद कौशल्य** : व्यवसायासाठी लिखित आणि मौखिक, अशा दोन्ही प्रकारच्या संवादाची आवश्यकता असते. ग्राहकाला आपले उत्पादन घ्यावे वाटावे, त्याच्या गुणवत्ता आणि उपयुक्ततेबाबत खात्री पटावी, म्हणून संवादाद्वारे योग्य प्रयत्न करावे लागतात. संवादाने माणसं जोडली जातात. आनंदाची अनुभूती प्राप्त करण्याचा हा सोपा मार्ग आहे. प्रतिसादात्मक संवाद करण्यासाठी संवाद कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. देहबोलीतून होणारे संवाद, न बोलता सूचक वक्तव्यातून व्यक्त झालेले संवाद, समजण्यासाठी संवाद कौशल्य विकसित केले पाहिजेत. व्यवसायात भाषण, संभाषण, सादरीकरण इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठी भरपूर वाचन, मनन फार गरजेचे आहे. वैयक्तिक जीवनातही हे प्रसंग येतात. त्याप्रसंगी सर्वात जास्त आणि प्रभावशाली उपयोग संवाद कौशल्याचाच होतो.

**३) सहसंवेदना (समानुभूती, Empathy))** : दुसऱ्या व्यक्तीच्या भूमिकेत स्वतःला समरस करून त्यांच्या समस्या, भावना, विचार, संवेदना इत्यादीची जाणीव (अनुभूती) होणे म्हणजे समानुभूती (एम्पथी Empathy) होय. सहानुभूती आणि समानुभूती यामध्ये फरक आहे. एम्पथी हे एकविसाव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण कौशल्य म्हणून ओळखले जाते. वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनातही यशस्वी होण्यासाठी, मानवी संबंधांची जोपासना करण्यासाठी जगभर उपयुक्त सिद्ध झाली आहे. नेतृत्वाला, व्यवस्थापकाला जर हे कौशल्य अवगत असेल तर कामात आपलेपणा झिरपतो. कामाप्रति तसेच संस्थेप्रति ही आपुलकी कर्मचाऱ्यास अधिक उत्पादन निर्माण करण्यास कळत-नकळत प्रेरक ऊर्जा ठरते. स्वच्छ विचार, आचार आणि उच्चार यामधून हे कौशल्य विकसित करता येते.

**४) सृजनशीलता (Creativity)** : उत्तम, सशक्त कल्पनेला प्रयत्नपूर्वक दिलेले मूर्त स्वरूप म्हणजे सर्जनशीलता. नवनवीन

गोष्टींचा शोध घेण्याची, नवनिर्मितीची क्षमता प्रत्येक व्यक्तीकडे असते. असा एखादा कल्पक विचार सुचल्यानंतर त्यावर विनाविलंब साधक-बाधक विचारविनिमय करा आणि त्याचे उपयोजित निर्मितीमध्ये रूपांतर करा. त्यासाठी चौकटीबाहेर विचार करणे हितकारक ठरते. इतरांच्या अशा हटके कल्पनांचा आदर करा. निर्मितीक्षम कल्पक विचार अर्थात क्रिएटिव्ह थिंकिंगचे एकविसाव्या शतकातील महत्त्व आणि उपयोगिता विचारात घेऊन या कौशल्याचा मूलभूत जीवन कौशल्यात समावेश करण्यात आला आहे. जीवनात सृजनशीलता बहुपयोगी आहे.

**५) समस्या निवारण (Problem Solving skill) :** समस्या आणि संधी या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात; कारण यशस्वी लोक समस्यांना संधी समजून त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या समस्येचे निवारण करण्यासाठी अनेक पर्याय सुचवले जाऊ शकतात. त्यापैकी शॉर्टलिस्टद्वारे सर्वसमावेशक पर्याय निवडा. निकष ठरवताना गुणवत्ता आणि अंमलबजावणीतील सुलभता विचारात घेणे आवश्यक ठरते. Know problem, No problem म्हणजे समस्या व्यवस्थित समजून घेतली तर समस्या निवारण करणे सहज शक्य होते. मोठी समस्या असेल किंवा एकाचवेळी अनेक समस्या उद्भवल्या तर समस्येची विभागणी करून एकेक उपसमस्या सोडवणे फायदेशीर ठरू शकते.

**६) निर्णय घेण्याचे कौशल्य (Decision Making skill) :** काही लोक निर्णय घेण्यास टाळाटाळ करतात; कारण त्यांच्याकडे योग्य निर्णय घेण्यासाठी आवश्यक ते कौशल्य आणि आत्मविश्वास नसतो. उत्तम निर्णयकर्ता होण्यासाठी काही पूरक गुण असावे लागतात. उदा. जोखीम स्वीकारण्याची तयारी, इच्छाशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, दूरदृष्टी, अभ्यासूवृत्ती. तसेच काही अवगुण सोडावे लागतात. उदा. पूर्वग्रह, उत्तरदायित्वाचा अभाव, हट्टीपणा, आळस इत्यादी. यासाठी लहानपणापासूनच छोटे, कमी महत्त्वाचे निर्णय घ्यायला शिका. व्यवसायात आणि जीवनात पदोपदी निर्णय घ्यावे लागतात. त्यासाठी लवकरात लवकर निर्णय क्षमता विकसित करावी.

**७) आंतरव्यक्ती संबंध (Interpersonal Relationship) :** वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक जीवनात इतर व्यक्तींशी स्नेहाचे, विश्वासाचे संबंध असतील तरच तुमचे आयुष्य सुखाचे, प्रगतीचे होऊ शकते. दुसऱ्याचे विचार आदरपूर्वक, पूर्वग्रहविरहित ऐकणे ही विकसित मनोवृत्ती मानली जाते. प्रथम इतरांचे विचार, भावना समजून घ्या, मगच इतरांनी तुम्हाला समजून घ्यावे ही अपेक्षा ठेवा. परस्परसंबंध बळकट करणाऱ्या तसेच बिघडवणाऱ्या सवयीबाबत ज्ञान मिळवा. व्यवसायात वाटाघाटी करण्यासाठी या कौशल्याचा फार मोठा उपयोग होतो. जीवनात मैत्रीपूर्ण संबंधाची जोपासना करता आली पाहिजे. त्यासाठी, 'जगामध्ये जगमित्र, जिव्हेपाशी आहे सूत्र' असं बोधवाक्य आहे. स्वतःची जिभ सांभाळा, जीवन सांभाळले जाईल. माणसाचा स्वतःच्या जिभेवर आणि अहंकारावर ताबा असला की, आंतरव्यक्ती संबंध जोपासता येतात.

**८) चिकित्सक विचार कौशल्य (Critical Thinking skill) :** एखाद्या जटील, अवघड समस्येचे निराकरण करताना आधी त्याबाबतचे विश्लेषण करणे इष्ट ठरते. त्यासाठी सारासार, विवेकी विचार करावा लागतो. विवेकपूर्ण विचार कसा करावा हे आधी शिकून घ्या. अशा विवेकी, सारासार विचाराचे कृतीत परिवर्तन करा. त्यातूनच सृजनात्मक नवनिर्मिती होईल. त्यासाठी प्रत्येक पैलूचे सूक्ष्म निरीक्षण आणि पृथक्करण करावे लागते. सर्वसमावेशक, सकारात्मक विचार हा या प्रक्रियेचा पाया असतो. अशा प्रकारे विचार करणारे लोक या तंत्राचे रूपांतर आपल्या नियमित सवयीत करून आपले जीवन सुखी आणि यशस्वी करतात.

**९) ताण-तणाव समायोजन (Coping with Stress) :** जीवनात चार ठिकाणचे ताण प्रामुख्याने बेजार करतात. त्यापैकी व्यावसायिक ताण आणि कौटुंबिक ताण अति तीव्र व अधिक त्रासदायक असतात. सामाजिक ताण आणि इतर ताण हे तुलनेने कमी अपायकारक ठरतात. ताणतणाव समायोजनासाठी ABC (Awareness, Balance, Control) Strategy वापरावी. जागरूकता, संतुलन आणि नियंत्रण तंत्राचा वापर करून तुम्ही तणावमुक्त जीवन जगण्याचा आणि व्यवसाय विकसित करण्याचा यशस्वी प्रयत्न करू शकता.

**१०) भावनांचे समायोजन (Coping with Emotions) :** एकविसाव्या शतकात बुद्ध्यांकापेक्षा (I.Q.) भावनांक (E.Q.) जीवन विकासात अधिक उपयुक्त आहे. आपल्या विचारांचा आणि भावनांचा सुयोग्य मेळ घालून सुयोग्य निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता होय. भावनिक बुद्धिमत्ता ही निरामय आणि यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. त्यासाठी आपल्या आणि इतरांच्या भावना संवेदनशीलतेने, पूर्वग्रहविरहित विचाराने समजून घ्यायला शिका. अशा भावनांचे नियमन आणि समायोजन करता आले पाहिजे. टीमवर्कसाठी हा गुण विशेष उपयुक्त ठरतो.

**आपले वेगळेपण सिद्ध करा :** कार्यस्थळी आपल्याला अधिक महत्त्व, मान मिळण्यासाठी आपल्याकडे काही विशेष कौशल्य हवे असते. त्यामुळे तुम्ही टीमचे, संस्थेचे 'संकटमोचक' ठरू शकता. तुमच्या जबाबदारीच्या बाहेरचे हे काम असते. संस्थेच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी जेव्हा तुमची विशेष मदत होते, तेव्हा साहजिकच तुमचं श्रेष्ठत्व, महत्त्व वाढते. तुमच्या उज्ज्वल कारकीर्दीचा हा भक्कम पाया असतो. तुम्हाला टीमचे 'फ्रेंड, फीलॉसॉफर आणि गाईड' म्हणून मान्यता मिळते. विशेष कौशल्य प्राप्त असेल, तर इतरांच्यापेक्षा सरस, सकस कामगिरीसाठी तुम्हाला आपलं 'युनिकनेस', वेगळेपण बहुमोलाचे वरदान ठरते. तरुणाईने यासाठी प्रयत्न करावेत.

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*

■■



### राज्याचे एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८

# वस्त्रोद्योगातून विणा संपन्नतेचा धागा

**देशातील कापड उत्पादनात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. साखरेपाठोपाठ कापड उद्योग सर्वाधिक रोजगारनिर्मितीचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ हे नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. यातून २५ हजार कोटींची गुंतवणूक होऊ शकते, तर त्यामुळे कापसाची प्रक्रिया क्षमता ३० वरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविणे आणि ५ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलिनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करून प्रादेशिक स्तरावर या कार्यालयाला आता प्रादेशिक वस्त्रोद्योग व रेशीम उपायुक्तालय असे संबोधण्यात येईल.**

**- प्रतिनिधी**

राज्यात विशेषतः विदर्भातील कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या नव्या वस्त्रोद्योग धोरणास मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या माध्यमातून वस्त्रोद्योगात २५ हजार कोटींची गुंतवणूक तसेच पाच लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यासाठी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात येणार आहे.

अलीकडच्या काळात जागतिक स्तरावर तांत्रिक वस्त्रोद्योगात वाढ होत असल्याने नव्या वस्त्रोद्योग धोरणात त्यावर भर देताना राज्यात सहा तांत्रिक वस्त्रोद्योग पार्क स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पुढील पाच वर्षात कापसाची प्रक्रिया क्षमता ३० टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. तसेच वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलिनीकरण करण्यात येणार असून, आजारी सहकारी सूत गिरण्यांच्या पुनर्वसनासाठी या सूतगिरणी भाडेतत्त्वावर देण्याचा तसेच सहकारी सूतगिरणीकडील अतिरिक्त जमीन विक्रीसाठी परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतची योजना तयार करण्यात येणार आहे.

या धोरणात वस्त्रोद्योग क्षेत्राचा विकास आणि वस्त्रोद्योगासाठी कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर आधारित चार विभाग करण्यात आले असून, त्यानुसार प्रोत्साहन लाभ दिले जाणार आहेत. सहकारी घटकांना जास्तीत जास्त ४५ टक्के शासकीय भागभांडवल दिले जाणार असून, प्रकल्पाचा आकार आणि विभागानुसार खाजगी घटकांना भांडवली अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान लघु उद्योजकांसाठी जास्तीत जास्त ४५ टक्के, मोठ्या उद्योगांसाठी ४० टक्क्यांपर्यंत, विशाल प्रकल्पासाठी ५५ टक्केपर्यंत किंवा २५० कोटी यापैकी जे कमी असेल ते आणि महा टेक्नॉलॉजी अपग्रेडेट फंड योजनेसाठी ४० टक्क्यांपर्यंत किंवा २५ कोटी यापैकी जे कमी असेल ते अति-विशाल प्रकल्पांसाठी प्रोत्साहन म्हणून विशेष पॅकेज दिले जाईल.

राज्यातील वस्त्रोद्योगाच्या वाढीसाठी शाश्वत आणि सुपीक वातावरण निर्माण करण्यासाठी सध्याच्या तीनही महामंडळांचे विलिनीकरण करून महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योगविकास महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे.



### अमेरिका-चीनमध्ये चिंता, भारतात मात्र उत्साह

# मंदीतही भारतीय अर्थव्यवस्थेची चांदी

**सध्या जगभरात जागतिक मंदीचे वारे वाहत असताना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वर्तविलेल्या अंदाजानुसार आगामी वर्षात भारताचा विकासदर ५.९% राहील. सरासरी विचार करता हा मंदीच्या काळातील योग्य विकासदर आहे. अमेरिकेचा विकासदर १.६% तर चीनचा ५.२% राहील असा नाणेनिधीचा अंदाज आहे. भारताची अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणात कृषी व कृषीवर आधारित उद्योगांवर अवलंबून आहे. त्यामुळेच कोरोनाच्या काळात जग आर्थिक संकटात असताना भारत तग धरून उभा होता. मंदीच्या काळातही भारताची अर्थव्यवस्था तग धरून राहणे ही मोठी आशादायक बाब आहे.**

**- डॉ. डी. एस. काटे**

भारतीय अर्थव्यवस्थेचे सध्याचे स्वरूप, आव्हाने आणि उपाय हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. जागतिक मंदीतही आपली अर्थव्यवस्था स्थिर कशी राहील, त्याबाबत...

सध्याच्या परिस्थितीमध्ये आंतरराष्ट्रीय मोठमोठ्या कंपन्यांना देशात आमंत्रित करून, उद्योग करण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे; पण खरी परिस्थिती बघितली तर यामुळे आर्थिक विषमताही वाढत आहे. गरीब तरुण रोजगार हे आणखी गरीबच होत आहेत. यासाठी त्यांच्याकडून छोटे छोटे, लघु व सूक्ष्म उद्योग हे त्याच औद्योगिक वसाहतीमध्ये स्थापित करून त्यांना पुरवठादार बनवणे हे अग्रक्रमाने घ्यावे लागेल. हजारो एकरचे औद्योगिक क्षेत्र उभारून मूठभर लोक श्रीमंत होतात. बाकीचे फक्त रोजगारच राहतात. या रोजगारांना छोटे उद्योग-व्यवसायापासून मालक बनवण्याचे ध्येयधोरण येथून पुढे अवलंबवावे लागेल. जनतेच्या कररूपातून येणारा पैसा, त्याची निर्मिती व त्याची उपयुक्तता लोकांच्या श्रमानुसार होणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधांचे देशभरात जाळे निर्माण करत असताना त्यावर खर्चही मोठ्या प्रमाणात होत आहे; पण नक्की किती टक्के लोकांना त्यापासून फायदा होतो? याचेही मूल्यांकन करणे आवश्यक आहे. देशात वस्तू व सेवा कराचा बागुलबुवा वाढत आहे. अंबानी बंधूंनी एक लिटर पेट्रोल घेतल्यानंतर जो कर लागतो तोच कर गरिबांनाही लागतो. याचाच अर्थ असा आहे की, कर रचनेतील हा अप्रत्यक्ष कर सर्वांना सारखाच असतो. भारतामध्ये अप्रत्यक्ष कराचे प्रमाण ५४ टक्क्यांपर्यंत आहे.

अन्नधान्य, खाद्यपदार्थ त्याचबरोबर इतर जीवनावश्यक वस्तू यांचा वापर करण्यात गरिबांची संख्या जास्त आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेत गरिबांचासुद्धा कर व्यवस्थेमध्ये मोठा वाटा आहे, हे आपण विसरतो. देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न जरी वाढत असले तरी गरिबांचे दरडोई उत्पन्न अत्यल्प असून, ही आकडेवारी महागाई व विकासाच्या प्रमाणाात चिंतनीय आहे. विशेष बाब म्हणजे आपण काय खातो? काय वापरतो? हे सरकारला सर्वच ज्ञात आहे; कारण क्रेडिट कार्ड असो, बँक खाते किंवा डिजिटल पेमेंट असो आपली खात्यावर खर्चाची नोंद असतेच. आपण साधा किराणा जरी फोन पे वर घेतला तरी त्यावरून कल्पना येते, आपण कोणत्या पद्धतीची जीवनशैली जगतो, याचीही सरकारकडे नोंद आहे. इथून पुढे कर बुडवणे व कर चोरी करणे शक्य आहे. म्हणजेच सरकारला याचा फायदा निश्चित होईल व मिळत चाललेल्या कर रकमेतून अर्थ गाडा चालवणे सुलभ होत जाईल.

बऱ्याचदा औषधी त्याचबरोबर विमा यावरसुद्धा वस्तू व सेवा कर लावलेले असतात. नागरिकास विमा संरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे; पण सरकार ते करत नाही. उलट नागरिकांनी स्वतःच्या संरक्षणासाठी विमा उतरवला तर त्याच्यावर कर घेते. हे कुठले धोरण आहे? बाहेरच्या देशांमध्ये प्रत्येक सरकारला आपल्या नागरिकाला शंभर टक्के आरोग्य विमा याची सोय करणे आणि त्याचे प्रमाणही शंभर टक्के आहे. आपल्या देशात फक्त ३० टक्क्यांपर्यंत विमा संरक्षणाचा आकडा आहे. जीवन विमा पॉलिसी तर फक्त तीन टक्के लोकांकडे आहे, ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. उर्वरित लोकांना विमा घेण्यासाठी लावलेले कर यामुळे कसे प्रोत्साहन मिळेल? कर रकमेत प्रोत्साहन देऊन त्याचबरोबर जागृती करणे हे काम अपेक्षित आहे.

अन्नधान्य उत्पन्न, पुरवठा व मागणीनुसार भाववाढ झाली तर शेतकऱ्यांचे भले होईल. शेतीमाल भावाच्या किमती थोड्याफार वाढल्या तर महागाई निर्देशांक वाढतो. हे बरेचदा आपण प्रसिद्धी माध्यमातून ऐकतो. देशातील ५५ टक्के जनता कृषी व कृषी उद्योगांवर अवलंबून असताना कृषी खात्यासाठी फक्त एकच केंद्रीय मंत्री आहे, ही आश्चर्याची बाब आहे! तर कृषी विभाग हा किमान पाच ते सहा मंत्र्यांतर्गत स्थापित व्हावा, असे वाटते. जेणेकरून आयात-निर्यात धोरण सुलभ होऊन प्रत्येक दिवशी आयात-निर्यातीबाबतचे अवलोकन करणे अपेक्षित आहे. बऱ्याचदा पूर्णपणे माल खराब झाल्यानंतर निर्णय होतात. या अगोदरच या बाबीवर विचार करायला हवा. शेतमाल योग्य प्रकारे देशांतर्गत बाजारात विक्री होईल व निर्यात होईल याची काळजी घेणे योग्य वाटते.

अनेकदा भाजीपाला त्याचबरोबर इतर मालाच्या किमती अपेक्षेपेक्षा खाली येतात, जेणेकरून त्याची मूलभूत रक्कमसुद्धा निघत नाही, तेव्हा सरकार बघ्याची भूमिका घेते तर इकडे शेअर बाजार अनपेक्षित पडला तर त्यावर ताबडतोब निर्बंध लावून त्यांना सुरक्षितता मिळते. मग शेतीभावाला सुरक्षितता मिळण्याचे धोरण थोडे दूरच राहते. उद्योग-व्यवसाय मोठ्या प्रमाणात उभारताना शेअरद्वारे भांडवल गोळा करण्याची मुभा सरकार देते व बक्कळ पैसा जनतेकडून वसूल केला जातो, मग पर बँकांना कर्ज पुरवठ्याची गरज आहे का? अनेक उद्योगपतींनी कर्ज बुडवून देशाबाहेर पलायन केलं, अनेक बँका मोठमोठ्या उद्योगपतींच्या कर्जामुळे दिवाळखोरीत गेल्या, याची ताजी उदाहरणे आपणास ज्ञात आहेत. कर्ज वाटप व त्याचे प्रमाण याचे कुठेतरी नियोजन व समन्वय असावे.

रशिया-युक्रेन युद्धामध्ये रशियाची व्यापारनीती त्याचबरोबर अमेरिकेची बुडती बँक व्यवस्था आणि चीनचा खुंटलेला आर्थिक विकास याचे विचारमंथन केले, तर भारतीय अर्थव्यवस्था निश्चित आगामी काळामध्ये प्रगतीपथावर राहील. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आगामी वर्षात भारताचा विकासाचा दर ५.९ टक्के राहील. सारासार विचार करता हा मंदीच्या काळातील योग्य विकासदर वाटतो. त्यामुळे आपला देश हा जागतिक मंदीपुढे तग धरून राहील, यात शंका नाही. अमेरिकेचा विकासदर १.६ टक्के राहील आणि चीनचा विकासदर ५.२ टक्के राहील. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे जर्मनी, ब्रिटन यांचे विकासदर उणे राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे भारताचा विकासदर चांगला राहील यात शंका नाही. जागतिक क्रमवारीचा अभ्यास केल्यास इंग्लंडला मागे टाकत भारत पाचव्या स्थानी अर्थव्यवस्थेत आहे. त्याचबरोबर नुकताच फ्रान्सला मागे टाकत शेअर बाजार जागतिक स्तरावर पाचव्या क्रमांकावर आहे. अन्नधान्य उत्पादनात दोन नंबर तर भारतीयांची क्रयशक्ती तीन क्रमांकावर असल्याने एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे मंदीचे परिणाम दिसून येत नाहीत.

भारतात अन्न उद्योग, सेवा उद्योग, तंत्रज्ञान, वाहन उद्योग व दळणवळण या अनुषंगाने स्थापित केलेल्या उद्योगांसाठी सुवर्णकाळ राहील. बेसुमार औद्योगिकीकरणामुळे होणारा प्रचंड विकास यातून प्रदूषणाची जगावर गडद झालेली समस्या, जोडीला हवामान बदलाचे संकट घेऊन आलेली आहे. यावर उपाय म्हणून अनेक देश गांधीवादी तत्त्वाचा अवलंब करत आहेत. स्वयंपूर्ण ग्रामोद्योग निर्मिती त्याचबरोबर शाश्वत समाज विकास हाच देशाच्या मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया आहे.

*(या लेखकाचे लेखक ज्येष्ठ उद्योजक असून अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात.)*




### प्रसार गरजेचा, वाढतील रोजगाराच्या संधी, एनईपी पोषक

# व्यावसायिक शिक्षण : काल, आज आणि उद्या

**व्यावसायिक शिक्षण हे मुख्य प्रवाहातील शिक्षणापेक्षा हलक्या दर्जाचे आहे, असा सर्वसामान्य समज आहे. त्यामुळे विद्यार्थी या शिक्षणाकडे जाण्याचे टाळतात. भारतामध्ये औपचारिक व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या कामगारांचे प्रमाण अवघे ५ टक्के आहे. अमेरिकेत हे प्रमाण ५२ टक्क्यांच्या पुढे आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणाला चालना देणे गरजेचे असल्याचे शासनाच्या लक्षात आले आहे. त्यासाठी २०१३ मध्ये राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा तयार करण्यात आला. व्यावसायिक शिक्षणाशी संबंध जोडल्या गेलेल्या सामाजिक दर्जाच्या उतरंडीवर मात करणे हे राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० चे उद्दिष्ट आहे. या अंतर्गत टप्प्या-टप्प्याने सर्वच शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाचे मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये एकात्मीकरण करणे आवश्यक आहे.**

**- डॉ. अभिराम सुरेश डबीर**

### अ) व्यावसायिक शिक्षणाची पूर्वकल्पना :

१२ व्या पंचवार्षिक योजनेच्या (२०१२-१७) अंदाजानुसार औपचारिक व्यवसाय शिक्षण मिळालेल्या १९ ते २४ वयोगटातील भारतीय कामगारांचे प्रमाण अतिशय कमी होते. (५ टक्केपेक्षा कमी) तर अमेरिकेमध्ये हेच प्रमाण ५२ टक्के होते, जर्मनीमध्ये ७५ टक्के आणि द. कोरियामध्ये ९६ टक्के इतके जास्त होते. यावरून हेच लक्षात येते की, भारतामध्ये व्यवसाय शिक्षणाचा प्रसार झपाट्याने करणे आवश्यक झाले आहे.

व्यावसायिक (व्होकेशनल) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प असण्याचे कारण म्हणजे व्यावसायिक शिक्षणात यापूर्वी प्रामुख्याने इयत्ता ११-१२ वी आणि इयत्ता ८ वी व त्यावरील शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले होते. याव्यतिरिक्त व्यावसायिक शिक्षणामधून तसेच घेतलेल्या विषयांमधून इयत्ता ११-१२ वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकडे निवडलेल्या व्यवसायांमध्ये उच्च शिक्षण पुढे चालू ठेवण्यासाठी नेहमीच स्पष्ट असे मार्ग उपलब्ध नसतात. सर्वसाधारण उच्च शिक्षणासाठी प्रवेशाचे निकषदेखील व्यावसायिक शिक्षणाची पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या दृष्टीने बनविलेले नव्हते. त्यामुळे मुख्य प्रवाह किंवा शैक्षणिक टप्प्यांवर त्यांच्या समकक्ष विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांना प्रतिकुल परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्यामुळे व्यावसायिक शिक्षण शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उन्नतीचा मार्ग पूर्णपणे बंद झाला. ही समस्या २०१३ मध्ये राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF-NATIONAL SKILL QUALITY FRAME WORKS) घोषित करून सोडविण्यात आली.

### ब) समज-गैरसमज - काही पैलू

व्यावसायिक शिक्षण हे मुख्य प्रवाहातील शिक्षणापेक्षा हलक्या दर्जाचे आणि मुख्यत्वेकरून ते मुख्य प्रवाहातील शिक्षण न झेपणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे असे मानले गेले. या समजुतीचा विद्यार्थ्यांच्या निवडीवर परिणाम होतो. ही एक गंभीर समस्या आहे, भविष्यात विद्यार्थ्यांना व्यावसायिक, तंत्रज्ञानावरील आधारित शिक्षण-प्रशिक्षण कशाप्रकारे दिले जाईल, याचा संपूर्ण कायापालट करूनच तिचे निराकरण केले जाऊ शकते.

व्यावसायिक शिक्षणाशी संबंध जोडल्या गेलेल्या सामाजिक दर्जाच्या उतरंडीवर मात करणे हे या धोरणाचे म्हणजेच नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० चे उद्दिष्ट आहे. यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमांचे मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये एकात्मीकरण करणे आवश्यक आहे. लहान वयातच पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांमध्ये व्यवसायाची ओळख करून देणे, उद्योजकतेचे गुणधर्म त्यांच्यावर रुजविणे, धोका पत्करण्याची संभाव्य मानसिकता तयार करणे, अर्थव्यवहाराची ओळख व महत्त्व पटविणे, बँका, गुंतवणूक, बचत, कष्टाची तयारी, श्रमाची साधना व महत्त्व या बाबींची ओळख करून देऊन तसे उद्योजकीय संस्कार नवीन युवापिढीमध्ये बालवयात रुजविणे ही नव्या शैक्षणिक धोरणाची गुरुकिल्ली आहे. जेणेकरून गुणवत्तापूर्ण

व्यावसायिक शिक्षणाचे उच्च शिक्षणात, सहजतेने एकात्मीकरण केले जाईल. प्रत्येक मुल किमान एक व्यवसाय शिकेल आणि इतर अनेक पूरक व्यवसायांची त्याला ओळख करून दिली जाईल, हेदेखील नवीन शैक्षणिक धोरणात महत्त्वाचे आहे आणि यावर प्राधान्याने भर दिला जाईल. त्यामुळे श्रमप्रतिष्ठा आणि भारतीय कला व कारागिरी यांचा समावेश असलेल्या विविध भारतीय व्यवसायांचे महत्त्व यावर भर दिला जाऊन पारंपरिक, सामाजिक व्यवसायाचे पुनरुज्जीवन व आधुनिकीकरण होण्यास मदत मिळेल व त्या त्या क्षेत्रातील पिढ्यान्‌पिढ्या व्यवसाय, कारागिरी करणाऱ्या समाजाच्या पुढील पिढ्या, युवा पिढी यांना तंत्रज्ञानावर विशेषतः आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित व्यवसायांसाठी चालना मिळेल.

**क) तंत्रज्ञान क्षेत्रात वाढत असलेल्या महिलांसाठी संधी :**

भारतात आता डिजिटल युगात मुलींना प्राथमिक एसटीईएम (STEM) (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनीअरिंग आणि मॅथेमॅटिक्स) वर आधारित शिक्षण घेणे आवश्यक झाले आहे. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी महिलांना अनेक अडथळे पार करावे लागले आहेत; परंतु आता या क्षेत्रात महिला विश्वासाने प्रगती करीत आहेत. उद्योगांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे आणि अनुकूल सामाजिक वातावरणामुळे भारत या क्षेत्रातील महिलांच्या स्थानामध्ये अग्रेसर होऊन लिंगभेदविरहीत भविष्य घडवू शकतो. आज भारत सरकारच्या STATISTICAL SURVEY OF INDIA च्या अहवालानुसार आज 'STEM' कर्मचाऱ्यांपैकी १४.१ टक्के महिला असून, ही संख्या उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. जागतिक स्तरावरून IMF, World bank, UNO, WHO आदी संस्थांनी भारतामध्ये कर्मचारी सहभागामध्ये महिलांची संख्या व सहभाग वाढवल्याची गरज प्रतिपादन केली.

**ड) गती आणि किरण - समन्वय**

सुदैवाने आता 'गती' आणि 'किरण' सारख्या सरकारी योजनांद्वारे या दिशेने सकारात्मक पावले उचलली गेली आहेत. (GENDER ADVANCE NEXT FOR TRANSFORMING INSTITUTIONS (GATI)) गतीमध्ये 'एसटीईएम' क्षेत्रात महिन्यांचे समान प्रतिनिधित्व वाढवण्यावर भर दिला जातो आहे आणि त्याचा समन्वय (KNOWLEDGE INVOLVEMENT AND RESEARCH ADVANCEMENT THROUGH NURTURING) (KIRAN) 'किरण'शी सहकार्य करून केला जातो आहे.

भारतामध्ये व्यावसायिक आणि तांत्रिक क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांची संख्या २९.२ टक्के वरून आता ३२.९ टक्क्यांवर पोहोचली आहे. ३८ ते ४० टक्के महिला कर्मचारी हे प्रवेश स्तरावर आहेत. एमपीएससी, यूपीएससीसारख्या राज्य/राष्ट्रीय निवड पातळीवर देखील महिलांचा अग्रक्रम व निवड प्राधान्याने झालेली पाहायला मिळतेय. यूपीएससीचा ताजा निकाल हा WOMEN HEADED TOPPERS असणारा आहे. पहिल्या ४ ही टॉपर रँकिंग महिला आहेत. ही निश्चितच भारतासारख्या विकसित टप्प्यावर उभ्या असलेल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. भारतामध्ये आज महिला व्यवस्थापन, वरिष्ठ व्यवस्थापन, आणि कार्यकारी पदांवर अनुक्रमे २६ टक्के, १९ टक्के, १७ टक्के याप्रमाणे विराजमान आहेत. विविध कंपन्या फॉरेन्सिक, सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, ब्लॉक चेन्स, शेअर मार्केट्स यासारख्या विविध आधुनिक कौशल्य संचांमध्ये महिलांची प्रतिभा आणि प्रतिमा शोधत आहेत. डिजिटल क्रांतीसाठी ५० टक्के लोकसंख्या असणाऱ्या महिलांचा सशक्त सहभाग हा या क्षेत्रातील क्रांतीसाठी पूरक ठरणारी बाब आहे, हे अधोरेखित केले पाहिजे. 'शिरोज' नावाची क्लाऊड वर्कफोर्स महिलांसाठी सामाजिक नेटवर्क क्षेत्रातील महत्त्वाचे इको सिस्टीम म्हणून उदयास आले असून, महिलांच्या व्यावसायिक, उद्योजकता विकासासाठी ती अनेक व्यवसाय व उपाय सुचविते. हा एक सहज उपलब्ध क्लाऊड वर्कफोर्स आहे की जो तुम्हाला 'एसटीईएम' क्षेत्रात तुमचे ज्ञान व कौशल्यावर आधारित एक मजबूत व्यासपीठ बनवू शकतो. महाराष्ट्र राज्याचे उद्योग विभागाने २०१७ साली नव्याने जीर्णोद्धार केलेले महिला धोरण याच महिलांच्या सशक्तीकरणाच्या अनुषंगाने त्यांना स्वयंरोजगार व महिला नवउद्योजक म्हणून उभे करण्यासाठी आखलेले दूरगामी धोरण आहे. आज देशात (MSME) क्षेत्राचा अभ्यास केल्यास महिला उद्योजकांची संख्या १० टक्क्यांच्या आत आहे. ही संख्या किमान २५ टक्क्यांवर नेण्यासाठी शासनाचे महिला धोरण व शासनाच्या विविध उद्योजकीय योजनांद्वारे एकत्रीकरण करून महिला सशक्तीकरण करण्याचा प्रयत्न अहोरात्र सुरू आहे.

**इ) आगामी वाटचाल : इंडस्ट्री - इन्स्टिट्यूट इंटरॲक्शन सक्षमीकरण**

पुढील दशकात टप्प्याटप्प्याने सर्व शाळा आणि उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये व्यावसायिक आणि उद्योजकताविषयक शिक्षण, प्रशिक्षण एकात्मिक केले जाईल. नव्या राष्ट्रीय धोरण शैक्षणिक वाटचालीमध्ये याबाबत दिशानिर्देश आहेत. कौशल्य तफावत विश्लेषणाच्या आणि स्थानिक संधींच्या मॅपिंग आधारे व्यावसायिक शिक्षणासाठी, अचूक तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य विकासासाठी शिक्षण-प्रशिक्षणाची लक्ष केंद्रित करण्याची क्षेत्रे निवडण्याची प्रक्रिया SECTOR SKILL COUNCILS द्वारे सुरू झाली आहे. या प्रयत्नांवर देखरेख करण्यासाठी एमएचआरडी व्यावसायिक शिक्षणातील आणि उद्योजकता विकास उद्योग क्षेत्रातील (NCIVE - NATIONAL COMMITEE FOR INTEGRATION OF VOCATIONAL EDUCATION) उद्योगक्षेत्राच्या सहकार्याने स्थापन करेल. या यंत्रणेद्वारे ही माहिती इतर सर्व संस्थांशी शेअर केली जाईल. म्हणजे मग व्यावसायिक आणि उद्योजकीय शिक्षणाचा-प्रशिक्षणाचा आवाका वाढेल. (NEP 2020) ची प्रभावी अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३ जुलैपासून सुरू होते आहे. या पार्श्वभूमीवर (HEI - HIGHER EDUCATION INSTITUTES) उच्च शिक्षण-प्रशिक्षण संस्थादेखील व्यावसयिक शिक्षण आणि अँप्रेंटिसशिपचे विविध मॉडेल्स तर प्रयोग करतील आणि उच्च शिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उद्योजकता विकास क्षेत्रातील देशभरातील अग्रगण्य संस्थांमध्ये व्यवसाय-उद्योगांच्या सहभागाने अंतःपोषण केंद्रे सुरू केले जातील. जेणेकरून विद्यापीठीय स्तरावर काम करीत असलेली इन्क्युबेशन, इनोव्हेशन ॲण्ड आंत्रप्रीन्यूरशिप विकास केंद्रे अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास वाटतो.

*(हे राष्ट्रीय पातळीवरील उद्योजक-प्रेरक-प्रशिक्षक आहेत. सध्या ते एमसीईडी मुख्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५१ आहे.)*

## महाऑर्गेनिक शेतकरी उत्पादक कंपनीचा पर्यावरणपूरक कृषी कट्टा

# ग्राम परिवर्तनाचे शाश्वत सेवा केंद्र




**भारतातील तब्बल ७० टक्के लोकसंख्या ही शेती आणि शेतीवर आधारित उद्योग-व्यवसायांवर अवलंबून आहे. वाढलेल्या शहरीकरण आणि आधुनिकीकरणाच्या ओघात शेती व्यवसाय टिकणे जिकिरीचे होऊन बसले आहे. त्यासाठी महाऑर्गेनिक शेतकरी उत्पादक कंपनीने कृषी कट्टा शाश्वत सेवा केंद्र ही अभिनव कल्पना आखली आहे. शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून, पर्यावरणाचा समतोल राखून, शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा मार्ग दाखवणे हा कृषी कट्ट्याचा प्रमुख उद्देश आहे. शाश्वत शेतीकडे जाण्यासाठी लागणारी माहिती व मार्गदर्शन हे केंद्र पुरवत आहे.**

**- प्रसाद घारे**

आधुनिक तंत्रज्ञानावर स्वार होऊन सध्या भारत प्रगतीची वेगवेगळी शिखरे सर करीत असला तरी जगाच्या नकाशावर भारताची ओळख आजही कृषिप्रधान देश अशीच आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. याचे कारण आजही भारतातील ६५/७० टक्के जनता ही कृषी व कृषी आधारित उद्योग-व्यवसायावर अवलंबून आहे. झपाट्याने वाढणारे शहरीकरण आणि आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या या युगात शेती आणि शेतकरी टिकून राहणे अतिशय आवश्यक आहे. याचबरोबर शेतीला आधुनिकतेचा साज चढवून ती किफायतशीर कशी होईल, हे पाहणे काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक शाश्वत शेतीशिवाय आता पर्याय नाही. यासाठी महाऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनीने 'कृषी कट्टा : शाश्वत सेवा केंद्र' ही अभिनव कल्पना आखली आहे.

**कसा असेल हा कृषी कट्टा (शाश्वत सेवा केंद्र) :** महाऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनीने सुरू केलेली ही एक अभिनव कल्पना आहे. हे एक ग्रामीण विकास केंद्र आहे. प्रत्येक गावामध्ये एखादा पार किंवा कट्टा असतो, जिथे निवांत वेळी गावातील लोक एकत्र येतात आणि दिवसभरातल्या चांगल्या-वाईट गोष्टींवर खेळीमेळीच्या वातावरणात गप्पागोष्टी व विचारांची देवाण-घेवाण करतात. याचीच एक प्रतिकृती म्हणून 'महाऑरगॅनिक' ने कृषी कट्टा ही संकल्पना विकसित केली आहे. कृषी कट्टा सेवा केंद्रातून शेतीविषयक, शेतीपूरक माहिती व दर्जेदार जैविक उत्पादने पुरवण्याचा उद्देश आहे.

**काय आहे सद्यःपरिस्थिती :** शेतकऱ्यांना शेतीविषयक माहिती मिळवण्यासाठी गावातील खतं, औषधांचे दुकान हाच सोयीस्कर पर्याय असतो. कुठलं पीक लावायचं इथपासून ते कुठल्या कंपनीचे बियाणे घ्यायचे म्हणजेच बियाणांपासून ते औषधांच्या डोसपर्यंत तसेच पिकांची काढणी पश्चात उपक्रम, बाजारपेठ इत्यादीबद्दल माहिती या दुकानदारांकडून मिळवली जाते. बऱ्याच वेळेला हा दुकानदार स्वतःच्या दुकानातल्या मालाची विक्री होण्याच्या दृष्टिकोनातून सल्ला देतो. बहुतेक वेळेला या दुकानदाराकडे शेतीविषयक तांत्रिक माहिती, पिकांबद्दल समग्र ज्ञान अभावानेच असते. थोडक्यात, विक्री करणे या उद्देशानेच तो काम करीत असल्याने शेतकऱ्याला योग्य सल्ला मिळत नाही. यातून अकारण खर्च वाढून शेती परवडेनाशी होते. योग्य माहिती न मिळाल्याने व कारण नसताना जास्तीची व चुकीची खतं, औषध वापरल्याने जमिनीचा पोत बिघडतो, पर्यावरणाचा ऱ्हास होतो ही गोष्ट वेगळीच.

पर्यावरणपूरक शाश्वत शेतीबद्दलची माहिती, ज्ञान आणि त्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट तंत्र निविष्ठा याची सध्या वानवा आहे. सध्याची परिस्थिती बघता पर्यावरणपूरक शेतीशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक शाश्वत शेतीबद्दल योग्य माहिती देणे, सल्ला देणे ही काळाची गरज आहे. 'शेतकरी टिकला तर इतर संरचना टिकतील' या विचाराने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, खर्च कमी करणे, मातीचा, पाण्याचा, पर्यावरणाचा समतोल राखणे हा

उद्देश डोळ्यासमोर ठेवून काम करणे गरजेचे झाले आहे. 'कृषी कट्टा' ही संकल्पना याच तत्त्वावर आधारित आहे.

**काय आहे कृषी कट्टा सेवा केंद्राची खासियत :** शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून, पर्यावरणाचा-निसर्गाचा समतोल राखून शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे हा कृषी कट्ट्याचा मुख्य उद्देश आहे. या उद्देशाकडे पोहोचण्यासाठी लागणारी योग्य शास्त्रोक्त माहिती देणे, सल्ला देणे तसेच अशा शेतीस लागणाऱ्या निविष्ठा (जैविक खतं, औषधं, सरळ वाण बियाणे, चिकट सापळे, काम गंध सापळे, नैसर्गिक प्रतिजैविके, संजीवके इत्यादी) तसेच शेतीपूरक दर्जेदार उत्पादनांचा (स्प्रे पंप, ग्लोव्हज, मास्क, पीएच मीटर, मॉईश्चर मीटर) पुरवठा कृषी कट्टा करणार आहे. रासायनिक शेतीकडून शाश्वत शेतीकडे जाण्यासाठी लागणारी माहिती, मार्गदर्शन व निविष्ठा कृषी कट्टा सेवा केंद्र पुरवणार आहे.

**कृषी कट्टा नेटवर्क पार्टनर :** कृषी कट्टा ही एक उत्तम कल्पना आहे. यातून शेतकरी सुधारणार तर आहेच; पण कधीही भरून न येणारे पर्यावरणाचे नुकसानही टाळणार आहे. ही साधी गोष्ट नसून तो एक प्रवाहाविरुद्ध काम करण्याचा प्रयत्न आहे. हे एकट्या दुकट्याचे काम नसून ही परिस्थिती बदलायची असेल, तर महाराष्ट्रात एक चळवळ उभी करावी लागणार आहे.

आधुनिक शेतीतील नव्या पर्यायांसाठी तसेच कमी गुंतवणुकीतून शाश्वत परतावा देणारी कृषी कट्टा सेवा केंद्र चालू करणे हा एक उत्तम पर्याय आहे. सुशिक्षित तरुण-तरुणी व उद्योजकांसाठी कृषी कट्टा सेवा केंद्र हे ग्रामीण विकास केंद्र म्हणून काम करणार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ही सेवा पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून आपल्याला जास्तीत जास्त नेटवर्क पार्टनर्स बनवायचे आहेत. यातून दोन गोष्टी साध्य होणार आहेत - एक म्हणजे ग्रामीण सुशिक्षित तरुण-तरुणींना व्यवसायाची संधी मिळणार आहे आणि दुसरे - महाराष्ट्रातील 'आमची माती आमची माणसं' वाचवण्याची चळवळ देखील उभी राहणार आहे.

**कृषी कट्टा : सुशिक्षित उद्योजकांसाठी उत्तम पर्याय :** कमी गुंतवणुकीत लवकर परतावा देणारा हा पर्याय आहे. यशस्वी उद्योजक होण्यासाठी अखंड मार्गदर्शन व प्रशिक्षण कृषी कट्ट्यांमधून दिले जाईल. यशस्वी व्यवसाय करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी म्हणजे मार्केटिंग, सेल्स, माहिती व सल्ला देण्याची कला, संभाषण कला तसेच आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी फायनान्स, कॅश हँडलिंग, जीएसटी, टॅक्सेशन इत्यादी सेवा देण्याची सोय येथे केली जाणार आहे. कृषी कट्ट्याचे सुयोग्य व समान ब्रँण्डिंग, जाहिरात, प्रमोशनल ॲक्टिव्हिटीचे पाठबळ पुरवले जाणार आहे.

**कृषी कट्टा निविष्ठा उत्पादक कंपन्यांसाठी... :** पर्यावरणपूरक, नावीन्यपूर्ण, शास्त्रोक्त, दर्जेदार, प्रामाणिक व गुणकारी कृषी निविष्ठा ही काळाची गरज आहे. सध्या अनेक होतकरू सुशिक्षित व्यावसायिक अशा निविष्ठा बनवत आहेत; परंतु यापलीकडे जाऊन त्यांना अनेक समस्यांना, अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणजे मार्केटिंग टीमच्या माध्यमातून कृषी काउंटर शोधणे, उत्पादनाची माहिती देणे, शेतकऱ्यांसाठी डेमो प्लॉट करणे, डीलर, डिस्ट्रिब्युटर यांची साखळी तयार करणे, निविष्ठांचा व उत्पादनांचा पुरवठा करणे आणि सरतेशेवटी पेमेंटसाठी पाठपुरावा करावा लागणे. या सर्व गोष्टींसाठी बराच वेळ व पैसा खर्ची पडतो.

कृषी कट्टा मध्यवर्ती प्रणालीतून (सेंट्रलाईज सिस्टीम) काम करत असल्याने निविष्ठा उत्पादकांना आधार मिळून खर्च कमी होणार आहे. मार्केटिंग आणि वसुलीवर जास्त वेळ व पैसा खर्च करण्यापेक्षा नवीन संशोधन, प्रॉडक्टची निर्मिती, त्याची क्वालिटी यावर त्यांना जास्त लक्ष केंद्रित करता येईल. कृषी कट्टा केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे, प्रॉडक्टबद्दलची माहिती, फीडबॅक घेणे सोपे जाणार आहे. सेंट्रलाईज सिस्टीममधून कृषी कट्टा मोठ्या प्रमाणावर खरेदी करून मग नेटवर्क पार्टनरला पुरवठा करणार असल्याने प्रॉडक्ट बिलिंग कृषी कट्ट्याच्या माध्यमातूनच होणार आहे. अशाप्रकारे कृषी कट्टा सेवा केंद्र हे शेतकऱ्यांसाठी, सुशिक्षित उद्योजकांसाठी व निविष्ठा उत्पादकांसाठी नवीन संधी घेऊन येत आहे. कृषी कट्ट्याच्या माध्यमातून ग्रामीण परिवर्तनास सुरुवात करून राष्ट्रनिर्मितीस हातभार लावणे हे 'महाऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनी' चे ध्येय आहे. डीलर, डिस्ट्रिब्युटरची साखळी कमी झाल्याने निविष्ठा उत्पादकांना जास्त परतावा मिळणार आहे व शेतकऱ्याला कमी किमतीत निविष्ठा मिळणार आहे.

**कृषी कट्टा टीम :** कृषी कट्टा सांभाळणारी टीम उच्चशिक्षित व अनुभवी असून सर्वजण शेतकऱ्यांची मुले आहेत. ते केवळ सातबारावरचे शेतकरी नसून यातील कित्येकांनी प्रत्यक्ष शेती केली आहे. शेतीतील प्रश्न, समस्या, संधी यांचे ज्ञान त्यांना आहे. कृषी कट्ट्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवी दिशा देण्याचे काम ही टीम करणार आहे. प्रामाणिकपणा, पारदर्शकता, सातत्य, चिकाटी हे कृषी कट्टा संकल्पनेचे आधारस्तंभ असणार आहेत. हे मुद्दे रोजच्या व्यवहारात आणण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. तेव्हा कृषी कट्टा या अभिनव संकल्पनेत सहभागी व्हा आणि बळीराजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करा.

कृषी कट्ट्याच्या अधिक माहितीसाठी जरूर संपर्क साधा आणि कृषी कट्टा या अभिनव संकल्पनेत सहभागी व्हा.

**संपर्क :** महाऑरगॅनिक फार्मर प्रोडक्ट्स कंपनी ऑफिस नंबर तेरा, 'बी' बिल्डिंग, आनंदमयी अपार्टमेंट, कर्वे रोड, पुणे - ४११००४ येथे संपर्क साधावा. संपर्क क्रमांक ७७५५९३३८८० आणि ९९२२४८८७५० व ईमेल info@krishikatta.com आणि www.krishikatta.com

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल prasad.ghare@gmail.com आहे.)*



## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०

# पारंपरिक ऊर्जेला भक्कम पर्याय

**ऊर्जा क्षेत्रातील संभाव्य बदलांचा वेध घेऊन सौर ऊर्जेला व्यापक चालना देणारी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' शासनाने अंमलात आणली आहे. त्यात जास्तीत जास्त फीडर सौर ऊर्जेवर आणण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतीला दिवसा १२ तास वीजपुरवठ्याबरोबरच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा भार कमी होणार आहे. राज्यात साधारणतः ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या अभियानात होणे अपेक्षित आहे. योजनेची अंमलबजावणी केवळ राज्यातच नव्हे तर देशातील ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.**

**- प्रतिनिधी**

सौर ऊर्जा स्वस्त आणि हरित ऊर्जा आहे. सौर ऊर्जेपासून वीजनिर्मिती होताना कुठल्याही प्रकारच्या ज्वलन होत नाही. उष्ण कटिबंधातील आपल्या देशात सूर्यप्रकाश भरपूर उपलब्ध असलेला स्त्रोत आहे. त्यामुळे राज्यातील ऊर्जानिर्मिती क्षेत्रात सौर ऊर्जेचा पर्याय भक्कमपणे उभा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' व्यापकपणे राबविण्याचा निर्धार केला आहे.

वीज क्षेत्रात गेल्या दशकात मोठे बदल झाले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना नावाने भविष्याचा वेध घेणारी महत्त्वाकांक्षी योजना २०१७ मध्ये सुरू करण्यात आली. किफायतशीर सौर ऊर्जेचा फायदा औद्योगिक ग्राहकांसह शेतकऱ्यांनाही कसा करून देता येईल याचा विचार त्यात करण्यात आला. योजनेद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध होणार असून सिंचनासाठी ते उपयुक्त ठरेल. गावांतील विविध सुविधा, कार्यालये पूर्णपणे सौर ऊर्जेवर आणण्यात येणार आहेत. ग्रामीण भागामध्ये सौर ऊर्जेच्या संदर्भातली इकोसिस्टीम

साकारण्याचा योजनेचा हेतू आहे. प्रकल्पासाठी सुयोग्य जमिनी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

### 'मिशन २०२५'

देशाने अपारंपरिक ऊर्जा वापरासाठी २०३० पर्यंत ४५० गिगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. साधारणतः एका राज्यात सात हजार मेगावॅटपेक्षा जास्त सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे. विजेच्या मागणीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यातील वीज पंपांची संख्या ४५ लाख आहे. एकूण विजेच्या वापरापैकी २२ टक्के शेतीसाठी होतो. शेतीला परवडणाऱ्या दरात वीज मिळावी यासाठी शासनाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जाते. विजेची वाढती मागणी पाहता भविष्यात क्रॉस सबसिडीच्या माध्यमातून शेतीचे वीजदर मर्यादित ठेवण्यावर मर्यादा येऊ शकते. त्यादृष्टीने वीज ग्राहक, शेतकरी व वीज निर्मिती क्षेत्र अशा सर्वांसाठी ही योजना उपयुक्त आहे. त्यानुसार डिसेंबर २०२५ पर्यंत ३० टक्के कृषी वीजपुरवठा सौर ऊर्जेवर आणण्याचा प्रयत्न आहे. 'मिशन २०२५' च्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची वेगाने व व्यापक अंमलबजावणी करण्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश आहेत व त्या दिशेने वेगाने प्रयत्न होत आहेत.

### ३० हजार कोटींची गुंतवणूक, रोजगारनिर्मिती

योजनेत शेतीला दिवसा वीज पुरवठा करण्याबरोबरच अनेक प्रोत्साहनात्मक सुविधा देण्यात आल्या आहेत. प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने द्यायला तयार असणाऱ्या शेतकरी बांधवांना दर हेक्टरी एक लाख २५ हजार रुपये दरवर्षी एवढा भाडेपट्टा देण्याची तरतूद आहे, महावितरणच्या सबस्टेशनजवळ उपलब्ध जमिनींमध्ये असे प्रकल्प उभे राहतील. सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या उद्योजकांनीही तयारी दर्शवली आहे. असे प्रकल्प उभे राहिलेल्या ग्रामपंचायतींना देखील पहिली तीन वर्षे पाच लाख रुपये प्रति वर्ष असे अनुदान दिले जाणार आहे. राज्यात साधारणतः ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या अभियानात होणे अपेक्षित आहे. योजनेमुळे सौर ऊर्जेबाबत आवश्यक कौशल्यांचा विकास होऊन ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी तयार होणार आहेत. योजनेची अंमलबजावणी केवळ राज्यातच नव्हे तर देशातील ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

### महाप्रीत आणि ग्लोबल एनर्जी अलायन्सेसमध्ये करार

राज्यात अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच एक हजार मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी 'महाप्रीत' (महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित) आणि ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँण्ड प्लॅनेट (GEAPP) मध्ये हेतू करार (Memorandum of Intent) करण्यात आला.

### दोन लाख कृषिपंपांचे उद्दिष्ट

राज्य शासनाने राज्यात दोन लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. या हेतू कराराअंतर्गत GEAPP आणि महाप्रीत कंपनी लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ५०० मेगावॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर प्रकल्प आणि कुसुम (KUSUM) योजनेअंतर्गत ५०० मेगावॅट क्षमतेचे ग्राऊंड-माउंटेड विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मदत करतील. तसेच लघु आणि मध्यम उद्योग क्लस्टर्ससाठी सौर ऊर्जा प्रकल्पाची क्षमता २.५ गिगावॅटपर्यंत वाढविण्याचा मानस आहे. या प्रकल्पांचे व्यवस्थापन, रचना, विकास आणि गुंतवणूक करण्यासाठी 'महाप्रीत'ला या हेतू कराराद्वारे GEAPP सहकार्य करेल, अशी माहिती 'महाप्रीत'चे मुख्य महाव्यवस्थापक दीपक कोकाटे यांनी दिली.

### कार्बन फुट प्रिंट कमी करणार

'GEAPP' अक्षय ऊर्जेच्या दिशेने परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि कार्बन फुट प्रिंट कमी करण्यासाठी कार्यरत आहे. हा हेतू करार म्हणजे त्या दिशेने जाणारे एक पहिले पाऊल आहे. महाराष्ट्रातील लोकांपर्यंत स्वच्छ आणि परवडणारी ऊर्जा उपलब्ध करून देणे हे या प्रकल्पाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे राज्यात २२ गिगावॅट अक्षय ऊर्जा निर्माण करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या उद्दिष्टाला चालना मिळेल. 'महाप्रीत' आणि GEAPP या दोन्हींच्या एकत्रित कौशल्यामुळे आम्ही एक हजार मेगावॅटचे सौर प्रकल्प यशस्वीपणे राबवू आणि शाश्वत भविष्यासाठी योगदान देऊ. या सहकार्यामुळे सर्व भागधारकांसाठी एक शाश्वत व्यवसाय मॉडेल तयार करण्यात मदत होईल आणि प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी 'महाप्रीत'ला संस्थात्मक सहाय्य मिळेल, असे GEAPP चे अध्यक्ष व्यंकटेशन म्हणाले.

### शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन

'महाप्रीत' कंपनीसोबत आमची भागीदारी महाराष्ट्रात शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेद्वारे कार्बन फुट प्रिंट कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल. या सहयोगाद्वारे आम्ही SMEs आणि ग्रामीण समुदायांना स्वच्छ आणि परवडणारी ऊर्जा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे GEAPP चे उपाध्यक्ष सौरभकुमार यांनी सांगितले.

■ ■



## आता कृषी क्षेत्रातही थेट परदेशी गुंतवणूक

# शेती मालाच्या विक्रीतून यशाला गवसणी

**पारंपरिक शेतीचे दिवस आता कालबाह्य झाले असून, यात आधुनिकीकरण आले आहे. घरबसल्या देश-परदेशात मालाच्या विक्रीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आले आहे, तर सरकारचे धोरणही यासाठी पोषक आहे. परकीय कंपन्याही भारतीय कृषी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहेत. त्यामुळेच गेल्या पाच वर्षांत कृषी क्षेत्रात ३.२८ अब्ज डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. या योजनांचा लाभ घेतला तर कृषी मालाची बाजारपेठ वाढल्याशिवाय राहणार नाही. - प्रतिनिधी**

**१. यूपीएल व इतर प्रायोजक नेटवर्क :** उत्पादने अधिक प्रभावी करण्यासाठी यूपीएलचे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय निर्यात नेटवर्क वापरून मार्केटिंग करणे. यूपीएलच्या जागतिक व्यापक नेटवर्कचा विचार केला जावा. व्हेंचर कॅपिटल, एंजल इन्व्हेस्टर्स ग्रुप्स, बँकिंग चॅनेल कॉन्टॅक्ट, उच्च मूल्यवर्धित देणगीदार यांच्यात त्यांचे नेटवर्क आहे. त्यांच्याकडून केवळ टिप्स, सूचना घ्याव्यात; परंतु प्रत्यक्ष काम जीपी टीमने करावे. इतर प्रायोजक नेटवर्कचा समान फायदा इतर पक्ष, संघटनांकडे कोल्ड कॉल करण्यापूर्वी प्रथम वापरला जाऊ शकतो.

**२. केंद्र व राज्य शासकीय लाभ :** विविध शासकीय योजनांना प्रामुख्याने डीबीटीद्वारे सूचीबद्ध केले जाईल आणि २-३ स्वयंसेवकांमार्फत या योजनांमधील त्रुटी वेळेत शोधून प्रत्यक्षात शेतकरीवर्गाला जास्तीत जास्त फायदा मिळवून कार्यान्वित केले जाईल. या उद्देशासाठी अर्जाच्या मुदतीच्या आधारे कॅलेंडर तयार केले जावे. शेवटच्या तारखेच्या आधी १ आठवड्यापूर्वी शेतकऱ्यांचे अर्ज पोहोचले जातील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**३. कृषी सेवांकरिता उद्यमी भांडवलदार नियोजित करणे :** अर्स्पॅन इन्व्हेस्टमेंट, एक्सेल पार्टनर, अंकुर कॅपिटल, असपाडा इन्व्हेस्टमेंट, असा इन्व्हेस्ट, बी नेक्स्ट, बेटर कॅपिटल, एप्सिलॉन व्हेंचर्स, फ्युचर व्हेंचर्स, फॅक्टर इव्हेंचर्स, फार्म ताझा, ग्लोबल इनोव्हेशन गव्हर्नमेंट : राजस्थान, इन्फो एज कॅपिटल, आयडीजी व्हेन्चर्स, इन्फ्यूज व्हेंचर, इन्वेस्टएड डेव्हलपमेंट कलारी कॅपिटल, मिस्लेटो, मिररिंग एग्रोस्टार, एम अॅण्ड एस पार्टनर्स, महिंद्रा अँड महिंद्रा सिंजेंटा ट्रस्ट, एनआरजे निलेकणी ट्रस्ट, एन.ए.ए.आर.एम., ओम्निव्होर पार्टनर, सोफिया इन्व्हेस्टर्स, ओमनी इन्व्हेस्ट, फिनिक्स फंड पायोनियरिंग व्हेन्चर्स, क्वालकॉम व्हेन्चर्स, सैफ व्हेंचर, समृद्धी फंड वेवमेकर, स्टार्टअप एक्सिड व्हेनमेकर.

कृषी मंत्रालयाच्या अहवालानुसार, मागील ५ वर्षांत कृषी क्षेत्रात $ ३.२८ बिलियनची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. हे प्रमाण



सरासरी वार्षिक $ ६.२५ मिलियन आहे. या ध्येयासाठी सीए परमार, सीए जैन यांनी टर्म शीट्स वापरणे, संपर्क साधणे, वाटाघाटीची रणनीती, फंड वापरण्याबाबतचे अहवाल इत्यादींना प्रशिक्षण देण्यासाठी वित्त क्षेत्राच्या ३/४ स्वयंसेवकांना प्रशिक्षण द्यावे. फंडसाठा वेगाने वाढविण्यासाठी कृतीशील कार्य करावे, अधिकाधिक शेतकऱ्यांना मदत करावी, समृद्ध जीपी क्षेत्रातील बँकांमध्ये निधीसाठी एनआरआय शाखा व्यवस्थापकांना सहकार्य करून या कार्यावर लक्ष द्यावे.

बिल अँड मेलिंडा गेट्स - फ्रीड्रिच नॉर्मन स्टिफटंग - फोर्ड - रॉकफेलर फाउंडेशनचे भारतातील व्यवस्थापक यांना जीपीच्या कार्यक्षेत्रातील संस्थांशी संपर्क साधता येईल. लोकांच्या नजरेत येण्यासाठी जीपींनी टाटा ट्रस्ट, जमनालाल बजाज ट्रस्ट, किर्लोस्कर ट्रस्ट, गोदरेज ट्रस्ट, शिव अदार ट्रस्ट यांच्या पुरस्कारांसाठी अर्ज केला पाहिजे.

आयएमसी चेंबर आणि मुंबईमधील विल्सन डुसोझा आणि जफर फुटेहल्ली यांच्या नेतृत्वाखाली जर्मन कंपनीच्या एसईएस सेवानिवृत्त तज्ज्ञांना प्रतिदिन १००० रुपये आणि प्रवास भत्ता देऊन आतिथ्य द्यावे : तज्ज्ञांना आयडियाच्या घरी राहायला, स्थानिक शाकाहारी भोजन खायला आवडते. हा मार्ग कदाचित २ वर्षांनंतर युरोपीयन बाजारपेठेत निर्यात वाढ करण्यास वापरला जाणे आवश्यक आहे.

**४. वैजनाथ बँक श्रेणी सुधारणा :** विविध सेवा देण्याकरिता सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, एसबीआय किंवा एचडीएफसी बँकेशी करार करून शेतकऱ्यांच्या आवक व बाह्य व्यवसाय निधीच्या वाढीसाठी प्रयत्न करावा. विविध सेवांच्या श्रेणीची विक्री प्रक्रिया जलद करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करणे, ही एक महत्त्वपूर्ण कृती ठरेल.

**५. घरगुती बाजारपेठ :** महाराष्ट्रातील दूध उत्पादक, मध्य प्रदेश व गुजरातमधील दूध उत्पादक यांना त्यांच्या उत्पादनांमध्ये वापरण्यासाठी, फळे खरेदी करण्यासाठी आगाऊ पैसे देण्यास उद्युक्त केले जाऊ शकतात. पेप्सी-एग्रोला त्यांच्या इतर ब्रँडेड उत्पादनांमध्ये फळांचा लगदा वापरण्यासाठी संपर्क साधला जाऊ शकतो. बाजार सत्यापन दर्शविते की परदेशी ब्लेंडर, विपणक हे रस आयात करतात. उत्पादनांशी जोडल्या गेलेल्या प्रोत्साहनानुसार २०२१ च्या बदलानुसार हे इतर उत्पादन गटांनुसार टप्प्यात कमी केले जावे.

कोविडनंतर कॉफी रिटेल आउटलेट स्टारबक्सने फळांपासून पौष्टिक पेये तयार केली आहेत. मुलांसाठी, तरुणांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी ते या उत्पादनांची शिफारस करतात. स्टारबक्ससह टाटा कॉफीची भागीदारी भारतात तत्सम फळांवर आधारित पौष्टिक पेये, उत्पादने सादर करण्यासाठी वापरली जाऊ शकते. त्याचप्रमाणे चवदार फळ, श्रीखंड उत्पादकांना जसे - गोकुळ, चितळे आणि महाराष्ट्राच्या इतरांना प्रथम जीपी शेतकऱ्यांकडून फळे खरेदी करण्याची ऑफर दिली जाऊ शकते.

प्रत्येक राज्यातील बाजारपेठेत फळ व भाज्यांच्या किमती नियमित स्वरूपात उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त उत्पन्न मिळवण्यासाठी या स्रोतांचा वापर करण्यास शेतकऱ्यांना आधीच शिकविले गेले असेल. राज्यात पॅकर्स, एफ अँड व्हीचे ग्रेडर या २० कंपन्या सूचीबद्ध आहेत आणि जी.पी. शेतकरी / कर्मचारी या किमतींचा कुशलतेने वापर करेपर्यंत त्यांच्या सेवांचा वापर करता येईल.

विमा व आम्ही उद्योगिनीसारख्या महिला नेटवर्क संस्था यांच्या महाराष्ट्र व गोवा येथील शाखांना जीपी उत्पादने व जीपीने प्रक्रिया केलेली फळे, भाज्या विकण्यासाठी प्रोत्साहित केले जावे. यामध्ये हिंदुस्तान युनिलिव्हरच्या सखी नेटवर्क आणि इतर एफएमसीजी कंपन्यांच्या तत्सम व्यवस्थापन पद्धत यांचा नमुना वापरता येईल. पावस येथील देसाई आंबेवाले हे आंबे व प्रक्रिया केलेला आंब्याचा ज्यूस जपान, यूएसए येथे आज अनेक दशके निर्यात करीत आहेत. फायटो सॅनिटरी प्रक्रिया, दर्जा या मानकानुसार ही उत्पादने तयार केली जातात. विजय अमर देसाई हे व्यवस्थापकीय भागीदार आहेत.

माटुंगा येथील श्री चुरी गेली १५ वर्षे निसर्ग या प्रकल्पामधून ४/५ तारांकित हॉटेलमध्ये विदेशी भाज्या उपलब्ध करतात. स्पेन्सरचे नॅचरेस बास्केट, टाटा बिग बास्केट यामार्फत उच्च प्रतीच्या ग्राहकांपर्यंत पोहोचता येऊ शकेल.

देशांतर्गत एफ अँड व्ही खरेदीदारांच्या याद्या, पत्ते गोळा करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी, मूल्यांकन करण्यासाठी आणि सुरुवातीला हंगामी, वार्षिक करारावर चर्चा करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी उपलब्ध आहेत.

फळ विक्रेते / निर्यातदार वेबसाइट्स - वर्णन, फोटो, सादरीकरण, संरक्षक प्राथमिक पॅकिंग, दुय्यम पॅकिंग, कराराच्या अटी इ. अभ्यास करण्यासाठी प्रत्येक फळासाठी २० निर्यातदार वेबसाइट्स आहेत.



जीपी आणि त्यांच्या निवडलेल्या निर्यात संस्थेने सुरुवातीच्या काळात निर्यातीसाठी सहकार्याने कार्य केले पाहिजे. कार्यक्षम अग्रेषण एजंटमार्फत श्रेणीबद्ध उत्पादनांची वाहतूक व इतर नुकसान कमी करून काम केले पाहिजे.

फळ एक्सपोर्ट फॉरवर्डिंग एजंट हे कार्यक्षम, प्रामाणिक, अनुभवी निवडले पाहिजेत. प्रमुख फळ उत्पादक म्हणून आज डाबर रियल, बी नॅचरल-आयटीसी, नेस्ले, मिनीट मेड - कोकाकोला, पतंजली, पेपर बोट, ट्रॉपिकाना - पेप्सी, मदर डेअरीचे सफल, २४ मंत्र, सेरेस हे ओळखले जातात. सिमला मिरची व फणस यासारख्या पूरक पिकांचा वापर केला जावा. यूट्यूबवरील सोलापूर, यवतमाळ येथील शेतकऱ्यांच्या यशाबद्दल व्हिडिओ उपलब्ध आहेत.

शेतकरी गटांना पुणे, नागपूर वार्षिक मेळ्यात नेले जावे. नंतर त्यांना मेसेने दरवर्षी काही शहरांमध्ये आयोजित केलेल्या फूड प्रोसेस्ड फेअर अमुग्राह येथे नेऊन परली येथेच प्रक्रिया प्रकल्पात गुंतवणूक करावी की नाही हे स्वतंत्रपणे ठरवावे.

**६. निर्यात घरे :** परली येथील फलोत्पादकांना निर्यात घरे, निर्यात प्रक्रियेची माहिती नसते आणि म्हणूनच पुणे, औरंगाबाद, नाशिक येथील फळभाज्या किंवा भाजीपाल्यातील २ किंवा ३ शेतीमाल, प्रक्रिया केलेल्या वस्तू निर्यात घरांचा वापर करावा. जीपीचे उद्दिष्ट २०२१-२२ करिता ९०% देशांतर्गत बाजारपेठ आणि १०% निर्यात बाजार आहे. दरवर्षी निर्यातीत १०% वाढ करावी. गोदरेज, टायसन, आयटीसी, पेप्सी, पार्ले, अॅग्रो, सह्याद्री एक्सपोर्ट्स, ढोबळे एक्सपोर्ट्स इत्यादी पहिल्या वर्षासाठी वापरले जावे. बऱ्याच राज्यांत निर्जलीकरण केलेली फळे, भाज्यांसाठी १००% निर्यात देणारी युनिट्स / सेझ युनिट्स आहेत. कित्येक कंपन्या कोरड्या, चूर्ण फळे, भाज्या थंड हवामानातील देशांमध्ये जिथे ताजी फळे, भाज्या उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी निर्यात करीत आहेत.

**७. निर्यातदार :** अनिवासी भारतीय खरेदीदारांना भारतीय शेतकरी, निर्यातदार यांच्या किमतीवर स्वतःचा नफा कमविण्यात रस असल्याने त्यांचा वापर निरुत्साहित होईल. तेथील सध्याच्या फळांच्या निर्यातदारांच्या मदतीने अॅम्स्टरडॅम, शारजाह यासारख्या लिलावाच्या बाजारावर आणि त्याच्या भारतीय सहकाऱ्यांमार्फत रबोबँक्स तज्ज्ञांना मदत करणे चांगले ठरेल.

औरंगाबाद, पुणे, नाशिक येथील एफ आणि व्ही निर्यातदार रॉयल अॅग्रो आणि सह्याद्री एक्सपोर्ट्स इत्यादींचा प्रथम वापर केला जाईल. ट्रेडवेल इंटरनॅशनल प्रा. लि., यूएईचे श्री. व्ही. के. मुरली, एमडी यांचे वेस्टर्न स्टँडर्ड वेअरहाउस असून शारजाच्या लिलावाच्या बाजारात वाहतूक संदर्भातील दुवे आहेत.

सध्याच्या प्रायोजकांना न दुखावता आयसीएआरआय, नाथ सीड्स इत्यादी भारतीय कंपन्यांमधील ३०/४० वर्षांचा अनुभव असलेल्या कृषितज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

मोन्सँटो, सिंजेंटा, आर्चर डॅनियल, मिडलँड्स (तेलबिया व खाद्यतेल),



कारगील (धान्य, खाद्यतेल) कॉनग्रा, ट्रेडेको इंटरनॅशनल अशा मोठ्या खरेदीदारांना निर्यातीसाठी ताजी फळे, प्रक्रिया केलेली फळे खरेदी करण्यास उद्युक्त केले जाऊ शकते.

जर्मनीचे डॉ. दीपक पठारे, यूके राजेंद्र हर्डीकर, औटाकमुंड आणि उमेश जोशी, ठाणे हे देशातील १५० देशांना ५०,००० उत्पादने प्रदान करू शकतात. एक एचएस कोड, एक देश, १० शहरे, १० आयातदारांची नावे, वेबसाइट, मुख्य कार्यकारी अधिकारी, दूरध्वनी क्रमांक उदाहरण दिले जाऊ शकते.

**८. पैठण फूड पार्क :** कोल्ड स्टोरेज, पॅकिंग, प्रक्रिया या सर्व सुविधांनी सुसज्ज पैठण फूड पार्कच्या एकूण क्षमतेपैकी केवळ १५% क्षमता वापरली गेली आहे आणि शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन कराराकरिता या जागेचा वापर व्हावा याकरिता प्रयत्न केला पाहिजे. कोल्ड स्टोरेज हा फळे पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा विभाग आहे, ज्यामुळे नासाडी टाळता येते. नवी दिल्ली येथील टेसोलने वापरलेले प्लग अँड प्ले सिस्टीमचे उदाहरण पुढे येऊ शकते.

**९. आयएनसी ४२ ही संस्था दरवर्षी कृषी उत्पन्न वाढ :** पाण्याचा कमी प्रमाणातील वापर इत्यादी निकषांवर आधारित कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वोत्तम दहा विकासकांची यादी प्रसिद्ध करतात. महाराष्ट्रात शेती उत्पादन क्षेत्रात काम करणाऱ्या २८०८ संस्था आहेत, तर आंध्रमध्ये ५८५१, तामिळनाडू ५०७७, तेलंगणा ३९०९, पंजाबमध्ये २९०६ संस्था आहेत. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी आकारमानाच्या आधारे राज्यात ही संख्या वाढणे गरजेचे आहे.

**१०. शेतकऱ्यांसाठी मोबाइल ॲप्लिकेशन :** अॅग्री फार्मिंग, अॅग्री मार्केट, अॅग्री अॅप, भुवन गारपीट, पीक विमा, इफ्को किसान कृषीमित्र, किसान सुविधा, कृषी जागरण, आरएमएल फार्मिंग, पुसा कृषी, प्लॅन्टीक्स, शतयु आयुर्वेद, खेतीया बादी इत्यादी.

आपण जीपी सदस्यांना मदत करण्यासाठी महिंद्रा, टाटा केमिकल्स, नाथ सीड्स, कोरोमंडल इंटरनॅशनल, आरसीएफ, झुवारी अॅग्रोकेमिकल्स, दीपक नाइट्राईट आणि कृषी क्षेत्रातील इतर मोठ्या कंपन्यांशी आधीच संपर्क साधला असेल.

पावसाळा आला, वाढेल रोपांची मागणी,
त्यासाठीच शासनाची योजना

# हर घर नर्सरी

**सन २०१९-२० मध्ये जग कोविड-१९ या विषाणूच्या साथरोगाला सामोरे गेले. त्यामध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. या काळात ऑक्सिजनची उपलब्धता हा काळजीचा मुद्दा ठरला. रुग्णांना ऑक्सिजनची उपलब्धता जरी यंत्राद्वारे करण्यात येत असली तरी वातावरणातील ऑक्सिजनचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे नैसर्गिकपणे ऑक्सिजन निर्मिती करणाऱ्या झाडांच्या महत्त्वाबाबत नव्याने जाणीव झाली आहे. झाडांची रोपे उपलब्ध करून देण्यासाठी शासनातर्फे महत्त्वाकांक्षी 'हर घर नर्सरी' योजना सुरू करण्यात आली आहे. पावसाळा येताच रोपट्यांची मागणी वाढते. त्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. - प्रतिनिधी**



वृक्ष लागवड करण्यासाठी रोपांची सहज उपलब्धता व्हावी यासाठी 'हर घर नर्सरी' हा उपक्रम राबविण्यात येतो. याअंतर्गत प्रत्येक गावात प्रत्येक कुटुंबाने किमान ५० रोपे तयार करावेत, त्यानुसार पुढील वर्षाचा वृक्ष लागवडीचा कृती आराखडा तयार केला जातो. यासाठी गावपातळीवरील ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक, अंगणवाडी सेविका आणि स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग या उपक्रमात घेतला जातो. गावपातळीवर लोकांमध्ये जागृती करून सर्व कुटुंबे यामध्ये सहभागी होतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. रोपे निर्मितीसाठी शेतकरी गट, महिलांचा बचत गट यांचे सहाय्य घेण्यात येते. शालेय विद्यार्थी रॅलीच्या माध्यमातून गावामध्ये 'हर घर नर्सरी' बाबत वातावरण निर्मिती करण्यावरही भर दिला जातो. तसेच वर्तमानपत्रे व आकाशवाणी या माध्यमांचेही जनजागृतीसाठी सहाय्य घेण्यात येते.

### तज्ज्ञांचे मार्गदर्शन

नर्सरी तयार करण्याचे तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, रेशीम विभाग, कृषी विषयक शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, पर्यावरण तज्ज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, अशासकीय संस्था यांच्याकडील उपलब्ध तज्ज्ञांकडून मार्गदर्शन देण्यात येते. आपल्या परिसरातील सावली देणारे वृक्ष, फळे देणारे वृक्ष, औषधी वनस्पतींचे झाडे असे विविध प्रजातींच्या बियाण्यांचे संकलन आतापासूनच सुरू करणे गरजेचे आहे. बिया संकलनाबाबत कार्यपद्धती उपरोक्त यंत्रणांच्या माध्यमातून ठरवली जाते. बिया संकलनात स्थानिक प्रजातींना प्राधान्य दिले जाते. नर्सरी तयार करण्यासाठीची प्राथमिक माहिती असलेली लीफलेट, पाम्प्लेट तयार करून गावात वाटप केले जातात तसेच त्याबाबत शाळांमधून, ग्रामसभांमधून गावकऱ्यांना प्रात्यक्षिक (डेमॉन्स्ट्रेशन) देण्यात येते. नर्सरी तयार करण्यासाठीचे आवश्यक साहित्य विशेषतः पिशव्या गावपातळीवर उपलब्ध होतील असे प्रयत्न केले जातात. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात येतो. 'हर घर नर्सरी' हा उपक्रम लोकसहभागातून हाती घ्यावयाचा असल्यामुळे स्वयंसेवी संस्थांबरोबरच वृक्षसंवर्धनाबाबत जागरूक असलेले नागरिक व इतर संस्था, उद्योग यांची मदत देखील घेतली जाते.

### वृक्षलागवड आराखडा

'हर घर नर्सरी' उपक्रमातून तयार होणाऱ्या रोपांच्या अनुषंगाने गावाचा संभाव्य वृक्षलागवड आराखडा तयार केला जातो. गावाची लोकसंख्या, त्यानुसार तयार होणारे रोपसंख्या, वैविध्यपूर्ण रोपे तयार व्हावेत यासाठी करावयाचे नियोजन, रोपे लागवडीचे स्थळ व संख्या याबाबत परिपूर्ण आराखडा गावपातळीवर तयार करण्यात येतो. कार्यक्रमाच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी म्हणून विभागीय स्तरावर उपायुक्त (रोहयो), जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी (रोहयो) व जि. प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), तालुका स्तरावर तहसीलदार व गटविकास अधिकारी पंचायत समिती आणि गाव स्तरावर प्रत्येक साधारण ५ ते ६ गावांच्या समूहासाठी तालुक्यातील विविध शासकीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तहसीलदार व गटविकास अधिकारी हे संयुक्तपणे नियुक्ती करतात. यामध्ये महसूल, पंचायत समिती, कृषी, सहकार, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, बांधकाम, पाटबंधारे, शिक्षण, पाणीपुरवठा आदी विभागातील उपलब्ध मनुष्यबळाचा विचार केला जातो. उपक्रमाचे नियोजन, संनियंत्रण आढावा घेणे, अहवाल तयार करणे आदींसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात येते तसेच तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येते. याबाबत केलेल्या कार्यवाहीचे अभिलेखे, फोटो, आराखडा, नियोजन आदी संकलित करून जिल्हास्तरावर जतन करण्यात येतात.

### लोक चळवळीचे स्वरूप

वृक्ष लागवड, रोपे तयार करणे, लावलेल्या रोपांचे संगोपन करणे, त्यांचे जतन करणे या सर्व बाबींना लोकचळवळीचे स्वरूप येणे गरजेचे आहे. 'हर घर नर्सरी' उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध होतील. त्यामुळे पावसाळ्यात वृक्षलागवड करताना भासणारी रोपांची कमतरता दूर होईल. कुटुंबाने स्वतःच बियांपासून रोपे तयार केलेली व लागवड केलेली असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांचे झाडांबरोबर जिव्हाळ्याचे नाते तयार होईल. त्यातून वृक्ष संगोपन करण्याचे महत्त्वही कुटुंबाच्या आणि जनतेच्या लक्षात येईल. ■■

शेती व्यवसायातून करा समृद्धीची पेरणी

# सरकारी योजनांची साथ, प्रगती भरमसाठ



**भारत हा कृषिप्रधान देश आहे. मात्र, आजचा तरुण शेतीकडे दुर्लक्ष करताना दिसतो. पारंपरिक शेतीतील अडथळे पाहून त्याचे मन शेतीऐवजी नोकरीकडे वळले आहे; परंतु शेती हा भरघोस नफा देणारा व्यवसाय आहे. त्यासाठी शासनाच्या योजनाही आहेत. पारंपरिक शेती सोडून आधुनिकतेची कास धरली तरी यशाचा मार्ग गाठणे कठीण नाही.**

**- प्रतिनिधी**

विकासाचा पाया व माध्यम म्हणून शेतीला पर्याय नाही, हे कोरोनाच्या कालखंडात स्पष्ट झालंय. गेल्या काही वर्षांत नोकरदार, व्यावसायिक, सुशिक्षित तरुण यांचा शेतीकडे ओढा वाढतो आहे. व्यावसायिक संधी म्हणून शेती व संलग्न बाबींकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. परकीय व देशांतर्गत बाजारपेठ प्रचंड मोठी आहे. बाजारपेठ व ग्राहकांच्या मानसिकतेचा अभ्यास करून योग्य दिशा निवडली, तर शेती क्षेत्रात विपुल संधी आहेत. उत्पादनाची वेगळी ओळख तयार करणारी कुणीही व्यक्ती, गट किंवा समूह बाजारपेठ काबीज करू शकतो.

जगाची फळे व भाजीपाल्याची मागणी प्रचंड मोठी आहे. सध्या वर्षाला सुमारे एक लाख कोटी रुपये परकीय चलन भारताला निर्यातीतून मिळते. ज्वारी, बाजरी, भात या अन्नधान्यांची फार मोठी निर्यात होते, मात्र त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळत नाही. सुमारे दीड लाख कोटींची शेती उत्पादने आपल्या ग्राहकांसाठी आयात केली जातात. यात तेलाची आयात मोठ्या प्रमाणात होते. दरवर्षी सुमारे ५००० कोटी रुपयांचा काजू निर्यात आणि ९००० कोटींचा काजू आयात केला जातो. मसाला पिकांची ४५०० कोटींची निर्यात आणि ६००० कोटींची आयात होते. कापसाची ६००० कोटी रुपयांची निर्यात होते आणि तेवढाच आयातही केला जातो. आपण साधा कापूस निर्यात करतो व वैद्यकीय कापूस आयात करतो. अनेक शेती उत्पादने आपण कच्च्या स्वरूपात निर्यात करतो आणि प्रक्रिया केलेला पक्का माल आयात करतो. हे चित्र बदलण्यास प्रचंड वाव आहे.

केंद्र व राज्य सरकारमार्फत निर्यातवृद्धीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. राज्यात कृषी निर्यात धोरण राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने निर्यातीसाठी २१ क्लस्टर केले आहेत. विपणन, प्रक्रिया, ई-मार्केटिंग, ई-ट्रेडिंग व निर्यातीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. स्मार्ट योजना आहे, विविध पिकांच्या निर्यातवृद्धीसाठी क्लस्टरनिहाय काम सुरू आहे. अपेडा व इतर अनेक संस्थाही विविध पातळ्यांवर शेतकरी व कृषी व्यावसायिकांसाठी कार्यरत आहेत.

फलोत्पादक राज्य म्हणून ओळख असलेल्या महाराष्ट्राची आता विषमुक्त द्राक्ष उत्पादक राज्य म्हणून नवी ओळख होत आहे. डाळिंब, संत्रा, मोसंबी, लिंब, केळी आदी फळपिके व भाजीपाला पिकांचे द्राक्षाच्या धर्तीवर काम सुरू आहे. शेती संबंधित सर्वच व्यवसायांना त्याचा उपयोग होणार आहे. बहुपयोगी सुविधा उपलब्ध होत आहेत. उत्पादकांनी आता प्रक्रिया, विपणन व व्यापारात येण्याची गरज आहे. शेतीपासून ग्राहकापर्यंतची साखळी बळकट करून तिला लाभ घेण्याची गरज आहे.

### ग्राहकांची मानसिकता

कुठलाही शेतमाल घ्या... बाजाराचा प्रश्न नाही. ग्राहकांना हवा तसा पुरवठा करण्याची गरज आहे. ग्राहकांना अन्नसुरक्षा हवी आहे, विषमुक्त शेतमाल पाहिजे. आरोग्य हीच संपत्ती या नजरेनं आज ग्राहक शेती उत्पादकांकडे बघत आहे. यापुढे उघड्यावरचा भाजीपाला फार कुणी घेईल, असे चिन्ह नाही. गुणवत्तेबरोबरच सुरक्षेची हमी दिली, तरच शेतमालाला चांगला भाव मिळू शकेल. त्यासाठी उत्पादन पद्धतीत बदल करावा लागणार आहे.

### प्रमाणिकरण

ग्राहक किंवा बाजारपेठ कागदपत्रांवर विश्वास ठेवते. पूर्वी फक्त युरोपीय देश

शेतमालाच्या गुणवत्तेच्या हमीचे ग्लोबल गॅप प्रमाणपत्र मागत होते, आता सर्व देश मागतात. त्यामुळे बाजारपेठ कोणतीही असो शेतमालाचे प्रमाणिकरण करून व्यापार करणं गरजेचं आहे. सेंद्रीय किंवा विषमुक्त उत्पादन पद्धती, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा, प्रक्रिया या सर्वांना सुरक्षितता प्रमाणपत्र गरजेचं झालं आहे. गुणवत्तेची हमी देणाऱ्या या सर्व गोष्टी असतील, तर ग्राहक किंमत पाहत नाही. चांगल्या दर्जाच्या निविष्ठा, साठवणूक, वाहतूक, तंत्रज्ञान आपल्याकडे उपलब्ध आहे. या सर्वांचा एकत्रित उपयोग करून एकात्मिक दृष्टिकोन ठेवून पुढे जाण्याची, शेतकरी व बाजारपेठेतील दरी भरून काढण्याची गरज आहे. असं केलं तर येत्या पाच-सहा वर्षांमध्ये आपण कोणतीही बाजारपेठ काबीज करू शकतो.

### व्यवसायाकडे वळताना

शेतकऱ्यांनी आता शासनाच्या योजना काय आहेत, हे पाहून शेती करण्यापेक्षा बाजारपेठेला काय हवंय हे विचारात घेऊन शेती करण्याची गरज आहे. नाशिकच्या विलास शिंदेंनी पंधरा वर्षांपूर्वी शून्यातून सुरुवात केली. आता त्यांची सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी कोट्यवधींची उलाढाल करत परिवर्तन घडवत आहे. शेतीकडे व्यवसाय म्हणून वळल्यानंतर अपयशी ठरणारांमध्ये अनुदान किंवा ऐकीव गोष्टींवर त्याकडे वळलेल्यांची संख्या मोठी आहे. कमी जागेत जास्त उत्पादन घेणे, नवनवीन तंत्रज्ञान वापरणे हे खर्चीक आहे; पण बाजार असेल तर खर्च करण्यात हरकत नसावी.

### कृषी संलग्न व्यवसाय

शेतीसाठी विविध प्रकारची बियाणे, खते, औषधे शेतकऱ्यांना आवश्यक असतात. शेतकऱ्यांना ग्राहक म्हणून आवश्यक असलेल्या गोष्टींचा पुरवठा करण्याच्या कृषी संलग्न व्यवसायांना मोठा वाव आहे. रोपवाटिका, टिश्युकल्चर, सेंद्रीय कंपोस्ट, जैविक खते-औषधे, पॅकिंग सामग्री, ठिबक वगैरे सिंचन सुविधा, विविध प्रकारची शेती उपयोगी यंत्रे, अवजारे व त्यांची दुरुस्ती सेवा, शेडनेट, फोम नेट, ग्रीनहाऊस, मल्चिंग पेपर, गनी बॅग, जूट पिशव्या, कोल्ड स्टोरेज, रायपनिंग चेंबर, पॅकिंग व ग्रेडिंग युनिट, पेस्ट कंट्रोल, सौर यंत्रणा, पिकवण गृहे, साठवण गृहे, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, निर्यात सुविधा केंद्र, विविध प्रकारचे प्रकल्प अहवाल, कृषी सल्ला सेवा, माती, पाणी, व्हायरस, पौष्टिकता, भेसळ, टोक्सिसिटी अशा विविध प्रकारच्या तपासणी प्रयोगशाळा, विविध प्रकारचे बाजार अभ्यास अहवाल निर्मिती आदी क्षेत्रात विपुल संधी आहेत.

### मार्केटिंग व निर्यात

शेतकरी ते ग्राहक यादरम्यानचे मध्यस्थ हटवून थेट शेतमाल पुरवठा केला तरी १०-१५ टक्के जास्त फायदा होऊ शकतो. एकट्या दुकट्याला अवघड जाईल; पण शेतकऱ्यांनी एकत्र येऊन, गटामार्फत यात खूप चांगले काम होऊ शकते. विक्री पद्धत व पॅकेजिंगमध्ये महत्त्वाचे बदल होत आहेत. पॅकिंगसाठीची कागदाची पाने यांची जागा आता क्रेट, पनेट घेत आहेत. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आदी बहुराष्ट्रीय ऑनलाइन पोर्टलवरून विक्री होत आहे. काही दोष असेल तर ग्राहकांना उत्पादन बदलून दिले जाते.

देशाच्या ९८ टक्के द्राक्ष महाराष्ट्रातून निर्यात होतात. केळीची निर्यात ४ कोटी वरून २०७ कोटीपर्यंत वाढली आहे. लिंबूवर्गीय फळांच्या निर्यातीसाठी सिट्रसनेट प्रणाली सुरू झाली आहे. मात्र अद्यापही कडधान्य, मका, ज्वारी, हरभरा आदी अनेक पिके निर्यातीच्या दृष्टीने दुर्लक्षित आहेत. देशातून ४४ हजार टन संत्रा निर्यात होतो, त्यात महाराष्ट्राचा वाटा फक्त ११९२ टनांचा आहे. देशाच्या ६१ हजार टन नैसर्गिक मध निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा फक्त १ टक्के आहे. संत्रा, कलिंगड आदी सर्वच फळांच्या निर्यातीस मोठी वाव आहे.

### प्रक्रिया

प्रक्रिया हे उत्पन्नवाढीचे फार मोठे साधन आहे. अनेक उच्चशिक्षित तरुण ज्वारी, मका, रागी, सेंद्रीय डाळ अशा वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग उभे करून यशस्वीपणे वाटचाल करत आहेत. शेतीच्या ठिकाणी फक्त प्राथमिक प्रक्रिया केली तरी उत्पन्नात १०-२० टक्के वाढ होते. सर्वप्रथम प्राथमिक आणि मग इतर मोठ्या प्रक्रियेकडे वळावे. ग्रामीण भागात प्रक्रियेसाठी खूप संधी आहेत. भाजीपाला प्रक्रियेत आपण खूप मागे आहोत. नवीन प्रक्रिया उद्योग सुरू करताना सर्व प्रमाणपत्रे, पॅकेजिंग, ब्रॅन्डिंगच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे.

### बँक कर्ज व प्रकल्प

शेतीविषयक व्यवसायांना बँकांमार्फत कर्ज उपलब्ध होते, मात्र त्यासाठी प्रस्ताव तयार करताना पुढील पाच वर्षांच्या अनुषंगाने लागणाऱ्या सुविधांसाठीच्या खर्चाचा समावेश प्रकल्प खर्चात करायला हवा. तात्पुरता विचार करून कर्ज घेतले आणि पुढे काही नवीन करायची वेळ आली, तर आर्थिक समस्या उद्भवते. व्यवसाय आर्थिक कोंडीत सापडतो. हे टाळण्यासाठी सुरुवातीपासूनच सजग असावे.

### तज्ज्ञ सल्ला सेवा

शेती व संलग्न व्यवसायांतील अनुभवी व ज्ञानी व्यक्तींना या क्षेत्रांमध्ये नवीन लोकांना व्यावसायिक तत्त्वावर सल्ला, सेवा, मार्गदर्शन करण्याच्या विपुल संधी आहेत. सध्या ज्यांना शेतीचं काहीच माहिती नाही, अशी अनेक लोकं कन्सल्टन्सी करत लाखो रुपये कमवत आहेत. धनिक व्यक्तींना त्यांची शेती विकसित करण्यासाठी तज्ज्ञ व शेती व्यवस्थापकांची गरज असते.

उत्पादनापासून विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर हमखास यश मिळवून देणाऱ्या व्यक्तींची गरज भासते आणि त्यांच्यासाठी चांगली किंमत मोजण्याचीही अशा व्यक्तींची, संस्थांची तयारी असते.

### वेगळी ओळख

उत्पादनाची वेगळी ओळख निर्माण करणे बाजारपेठेत स्वतःचं स्थान बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. अपेडा, नाबार्ड अशा अनेक संस्था कृषी व्यावसायिक व उद्योजकांसाठी विश्वासार्ह नेटवर्क उभारत आहेत. ग्राहक चांगल्या उत्पादनांच्या, उद्योजकांच्या, शेतकऱ्यांच्या शोधात आहेत. त्यांच्यापर्यंत तुमची माहिती योग्य प्रकारे पोहोचली पाहिजे. यासाठी बऱ्याच गोष्टी घरी बसून करता येतात. व्यवसायाला नाव देणं, त्याचं बोधचिन्ह तयार करणं, विविध ठिकाणी नोंदणी करणं, विविध संस्थांशी व्यावसायिक संबंध जोडणे, वेबसाईट असणे हितकारक ठरते. आयकर विवरणपत्र व गुणवत्ताविषयक कागदपत्रे व्यवसायाची, संस्थेची विश्वासार्हता वाढवतात.

कृषी व्यवसायासाठी भविष्यात मोठा वाव आहे. आपल्याला नक्की काय करायचंय हे पक्कं करावं. आपल्या भागातील अतिरिक्त उत्पादनाचं मूल्यवर्धन करणं, ही पहिली पायरी असू शकते. नंतर इतर बाबींकडे वळता येईल. शेतीला इतर धंद्यांची जोड देणे आवश्यक आहे. उपलब्ध गोष्टींचा पुरेपूर वापर केला तर निश्चितपणे यश मिळू शकेल.

उद्योगस्वामिनी : सरोजिनी फडतरे, समृद्धी ॲग्रो ग्रुप

# भरड धान्यापासून प्रक्रिया उत्पादने




**हरितक्रांतीच्या ओघात भरड धान्य मागे पडत गेले. भरड धान्ये लागवड, संशोधन, बाजारपेठ आणि आहारातूनही कमी होत गेले. मात्र, पोषक आहारात भरड धान्याचे महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्राने २०२३ हे वर्ष जागतिक भरड धान्य वर्ष जाहीर केले आहे. एवढे महत्त्व असणाऱ्या भरड धान्यावर प्रक्रिया करून विविध उत्पादने तयार करण्याचा उद्योग अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील देवळाली प्रवरा येथील सरोजिनी तात्यासाहेब फडतरे यांनी समृद्धी ॲग्रो समूहाअंतर्गत सुरू केला आहे. २०१० पासून सुरू असलेल्या या उद्योगात ज्वारीपासून पोहे, रवा, इडली मिक्स, ज्वारी चिवडा, बाजरी पोहे आदींची निर्मिती केली जाते. त्यांची उत्पादने अमेरिका, नेदरलँड, बेल्जियम, दुबई, दक्षिण आफ्रिका इथपर्यंत पोहोचली आहेत.**

**- दीपक अहिरे**

'कृषिमूल ही जीवनम्' या उक्तीनुसार भारतीय संस्कृती विकसित झाली आहे. म्हणूनच शेती ही भारतातील शेतकऱ्याची जीवनशैली म्हणून ओळखली जाते. भारताला वैविध्यपूर्ण हवामानाच्या देणगीमुळे भारत नेहमी कृषिप्रधान देश राहिला आहे. भरड धान्याचा विचार करता भारतामध्ये ८० पेक्षा जास्त जाती आपल्या आहाराचा भाग आहेत. हरितक्रांतीच्या काळामध्ये भरड धान्याची लागवड मागे पडली. त्यावेळी आव्हान होते ते म्हणजे जनतेची भूक भागविणे. याच काळात तांदूळ आणि गहू आयात करण्यात येऊन त्याला सरकारचे धोरणात्मक सहकार्य मिळाले. त्यामुळे भरड धान्य आहारातून हळूहळू मागे पडले. गहू आणि तांदूळ याच्यावरील संशोधन, जागरूकता, खप, उत्पादन विकास जसा झाला तसा इतर भरड धान्याचा झाला नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही गहू आणि तांदूळ यांच्यासाठी पूरक झाली. त्यामुळे भरड धान्य ही गरिबांचा सामाजिक सामना करीत राहिली. हळूहळू भरडधान्याची लागवडही मंदावत गेली.

### पोषक धान्ये

आज समाजामध्ये व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन ई, तंतुमय पदार्थ, पौष्टिक मूल्य यासारख्या अनेक कारणांनी आहारात कमतरता आली. त्यामुळेच जीवनशैलीचे अनेक आजार जसे की मधुमेह, रक्तदाब, संधिवात, पित्त, हार्ट समस्या दिसून येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी व भारताचे आरोग्य सुधारण्यासाठी भरड धान्याला, त्याचे पौष्टिकतेचे महत्त्व ओळखून भारत सरकारने पोषक धान्ये म्हणून राजपत्रात प्रसिद्ध केले आहे.

महाराष्ट्राचा विचार करता, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम भागात ज्वारी, बाजरी मोठ्या प्रमाणात घेतली जाते. कोकण, सह्याद्री पर्वताच्या रांगा यामध्ये प्रामुख्याने नाचणी, वरी यासारखी पिके घेतली जातात. बदलती जीवनशैली, खाण्याच्या सवयी यामुळे मागील तीन दशकांपासून ज्वारी, बाजरी, नाचणी हे मुख्य अन्न म्हणून खाण्यात कमी येत आहे. याला कारण वाढतं शहरीकरण, औद्योगिकीकरण, मॉडर्न संस्कृतीचे अनुकरण, आणि यात भर म्हणून की काय शासन स्तरावरून फक्त गहू आणि तांदूळ यांच्यासाठी प्रोत्साहन देणे. अशा प्रकारे भरड धान्य आहारातून हळूहळू कमी झाले आहे.

पुढील येणारे २०२३ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक भरड धान्य वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात संधी चालून आल्या आहेत. शेजारील राज्यांमध्ये भरड धान्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झाला तसा तो महाराष्ट्रात झाला नाही. आज आपल्या येथे बोटावर मोजण्याइतके भरड धान्य प्रक्रिया प्रकल्प आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात संधी आहेत. जागतिक बाजापेठेतील वाढत्या ग्लूटेन फ्री पदार्थांमुळे भरड धान्यात प्रचंड मोठी संधी आहे. कोरोनानंतरच्या काळात आरोग्याविषयी भरपूर जागरूकता निर्माण झाली आहे. भरड धान्यात असलेल्या पोषकतत्त्वामुळेच प्रक्रियायुक्त उत्पादनांना मागणी वाढली आहे. म्हणूनच या संधीचा फायदा घेत तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे.

### भरड धान्याचे फायदे

भरड धान्याचे खुप मोठे फायदे आहेत. फायबरचे प्रमाण अधिक असल्याने मधुमेह, रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. प्रथिनाचे प्रमाण अधिक आहे. भरड धान्य कमी कालावधीत तयार होत असल्याने दुष्काळ सहन करण्याची ताकद त्याच्यात असते त्यामुळं ती शेतकरी बांधवासाठी फायदेशीर आहेत. हीच संधी लक्षात घेऊन महाराष्ट्रात कृषी विभागाने भरड धान्य विकास कार्यक्रमाची योजना २०१२ साली सुरू झाली. ज्वारी, बाजरी, नाचणी यासारखे भरडधान्यावर प्रक्रिया करून विविध उत्पादने तयार व्हावीत. यासाठी भरड धान्य विकास योजना सुरू

करण्यात आली. या योजनेविषयी अधिक माहिती घेता भरड धान्यापासून काही प्रक्रियायुक्त उत्पादने बनवण्याची कल्पना अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील सौ. सरोजिनी तात्यासाहेब फडतरे यांना सुचली. या क्षेत्रात नावीन्य असले तरी त्यात व्यवसायाच्या मोठ्या संधी निर्माण होऊ शकतील असा विश्वास सौ. फडतरे यांनी व्यक्त केला आणि व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. पूर्ण वेळ मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला.

### समृद्धी ॲग्रोची भरड धान्य प्रक्रिया

समृद्धी ॲग्रो समूहाने २०१० पासून भरड धान्यप्रक्रिया सुरू केली. उत्पादनाच्या चवीशी कोणतीही तडजोड न करता भारताला निरोगी आणि तंदुरुस्त बनवण्याच्या प्रयत्नात समृद्धी ॲग्रो ग्रुपने नेहमी अस्सल आणि शुद्ध सेंद्रिय उत्पादने आणण्याचे मिशन ठेवले त्यादृष्टीने आम्ही झपाटल्यागत कामाला लागलो असल्याचे सौ. फडतरे यांनी स्पष्ट केले. संघर्षातून समृद्धीकडे वाटचाल सुरू केली. ही वाटचाल करत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. संसाराचा व्याप वाढल्याने पतीच्या महाविद्यालयाच्या नोकरीच्या पगारात पुरेनासे झाले. म्हणून सरळ गाव सोडले आणि थेट हैदराबाद येथे ई टीव्हीच्या अन्नदाता या नियतकालिकात ते उपसंपादक म्हणून रुजू झाले. २००६ ते २००८ या दोन वर्षात हैदराबादमधली भाषा आणि खाद्य संस्कृती यांचा मेळ काही बसेना. खूप दूर आल्यासारखी भावना सतत व्हायची. म्हणून तिथेही राजीनामा देऊन पुण्यात एका कृषीविषयक नियतकालिकात पतीने उपसंपादक म्हणून काम सुरू केले. शेती प्रक्रिया उद्योग चालू करावा असे मला वाटायचे. आयुष्यात काहीतरी नवीन करण्याचं पक्कं केलं.

उद्योजक होण्याचं पहिलं पाऊल उचलल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले. मी २०१० साली घरूनच ज्वारी, बाजरी, नाचणी आणि गहू पिठांची विक्री सुरू केली. पिठाची डिलिव्हरी पती कामावर जाताना देत असत असे रुटीन चालू केले. पतीचे बचत गटांना प्रॉडक्ट बनवण्याचे आणि मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्याचे काम होते. या कामात त्यांच्या खूप ओळखी झाल्या. त्यांनी सात राज्यांचा जवळून अभ्यास केला. सन २०१२ मध्ये संधी चालून आली. कृषी विभागाने भरडधान्य विकास कार्यक्रमाची योजना सुरू केली. ज्वारी, बाजरी, नाचणी यासारख्या धान्यांवर भरड प्रक्रिया करून विविध उत्पादने तयार करण्याची कल्पना अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतून पुढे आली आणि हे क्षेत्र नावीन्यपूर्ण असून यात व्यावसायिक संधी भरपूर निर्माण करता येतील अशी आशा पल्लवित झाली. विचारांती मी पूर्णपणे आणि पूर्णवेळ या क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले. वडापुरी ता. इंदापूर जि. पुणे येथे दहा जणांचा बचतगट केला.

### विक्रीचे व्यासपीठ

आमचे मार्गदर्शक दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मगर साहेब यांचे मदतीने बचत गट स्थापन केला आणि माझ्या उद्योगाचा श्रीगणेशा झाला. आमच्या कष्टाची पराकाष्ठा सुरू झाली. मी होम सायन्स पदवीधर असल्याने सर्व उत्पादनाचा प्रयोग आधी घरात होत असे. त्यात यश आल्यानंतर मोठ्या प्रमाणात ते करत असू. २०१२ मध्ये पुण्यात भरलेल्या कृषी प्रदर्शनात आमच्या उत्पादनांना विक्रीसाठी पहिले व्यासपीठ मिळाले. ज्वारीच्या चकल्या, शंकरपाळ्या, इडली हे पदार्थ केले आणि स्टॉलवर उपलब्ध केले; पण आम्हा दोघांना नोकरीचाच अनुभव गाठीशी असल्याने ग्राहकांपर्यंत पोहोचताच येईना. ग्राहक स्टॉलजवळ आले की संकोचून मान खाली घालून आम्ही दोघेही उभे असायचो. ही बाब कृषी अधिकारी अर्जुन फुले यांच्या लक्षात आली. त्यांनी तेथेच पहिला धडा शिकवला. ग्राहकांनी काही घेवो किंवा न घेवो, त्यांना आपले प्रॉडक्ट देऊन धीटपणे संवाद साधायचा. आपली उत्पादने समजावून सांगायची. त्याप्रमाणे आम्ही मार्केटिंग करायला लागलो. आणि काय आश्चर्य…पहिल्याच दिवशी नऊशे रुपयांची तर चार दिवसांत साडेचार हजार रुपयांची विक्री झाली असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले.

### होम डिलिव्हरीचा प्रारंभ

या प्रसंगाने आमचा आत्मविश्वास दुणावला आणि ग्राहकांचे जाळे आम्ही प्रदर्शनाच्या माध्यमातून खूपच वाढवले. त्यातूनच पुण्यातील एका महिलेने पन्नास जणांसाठी ज्वारीच्या इडलीची ऑर्डर दिली. ती सर्व इडली आम्ही घरी बनवून पोहोच केली आणि होम डिलिव्हरीचा टप्पा सुरू केला. त्याच दरम्यान कोकणातील एक इडलीची ऑर्डर आली आणि आता कोकणात कशी द्यावी हा प्रश्न पडला. मग मी त्यांना म्हणाले की मी पीठ तयार करून देते, तुम्ही ते भिजवून इडली तयार करा. अशा तऱ्हेने इडली मिक्सचा जन्म झाला. ग्राहकांची नाडी ओळखून प्रक्रियेचे पुढचे दालन खुले केले असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले. आमच्या उद्योगाचे स्वरूप २०१३ मध्ये विस्तारले. देवळाली प्रवरा येथे 'समृद्धी ॲग्रो ग्रुप' या नावाने धान्य ग्रेडिंगचे युनिट सुरू केले. खरं तर ज्वारी, बाजरीच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळणे सोपे नव्हते; पण उत्पादनांच्या विक्रीबरोबरच ही उत्पादने कधी आरोग्यदायक आहेत ते आम्ही ग्राहकांना समजून देत होतो. नाचणीतील लोहामुळे मुलींमधील रक्तक्षय कमी होण्यास मदत होते. ज्वारी आणि बाजरीतील कर्करोग, मधुमेह प्रतिबंधात्मक गुणधर्म मी ग्राहकांना पटवून देत होते. आरोग्यदायी अन्नाची संकल्पना लोकांमध्ये रुजवण्यास सुरुवात केली. आमच्या या कामाची वाखाणणीही समाजात व्हायला लागली असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले.

### नावीन्यपूर्ण उत्पादने

आमची उत्पादने जसे ज्वारीचा रवा, पोहे, इडली मिक्स, ज्वारी चिवडा, बाजरी पोहे, नाचणी रवा, इडली व डोसा मिक्स, ज्वारी बाजरी नाचणीची पिठं यांची गुणवत्ता सर्व निकषांच्या कसोटीवर उतरली आणि त्यांना भारताबाहेरही जसं की अमेरिका, नेदरलँड, बेल्जियम, ऑस्ट्रेलिया, दुबई, दक्षिण आफ्रिका या ठिकाणीही बाजारपेठ मिळाली आहे. आता मिश्रधान्यांचे कुरकुरेही सुरू केले आहेत. या सर्व उत्पादनांना ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. तो पुढेही मिळणार असा विश्वास सौ. फडतरे यांनी व्यक्त केला. ही उत्पादने जे केवळ इष्टतम पोषणच नाही तर तुमच्या खाद्यपदार्थांच्या प्रोफाइलला अनुकूल चवदेखील देतात. समृद्धी ॲग्रो ग्रुप वर्षानुवर्षे नावीन्यपूर्ण उत्पादने आणण्यासाठी काम करत आहे, भरड धान्याच्या उत्पादनांपासून ते मल्टीग्रेन ब्रेकफास्टचे पर्याय, सेंद्रिय आणि आरोग्यदायी फ्लेक्स ते फायबर समृद्ध अन्न, विविध प्रकारचे पीठ ते मल्टीग्रेन मिक्स, पफ, स्नॅक्स जे केवळ निरोगी आणि चविष्ट खाद्यपदार्थांमधील रेषा अस्पष्ट करत नाहीत तर भारतीयांसाठी एक विश्वासार्ह जीवनशैली तयार करत असल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही समाजातील प्रत्येक घटकाला सेवा देण्यास सक्षम आहोत याची खात्री

करण्यासाठी आम्ही आमच्या उत्पादनांचे सतत निरीक्षण करतो. कनिष्ठ वर्ग, मध्यमवर्ग किंवा उच्च वर्ग या प्रत्येकालाच आमची उत्पादने मनापासून आवडत असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले. समृद्धी ॲग्रो ग्रुपचा सर्वात चांगला भाग हा आहे की ते देशभरात आणि परदेशातही मापदंडांच्या अधीन राहून वितरण करतात.

समृद्धी ॲग्रो ग्रुप सध्या ज्वारी चिवडा, ज्वारी पोहे, ज्वारीचे इडली मिक्स, नाचणीचे इडली मिक्स, डोसा मिक्स, ज्वारीचा रवा, नाचणीचा रवा, भरड धान्याचे पीठ, असे अनेक पदार्थ तयार करते. त्यांनी कुटुंबानुसार पदार्थांचे पॅकिंग आकर्षक बनविले आहे. आज त्यांना भारताबाहेर यूएसए, नेदरलँड, बेल्जियम, ऑस्ट्रेलिया, दुबई, दक्षिण आफ्रिका या देशातही बाजारपेठ मिळाली आहे. लवकरच आम्ही इतर देशांतही आपली उत्पादने पाठविणार असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले.

## दर्जेदार उत्पादने

जेव्हा आपण राज्याबाहेर आणि परदेशातही पदार्थ पाठवताना काही गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे, जसे की, त्या देशातील प्रमाणित मानके काय आहेत. प्रायमरी पॅकिंग आकर्षक आणि योग्य, माहितीपूर्ण पाहिजे. आवश्यकतेनुसार प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक आहे. आपल्या मालाचे भाव हे शक्यतो भारतीय रुपयात घेणे सोयीस्कर आहे. आम्ही आमचे सर्व धान्य आणि आवश्यक असलेला कच्चा माल शेतकऱ्यांकडून त्यांना बाजारपेठेत मिळणाऱ्या दरापेक्षा जास्त दराने घेत असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले. आमचा लाल बहादूर शास्त्रींच्या 'जय जवान, जय किसान' या उक्तीवर विश्वास आहे. आमचे शेतकरी आणि त्यांच्या नैसर्गिकरीत्या पेरलेल्या आणि सेंद्रिय कच्च्या मालाच्या मदतीने आम्ही जगभरातील आमच्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उत्कृष्ट दर्जाची सेंद्रिय उत्पादने तयार करत असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले.

मूल्यवर्धित कच्च्या धान्याच्या सोयीस्कर आणि त्रासमुक्त खरेदीसाठी एकूण ३० पेक्षा जास्त शेतकरी उचित किमतीच्या कराराच्या आधारावर भरड धान्य उत्पादन पुरवित आहेत. बाजारातील उपलब्ध दराच्या तुलनेत उच्च दर्जाच्या भरड धान्याच्या बदल्यात आमच्याकडून अधिक किमती ऑफर केल्या जात आहेत.

## विविध आव्हाने

या क्षेत्रात अनेक आव्हाने असल्याचेही त्यांच्याशी बोलताना लक्षात आले. आज समाजामध्ये आरोग्याविषयी जागृती अभियान राबविणे आवश्यक आहे, भरडधान्याविषयी अनेक कारणांनी उदासीनता दिसून येत आहे. शासकीय व खाजगी स्तरावर सतत याबद्दल अधिक प्रसिद्धी मिळाली पाहिजे. छोट्या उद्योजकाला कमी वेळेमध्ये सुलभतेने कर्ज पुरवठा होत नाही. एका छोट्या गावात तयार करण्यात आलेल्या मालाची विक्री शहराच्या ठिकाणी करण्यासाठी सोईचा अभाव आहे. आज बदलत्या परिस्थितीत विक्री कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे, म्हणून क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेंतर्गत जागरूकता निर्माण करून मोठ्या प्रमाणात भरड धान्याची जाहिरात होणे गरजेचे आहे. हे काम छोट्या उद्योजकाला परवडणारे नाही. म्हणून पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक भरड धान्य वर्षात तरुणांनी पुढाकार घेऊन या आरोग्यदायी अन्न व्यवसायात यशस्वी भरारी घेण्यासाठी आताच पावले उचलली पाहिजेत.

## शून्यातून उभा केला प्रकल्प

आपल्या दिनक्रमाविषयी बोलताना सौ. फडतरे म्हणाल्या की, आमचा दिवस भल्या पहाटे सुरू होऊन रात्री उशिरा मावळतो. सर्वांचे कष्टच मला खरं तर समृद्धीकडे घेऊन आले. आमच्या वेलीवर आलेली दोन फुलं,माझ्या दोन्ही कन्या ह्यांनी ही त्यांचं बालपण आमच्या फरफटीत घालवले. चिकाटी आणि जोखीम पत्करण्याची तयारी, थोरा मोठ्यांचे आशीर्वाद आणि मित्रांच्या शुभेच्छा असल्याने मानहानी, संयमाची परीक्षा पाहणाऱ्या कटू प्रसंगातही एकमेकांना सांभाळत आमच्या बरोबरच ज्वारीलाही समृद्धीचे दिवस आणण्यात आम्ही यशस्वी झालो असल्याचे सौ. फडतरे यांनी सांगितले.

शून्यातून उभा केलेला हा प्रकल्प आता दिमाखाने आपली ध्वज पताका परदेशातही मिरवत आहे. सौ. फडतरे यांच्या कामात श्री. फडतरे यांनीही सर्वस्व झोकून दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली. २०१३ मध्येच त्यांना सह्याद्री वाहिनीचा नवउद्योजकांचा पुरस्कार मिळाला आणि प्रथमच दूरचित्रवाणीवर झळकले. पैशांपेक्षा प्रसिद्धी खूप लवकर मिळाली. २०१५ मध्ये आमच्या उत्पादनांचा संपूर्ण भारतातून दुसरा क्रमांक आला. २०१९ मध्ये ॲग्रो वन स्मार्ट कृषी उद्योजक पुरस्काराने गौरविण्यात आले. असे अनेक पुरस्कार मिळाले.


## भरडधान्यातील उत्कृष्ट महिला उद्योजिका पुरस्कार

नुकताच ऑक्टोबर २०२२ मध्ये महाराष्ट्र राज्य पातळीवर स्टार्टअप यात्रा शेतीमध्ये काम करणाऱ्या प्रथम पारितोषिक महिला म्हणून एक लाख रु. व सन्मानचिन्ह असा पुरस्कार राज्याचे महामहीम राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते देण्यात आला. राज्यात १५ ऑगस्ट २०२२ ते १७ सप्टेंबर २०२२ दरम्यान महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. या यात्रेचा उद्देश महाराष्ट्रातील तळागाळातील नवउद्योजकांचा आणि नावीन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेऊन त्यांना स्थानिक पातळीवर व्यासपीठ उपलब्ध करून देणे. नवसंकल्पनांना तसेच सुरुवातीच्या टप्प्यातील नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी आणि आवश्यक पाठबळ पुरवणे. राज्यातील उद्योजकता व नावीन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे असा उद्देश होता.

या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील तळागाळातील अनेक उद्योजकांनी आपल्या कल्पना मांडल्या. यातून राज्य स्तरावर वेगवेगळ्या विभागांतून २१ जणांची विजेते म्हणून निवड करण्यात आली आहे. यामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील सरोजिनी तात्यासाहेब फडतरे यांनाही पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांची भरडधान्यातील उत्कृष्ट महिला उद्योजिका म्हणून राज्य पातळीवर निवड करण्यात आली आहे. यामुळे मिलेटच्या कामाला राजमान्यता मिळाली आहे. भरडधान्यातून प्रक्रिया उत्पादने करण्याचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्णही केले. अजून त्यांना खूप मोठी झेप घ्यायची आहे. त्यांची उत्पादने 'गुड २ इट' या ब्रँडखाली ऑनलाइन तसेच ऑफलाइन विक्रीसाठी आहेत.

(या लेखाच्या लेखकाचे लेख नियतकालिक तसेच सोशल मीडियावर नियमित प्रकाशित होत असतात. त्यांनी लिहिलेले असे उपक्रमशील उद्योजक हे पुस्तक प्रकाशित झाले असून त्यांचा भ्रमणध्वनी ९४०५३१२०२९ व ईमेल *deepakahire 1973@gmail.com* आहे.)

■ ■




## एकीचे बळ आणि प्रगती अटळ

# औद्योगिक समूह विकास योजना

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग म्हणजेच एमएसएमईमध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. देशाच्या एकूण उत्पादन क्षेत्रात एमएसएमईचा ४५ टक्के वाटा आहे. त्यामुळेच या क्षेत्राला चालना देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. औद्योगिक समूह विकास योजना त्याचाच एक भाग आहे. यात एका प्रकारातील किमान १० उद्योगांना एकत्र येऊन क्लस्टर स्थापन करता येते. त्यास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या आकर्षक योजना आहेत. ग्रामीण, नक्षलग्रस्त आणि अविकसित भागात समूह विकास योजनेअंतर्गत उद्योग स्थापन करण्यासाठी विशेष सवलती आहेत. एकमेकास साह्य करून जीडीपीत वाटा, रोजगारनिर्मिती आणि उद्योजक होण्याच्या स्वप्नपूर्तीसाठी ही योजना अत्यंत उपयोगी आहे.**

**- प्रतिनिधी**

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे (MSMEs) देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. सदर क्षेत्राचा एकूण उत्पादन क्षेत्रातील वाटा सुमारे ४५ टक्के असून, निर्यातीतील वाटा ४०% व रोजगार संधी उपलब्धतेतील वाटा सुमारे ६९% इतका आहे. MSME क्षेत्राचे महत्त्व विचारात घेऊन केंद्र तसेच राज्य शासनाने सदर क्षेत्रास चालना देण्यासाठी सामूहिक विकास संकल्पनेवर आधारित औद्योगिक समूह विकास योजना कार्यक्रम जाहीर केले आहेत.

राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम - समूह विकास योजना व राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना या दोन योजनांची अंमलबजावणी उद्योग संचालनालयामार्फत राज्यात केली जात आहे. सदर योजनांतून सूक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरिता क्षमतावृद्धी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायिक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्रांतर्गत (सीएफसी) संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामायिक जलनिस्सारण केंद्र, सामायिक प्रक्रिया केंद्र इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**अ. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआय-सीडीपी) :** सन २०१३-२०१४ मध्ये महाराष्ट्र राज्याची औद्योगिक समूह विकास योजना शासन निर्णय दिनांक २५.०२.२०१४ अन्वये अंमलात आली असून सदर योजनेंतर्गत राज्यातील क, ड व ड+ क्षेत्र, विनाउद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्र व या क्षेत्रातील समूह विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून

दिनांक २४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आलेली आहेत.

**पात्रता :** अ) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत एकाच प्रकारच्या उद्योग प्रवर्गातील किमान १० सूक्ष्म, लघु कार्यरत घटक.

ब) सामूहिक प्रोत्साहन योजनेनुसार क, ड, ड+ आणि विना उद्योग जिल्हे तसेच नक्षलग्रस्त क्षेत्रे या भागात असणारे औद्योगिक समूह.

**१. योजनेअंतर्गत सुविधा :**

**i) क्षमता वृद्धी कार्यक्रम अंमलबजावणी :** क्षमता वृद्धी कार्यक्रमाकरिता मंजूर प्रकल्प किंमत मर्यादा रु. १०.०० लाख असून त्याअंतर्गत राज्य शासनाचे अनुदान ९०% व लाभार्थ्याचा सहभाग १०% आहे.

**ii) सामायिक सुविधा केंद्र उभारणी :** सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी राज्य शासनाची अनुदान मर्यादा रु. १०.०० कोटी किंवा मंजूर प्रकल्प किमतीच्या ७०% यापैकी जी कमी रक्कम असेल ती.

औद्योगिक समूहात १००% सूक्ष्म उद्योग घटक असणाऱ्या औद्योगिक समूहाकरिता राज्य शासनाचे अनुदान ८०% राहील.

औद्योगिक समूहात १००% अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील उद्योग घटक, १००% महिला प्रवर्गातील उद्योग घटक असणाऱ्या औद्योगिक समूहाकरिता राज्य शासनाचे अनुदान ९०% राहील.

सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण १७४ औद्योगिक समूह प्रकल्पांना क्षमतावृद्धी कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात आलेली असून त्यापैकी ७४ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणींतर्गत अंतिम मंजूरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजूरी प्राप्त एकूण ७४ प्रकल्पांपैकी ३८ औद्योगिक समूह प्रकल्पांचे सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.

**ब. केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) :** केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम (MSME) मंत्रालयमामार्फत सूक्ष्म, लघु उपक्रमासाठी सुधारित सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) दिनांक १०.०२.२०१० रोजी घोषित केली असून दिनांक १६.१०.२०१९ रोजी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.

**पात्रता :** विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत एकाच प्रकारच्या, औद्योगिक प्रवर्गातील किमान २० सूक्ष्म, लघु कार्यरत घटक.

**१. सुधारित योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :**

i) सामायिक सुविधा केंद्राची प्रकल्प किंमत मर्यादा रु. २० कोटी इतकी आहे. ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ७०% ते ९० टक्के इतका राहील. ज्या औद्योगिक समूहामध्ये ५०% सूक्ष्म, महिला, ग्रामीण किंवा अनुसूचित जाती/जमातीचे उद्योग घटक असतील अशा औद्योगिक समूहांना केंद्र शासनाचे ९०% अनुदान मंजूर करण्यात येते.

ii) पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० कोटी असून ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६०% राहील.

iii) क्षमतावृद्धी कार्यक्रमासाठीची प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० लाख इतकी आहे. दिनांक २७.०७.२०१६ रोजीच्या सदर योजनेच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार केंद्र शासनामार्फत निदानोपयोगी अभ्यास अहवाल व क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावळणीसाठी यापुढे केंद्र शासनाचे अनुदान देण्यात येणार नाही; परंतु प्रकल्पाचा सविस्तरल प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर रु. १०.०० लाख रक्कम विशेष हेतू वाहन संस्थेचे सहभाग वर्गणी म्हणून मान्य करण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण ५४ औद्योगिक समूह प्रकल्पांना प्राथमिक मंजूरी देण्यात आलेली असून त्यापैकी २२ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणी अंतर्गत अंतिम व ०८ औद्योगिक समूह प्रकल्पांना तत्त्वतः मंजूरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजूरी प्राप्त एकूण २२ प्रकल्पांपैकी १७ औद्योगिक समूह प्रकल्पांचे सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.

राज्यात सूक्ष्म व लघु उपक्रमांसाठी राबविण्यात येत असलेल्या औद्योगिक समूह विकास कार्यक्रमांमुळे 'सामूहिक विकास' संकल्पना रुजविण्यास यश मिळत असून छोट्या उद्योजकांचा आत्मविश्वास व एकोपा दृढ होत आहे. सुमारे २५,००० छोट्या उद्योजकांना सदर योजनेतून लाभ मिळून ते अधिक स्पर्धाक्षम होत असून त्यांची उत्पादने जागतिक दर्जाची होण्यासाठी मदत होत आहे, स्थानिक ठिकाणी उच्च दर्जाच्या सुविधा सुलभतेने उपलब्ध होत असल्याने अनेक रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

**स्वार्थ!**

माणसाला सर्वात क्रूर बनवितो तो स्वार्थ. या स्वार्थामुळे भुकेनं व्याकूळ झालेला सिंह दोन हरणं मारूण खातो. पण तो दुसरा सिंह कधीच मारून खात नाही. पण स्वार्थानं बरबटलेला माणूस एक नाही दोन नाही लक्षावधी माणसं मारण्यास मागेपुढे पहात नाही. सिंहाला क्रूर म्हणण्याचा कुठलाही अधिकार माणसाला नाही. स्वार्थी माणसाला स्वतःचं भवितव्य नसतं. कारण स्वार्थ हेच त्याच जीवीत साध्य होऊन बसतं!



# नमुना प्रकल्प अहवाल

## वनौषधी प्रोसेसिंग प्लँट

**ओळख :** सदरील प्रकल्प हा वनौषधी प्रोसेसिंग करण्याचा आहे. भारतामध्ये वनसंपत्ती मोठ्या प्रमाणात आहे. मागील ६० ते ७० वर्षांमध्ये वनावर आधारित प्रकल्पांचा फार मोठ्या प्रमाणात म्हणावे तसे उद्योग आले नाहीत. आता हळूहळू बाजारपेठेमध्ये वनौषधींचे प्रमाण वाढते आहे. हळूहळू बाजारपेठ पण वाढते आहे. यामध्ये भरपूर प्रकारच्या उत्पादनांचा समावेश आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा १०,००० चौरस फूट
इमारत ३,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** वनौषधी वनस्पती, इतर.
**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-७, अर्धकुशल-३, अकुशल-२
**लागणारी यंत्रसामग्री :** वनौषधी प्रोसेसिंग प्लँट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ७,००,००० |
| इतर | ३,००,००० |
| **एकूण :** | **१२,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १,५०,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ९,००,००० |
| पक्का माल | ४,५०,००० |
| प्रत्यक्ष | ३,२५,००० |
| **एकूण :** | **१६,७५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,०८,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इंधन | ६,२५,००० |
| पाणी | २,३०,००० |
| **एकूण :** | **८,५५,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-७ | १८,९०,००० |
| अर्धकुशल-३ | ६,३०,००० |
| अकुशल-२ | ३,००,००० |
| **एकूण :** | **२८,२०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,७५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ६०,००० |
| **एकूण :** | २,३५,००० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ३,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १,२०,००० |
| **एकूण :** | **४,७०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-२ | ६,५०,००० |
| वॉचमन-१ | १,२०,००० |
| **एकूण :** | **७,७०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ६,००,००० |
| प्रवास खर्च | २,००,००० |
| **एकूण :** | **८,००,०००** |
| **एकूण :** | **१५,७०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ३,००,००० |
| इतर | १,००,००० |
| **एकूण :** | **४,००,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १२,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १,५०,००० |
| **एकूण :** | **४८,५०,०००** |
| खेळते भांडवल | १६,७५,००० |
| **एकूण :** | **६५,२५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | १९,५७,५०० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ४५,६७,५०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,०८,००,००० |
| उपयुक्तिके | ८,५५,००० |
| वेतन व भत्ते | २८,२०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | २,३५,००० |
| घसारा | ७,७०,००० |
| प्रशासकीय खर्च | १५,७०,००० |
| विक्री खर्च | ४,००,००० |
| व्याज | ५,४८,१०० |
| **एकूण :** | **१,७६,९८,१००** |
| **वार्षिक विक्री :** | **२,१५,९१,८५४** |
| **वार्षिक नफा :** | **३८,९३,५८२** |

# सुगंधी उत्पादने निर्माण करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा सुगंधी उत्पादने उत्पादित करण्याचा आहे. जगभरात सुगंधी उत्पादनांची बाजारपेठ खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे व ती दिवसेंदिवस वाढते आहे. या उद्योगाला लागणारा कच्चा माल आपल्याकडे खूप मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या उत्पादनांना खूप मोठ्या प्रमाणात लघु व मध्यम उद्योजकांना वाव आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा २,००० चौरस फूट

इमारत १,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळ्या दर्जाचे सुगंधी केमिकल्स

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :** सुगंधी प्रॉडक्ट मेकिंग प्लँट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ८,२२,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | ५०,००० |
| वर्कशॉप फर्निचर | १,००,००० |
| इतर | २०,००० |
| **एकूण :** | **१,७०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ७०,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,६०,००० |
| पक्का माल | ८०,००० |
| प्रत्यक्ष | ३०,००० |
| **एकूण :** | **२,७०,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १९,२०,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,८०,००० |
| इंधन | ६०,००० |
| पाणी | ३०,००० |
| **एकूण :** | **२,७०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-२ | ५,४०,००० |
| अर्धकुशल-१ | २,१०,००० |
| अकुशल-१ | १,५०,००० |
| **एकूण :** | **९,००,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ४१,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ९,००० |
| **एकूण :** | ५०,००० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ८२,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १७,००० |
| **एकूण :** | **९९,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-१ | ३,००,००० |
| वॉचमन-१ | ६०,००० |
| **एकूण :** | **३,६०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ३,५०,००० |
| प्रवास खर्च | १,२५,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **५,२५,०००** |
| **एकूण :** | **८,८५,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | २,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **२,५०,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ८,२२,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १,७०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ७०,००० |
| **एकूण :** | **१०,६२,०००** |
| खेळते भांडवल | २,७०,००० |
| **एकूण :** | **१३,३२,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे १० टक्के | १,३३,२०० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | ११,९८,८०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १९,२०,००० |
| उपयुक्तिके | २,७०,००० |
| वेतन व भत्ते | ९,००,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ५०,००० |
| घसारा | ९९,००० |
| प्रशासकीय खर्च | ८,८५,००० |
| विक्री खर्च | २,५०,००० |
| व्याज | १,४३,८५६ |
| **एकूण :** | **४५,१७,८५६** |
| **वार्षिक विक्री :** | **५२,८५,७४६** |
| **वार्षिक नफा :** | **७,६७,८९०** |

# पॅकेजिंग मटेरियल उत्पादित करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा पॅकेजिंग मटेरियल उत्पादनांचा आहे. आपल्याकडे पॅकेजिंग मटेरियलची बाजारपेठ खूप मोठ्या प्रमाणात आहे व याच्यामध्ये वेगवेगळ्या पॅकेजिंग मटेरियलचा अंतर्भाव असतो. नवनवीन तंत्रज्ञानामुळे पॅकेजिंग मटेरियल हे कायम बदलत असते. या व्यवसायाला खूप मोठ्या प्रमाणात वाव आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा १०,००० चौरस फूट
इमारत ५,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** प्लास्टिक, केमिकल्स इत्यादी.

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-४, अर्धकुशल-३, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :** सेमी ऑटोमॅटिक पॅकेजिंग प्लँट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ६०,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ५,००,००० |
| इतर | १,००,००० |
| **एकूण :** | **८,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १,००,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ७,००,००० |
| पक्का माल | ३,५०,००० |
| प्रत्यक्ष | २,००,००० |
| **एकूण :** | **१२,५०,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ८४,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | ६,५०,००० |
| पाणी | १,२०,००० |
| **एकूण :** | **७,७०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-४ | १०,८०,००० |
| अर्धकुशल-३ | ६,३०,००० |
| अकुशल-२ | ३,००,००० |
| **एकूण :** | **२०,१०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ३,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ४०,००० |
| **एकूण :** | ३,४०,००० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ६,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ८०,००० |
| **एकूण :** | **६,८०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक | ९,००,००० |
| वॉचमन-१ | १,२०,००० |
| **एकूण :** | **१०,२०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ७,००,००० |
| प्रवास खर्च | १,५०,००० |
| **एकूण :** | **८,५०,०००** |
| **एकूण :** | **१७,२०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्री व्यवस्थापक | ३,२५,००० |
| विक्रेते | १,२५,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **५,००,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ६०,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ८,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १,००,००० |
| **एकूण :** | **६९,००,०००** |
| खेळते भांडवल | १२,५०,००० |
| **एकूण :** | **८१,५०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | २४,४५,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ५७,०५,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ८४,००,००० |
| उपयुक्तिके | ७,७०,००० |
| वेतन व भत्ते | २०,१०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ३,४०,००० |
| घसारा | ६,८०,००० |
| प्रशासकीय खर्च | १०,२०,००० |
| विक्री खर्च | ५,००,००० |
| व्याज | ६,८४,६०० |
| **एकूण :** | **१,४४,०४,६००** |
| **वार्षिक विक्री :** | **१,७२,८५,५२०** |
| **वार्षिक नफा :** | **२८,८०,९२०** |



# प्रश्नपेटी

**प्रश्न : अल्टरनेटिव्ह प्लास्टिक प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**विराज पंडित, सोलापूर**

**उत्तर** : अल्टरनेटिव्ह प्लास्टिक प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जागा ५,००० चौरस फूट

इमारत ३,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता :

वीज ४० अश्वशक्ती

पाणी ५० के.एल.

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-४, अकुशल-३

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक अल्टरनेटिव्ह प्लास्टिक मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे लाईम स्टोन

या प्रकल्पासाठी एकूण भांडवल ५०० ते ७०० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ३०० ते ५०० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १०० ते २०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ४२ ते ४५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १९ ते २१ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : ॲडिटिव्ह प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**प्रसन्न पाटील, नागपूर**

**उत्तर** : ॲडिटिव्ह प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

जागा १०,००० चौरस फूट

इमारत ३,००० चौरस फूट

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक ॲडिटिव्ह मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे स्पेशालिटी केमिकल्स

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २०० ते ३०० लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १०० ते २०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५० लाख ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३२ ते ३५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा २८ ते ३० टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : वैदिक प्लास्टर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**अभिजित देशमुख, अकोला**

**उत्तर** : वैदिक प्लास्टर तयार करण्याच्या प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ३,००० चौरस फूट

इमारत २,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज २० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-१, अर्धकुशल-३, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक वैदिक प्लास्टर मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे ऑर्गेनिक मटेरियल व इतर

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २०० ते ३०० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १०० ते २०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५० ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २५ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १८ ते २० टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : टर्मरिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**विशाल नाकाडे, जळगाव**

**उत्तर** : टर्मरिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा २,००० चौरस फूट

इमारत १,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता :

वीज २० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक टर्मरिक ऑईल मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : केमिकल्स

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल १०० ते २०० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ५० ते १०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५० ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २० ते २२ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा २२ ते २९ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात येईल.)*

उद्योग,
व्यापार,
व्यवसायाद्वारा
स्वयंरोजगार
मिळविण्यासाठी
सर्व काही...

प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

# उद्योजक

अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com
To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in

## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३११६.)*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ____________________
पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ____________________
____________________
पिन कोड ____________________
कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ____________________

| वर्गणीचे दर | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

| जाहिरातींचे दर | |
|---|---|
| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करून पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे

कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५१६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३११६ वर कळवावा.

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था**

## ध्येय (Mission)

जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती

## दृष्टिकोन (Vission)

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
उद्योजक

**Visit us @ http://www.mced.co.in**

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak July - 2023
Date of Publication : 25th June 2023

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* "नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा"
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.
* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रूपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



: अधिक माहिती व संपर्कासाठी :

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३६१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in


**If undelivered please return to**

Chief Editor,
Udyojak Magazine, उद्योजक

MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar 431005.**
Portal : www.mced.co.in

To,

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar -431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**